# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त-

## दिनांक २८ मे, २०१५

# अ नु क्र म णि का

**त्रिसदस्य समिती सर्वसाधारण सभा** **दि.२८ मे, २०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहदमनगर** **वेळ- सकाळी १०.३० वाजता**


| अ.नं. | विषय नं | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| ०१ | १ | दिनांक ०५.०५.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| ०२ | २ | दिनांक ०९.०५.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| | | **बांधकाम विभाग** | |
| ०३ | ३ | नाशिक सिहस्थ कुंभमेळयाचे कालावधीमध्ये शिर्डी येथे होणा-या गर्दीच्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजाचा आढावा घेणेबाबत. | २३ |
| | | **खरेदी विभाग** | |
| ०४ | ४ | संस्थानसाठी वार्षिक गावरान तुप खरेदी करणेसाठी केलेल्या कार्यवाहीबाबत. | २७ |
| | | **श्री साईबाबा हॉस्पिटल** | |
| ०५ | ५ | सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत. | २८ |
| ०६ | ६ | कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट यांनाही ते दर लागू करणेबाबत. | ३० |
| ०७ | ७ | डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी चौकशी अधिकारी नेमणेबाबत. | ३३ |
| **आयत्या वेळेचे विषय** | | | |
| ०८ | १ | गावरान तुप खरेदी फेर निविदा प्रक्रियेबाबत. | ३५ |
| ०९ | २ | सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांस आवश्यक किरणा माल खरेदीबाबत. | ३६ |
| १० | ३ | संस्थान रुग्णालयांतील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करणेबाबत. | ४१ |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०७/ २०१५** — **दिनांक २८ मे, २०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** — **वेळ- सकाळी १०.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २८.०५.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/१०९६/ २०१५, दिनांक २६ मे, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ११७०/ २०१५, दिनांक २७ मे, २०१५ रोजीचे पत्रान्वये सदरहू त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक २८.०५.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०५.०५.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१५०** दिनांक ०५.०५.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०९.०५.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१५१** दिनांक ०९.०५.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **फुटाणे, विडयाची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या बंद निविदा उघडून वार्षिक न्युनतम दर निश्चित करणेबाबत.**

मा.उपसमिती दि.१८/०२/२०१५ चे सभेतील निर्णय क्र.३० नुसार माहे-एप्रिल-२०१५ ते माहे-मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये फुटाणे, विड्याची पाने, पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,४८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मंदिर विभागाचे दि.१६/०३/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देवून बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.०८/०४/२०१५ अशी अंतिम तारीख नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा (दरपत्रके) जमा झालेल्या आहेत.

**अ) फुटाणे प्रसाद कोटेशन-**

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं.<br>प्रोप्रा.किशोर गंगवाल,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर-४२३१०९ | ०५०८/दि.०७.०४.२०१५ |
| ०२ | श्री.ईश्वर आधार साटोटे,<br>मु.पो.ता.कोपरगाव,जि-अहमदनगर | ०६४६/दि.०८.०४.२०१५ |
| ०३ | श्रीदिपक अशोक झाल्टे,<br>विजयनगर, कनकुरी रोड,<br>मु.पो.शिर्डी,ता.राहाता, जि.अहमदनगर | ०६९४/दि.०८.०४.२०१५ |

**ब) विडयाच्या पानांसाठीचे कोटेशन-**

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.दिपक देवराम आहेर,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ०६८८/दि.०८.०४.२०१५ |
| ०२ | श्री.किशोर चित्ते,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ०६८९/दि.०८.०४.२०१५ |
| ०३ | श्री.योगेश भानुदास जाधव, मु.पो.खैरी | ०६९०/दि.०८.०४.२०१५ |

**क) पावडर मार्बल मूर्तीचे कोटेशन-**

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.विरेश जैस्वाल,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ०६९१/दि.०८.०४.२०१५ |
| ०२ | साई कृष्णा आर्ट,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ०६९२/दि.०८.०४.२०१५ |
| ०३ | साई इंटरप्रायजेस,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ०६९३/दि.०८.०४.२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले फुटाणे प्रसादाचे ०३ कोटेशन्स, विड्याच्या पानांचे ०३ कोटेशन्स, पावडर मार्बल मूर्तीचे ०३ कोटेशन्स आजचे उपसमिती समोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

**अ) फुटाणे प्रसाद खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | अंदाजे वार्षिक मागणी | प्रती किलो दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं.<br>प्रोप्रा.किशोर गंगवाल,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर-४२३१०९ | ४५० किलो | ५०/- |
| ०२ | श्री.ईश्वर आधार साटोटे,<br>मु.पो.ता.कोपरगाव,जि-अहमदनगर | ४५० किलो | ५०/- |
| ०३ | श्रीदिपक अशोक झाल्टे,<br>विजयनगर, कनकुरी रोड,<br>मु.पो.शिर्डी,ता.राहाता, जि.अहमदनगर | ४५० किलो | <u>२५/-</u> |

**ब) विडयाची पाने खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ. क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | अंदाजे वार्षिक मागणी | प्रती शेकडा दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.दिपक देवराम आहेर,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ४,००,००० नग | <u>६५/-</u> |
| ०२ | श्री.किशोर चित्ते,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | ४,००,००० नग | ७५/- |
| ०३ | श्री.योगेश भानुदास जाधव,<br>मु.पो.खैरी | ४,००,००० नग | ८०/- |

**क) पावडर मार्बल मूर्ती खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ. क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | ०३ नंबर मुर्ती ५० नग (उंची ७.५ इंच) | ०४ नंबर मुर्ती १०० नग (उंची ९ इंच) | ०५ नंबर मुर्ती ७५ नग (उंची १३.५ इंच) |
|---|---|---|---|---|
| | | प्रती नग दर रु. | प्रती नग दर रु. | प्रती नग दर रु. |
| ०१ | श्री.विरेश जैस्वाल,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | <u>१००/-</u> | <u>१४०/-</u> | <u>४४०/-</u> |
| ०२ | साई कृष्णा आर्ट,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता,जि.अ.नगर | १२०/- | १५०/- | ४८०/- |
| ०३ | साई इंटरप्रायजेस,<br>मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | २००/- | २५०/- | ७००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागासाठी आवश्यक असलेले फुटाणे, विडयाची पाने व पावडर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी उपरोक्त अ, ब व क तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले वार्षिक निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना याकामीचा पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक मंदिर विभाग)

---

०२ **राणशेणी व थापील गोवरी खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या बंद निविदा उघडून वार्षिक न्युनतम दर निश्चित करणेबाबत.**

मा.उपसमिती दि.१८/०२/२०१५चे सभेतील निर्णय क्र.३० नुसार माहे-एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये वर्षामध्ये द्वारकामाईचे पवित्र धुनीकरिता रानशेणी व थापील गोवरी खरेदी करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मंदिर विभागाचे दि.१६/०३/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत

वर्तमानपत्रात जाहिरात देवून बंद पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.०८/०४/२०१५ अशी अंतिम तारीख नमूद करण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा (दरपत्रके) जमा झालेल्या आहेत.

**अ) राणशेनी व थापील गोवरी कोटेशन.**

| अ.क्र | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी, मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव, जि.नाशिक (मो.७०३०३७४३८७) | ०२८७/दि.०३.०४.२०१५ |
| ०२ | श्री.वाल्मीक टीमा पवार, मु.पो.मोरशेवडी, ता.जि.धुळे (मो.८३९०७७५००३) | ०२८८/दि.०३.०४.२०१५ |
| ०३ | श्री.प्रभाकर चिंतामण चव्हाण, मु.पो.मालेगाव,जि.नाशिक (मो.८८५७०४११९०) | ०२८९/दि.०३.०४.२०१५ |
| ०४ | श्री.कैलास सुदाम राणे, मु.पो.लोंढे, ता.चाळीसगाव, जि.जळगाव (मो.८८०६३४८९०७) | ०२९०/दि.०३.०४.२०१५ |
| ०५ | श्री.योगेश संतोष सुर्यवंशी, मु.लुल्ले,पो.विराने,ता.मालेगाव,जि.नाशिक (मो.८४०८६९७०२) | ०२९१/दि.०३.०४.२०१५ |
| ०६ | श्रीसाईबाबा गोवरी विक्री केंद्र, प्रोप्रा.श्री.रविंद्र विजय देवरे, रा.पंचशील नगर, मा.कॅम्प, मालेगाव, जि.नाशिक (मो.९८२३८६५८८२/९८२३१३६६६१) | ०६४५/दि.०८.०४.२०१५ |

उपरोक्तप्रमाणे गोवरी खरेदीकामी प्राप्त झालेले ०६ कोटेशन्स आजचे उपसमिती समोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | गोवरी प्रकार | अंदाजे मागणी | दर प्रती किलो रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.संतोष मोतीराम सुर्यवंशी, मु.लुल्ले, पो.विराने, ता.मालेगाव, जि.नाशिक (मो.७०३०३७४३८७) | रानशेणी | १,१०,००० किलो | ६.२५ |
| | | थापील | २०,००० किलो | ६.२५ |
| ०२ | श्री.वाल्मीक टीमा पवार, मु.पो.मोरशेवडी, ता.जि.धुळे (मो.८३९०७७५००३) | रानशेणी | १,१०,००० किलो | ५.८० |
| | | थापील | २०,००० किलो | ५.८० |
| ०३ | श्री.प्रभाकर चिंतामण चव्हाण, मु.पो.मालेगाव,जि.नाशिक (मो.८८५७०४११९०) | रानशेणी | १,१०,००० किलो | ७.५० |
| | | थापील | २०,००० किलो | ७.५० |
| ०४ | श्री.कैलास सुदाम राणे, मु.पो.लोंढे, ता.चाळीसगाव, जि.जळगाव (मो.८८०६३४८९०७) | रानशेणी | १,१०,००० किलो | ६.५० |
| | | थापील | २०,००० किलो | ६.५० |
| ०५ | श्री.योगेश संतोष सुर्यवंशी, मु.लुल्ले,पो.विराने, ता.मालेगाव,जि.नाशिक (मो.८४०८६९७०२) | रानशेणी | १,१०,००० किलो | ५.९० |
| | | थापील | २०,००० किलो | ५.९० |
| ०६ | श्रीसाईबाबा गोवरी विक्री केंद्र, प्रोप्रा.श्री.रविंद्र विजय देवरे, रा.पंचशील नगर, मा.कॅम्प, मालेगाव, जि.नाशिक मो.९८२३८६५८८२/९८२३१३६६६१ | रानशेणी | १,१०,००० किलो | ५.७० |
| | | थापील | २०,००० किलो | ५.७० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर या आर्थिक वर्षामध्ये द्वारकामाईचे पवित्र धुनीसाठी आवश्यक असलेली रानशेणी व थापील गोवरी खरेदीकामी श्रीसाईबाबा गोवरी विक्री केंद्र, प्रोप्रा.श्री.रविंद्र विजय देवरे, रा.पंचशील नगर, मा.कॅम्प, मालेगाव यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक मंदिर विभाग)

---

०३ **द्वारावती भक्तनिवासस्थान विभागासाठी मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदीकामी प्राप्त निविदा उघडणेबाबत.**

व्दारावती विभागाकरिता आवश्यक ७२,००० नग मेडीमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,८५,०००/- पर्यंतच्या खर्चास मा.व्य.समितीच्या दि.२८,०८.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ६८८ नुसार मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.१३.०९.२०१४ रोजी इकडेस प्राप्त झालेला होता. त्यानुसार प्रथम दि.१८.१०.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक १८.१०.२०१४ ते २९.१०.२०१४ या कालावधीत

निविदा पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविली होती. त्यावेळी एकाही निविदाधारकाची निविदा प्राप्त न झाल्याने दि.०५.११.२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार दिनांक १३.१२.२०१४ चे मंजुर टिपणीनुसार दि.१७.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.१७.०१.२०१५ ते २७.०१.२०१५ या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. सदरचे खरेदीकामी पाच निविदांची विक्री झालेली होती. विक्री झालेल्या पाच निविदांपैकी तीन निविदा बंद पेटीत प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त निविदा दि.०२.०३.२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडल्या असता दोन निविदाधारकांच्या निविदा तांत्रिक दृष्टया अपात्र ठरलेल्या आहेत. त्यामुळे फेर निविदा प्रक्रिया करण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार व्दारावती भक्तनिवास विभागास आवश्यक मेडीमिक्स साबण खरेदीकामी दि.०७.०४.२०१५ चे मंजुर टिपणी अन्वये तिस-यांदा निविदा प्रक्रिया राबवुन वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुण निविदा विक्री करणेत आलेली आहे. को-या निविदेची किंमत रक्कम रु.२००/- मात्र अशी ठेवण्यात आलेली होती, तसेच निविदेसोबत लिफाफा क्रमांक १ मध्ये बयाणा रक्कम रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्रची लेखाशाखेत भरणा पावती अथवा राष्ट्रियीकृत बँकेच्या कोपरगांव, राहाता, शिर्डी शाखेवरील "Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi" यांचे नावे डिमांड ड्राफ्ट तसेच दुकान नोंदणी दाखला, व्हॅट टिन नंबर, पॅन कार्ड वगैरे कागदपत्रे व लिफाफा क्रमांक २ मध्ये मुळ निविदा दिनांक १८.०४.२०१५ पर्यंत मागणी करण्यात आलेली होती. मुदतीअंती दोन निविदांची विक्री झालेली आहे. मुदती अंती सदरच्या निविदांचे लिफाफे आवक विभागामार्फत खरेदी विभागाकडे प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव/ गांव | आवक क्रमांक/दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे.बाफणा जनरल स्टोअर्स, शिर्डी | १७६५/२३.०४.२०१५ |
| ०२ | मे.बाफणा एंटरप्रायझेस, शिर्डी | १७६६/२३.०४.२०१५ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून मागणी केलेल्या कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात येईल. कागदपत्रांची पुर्तता केलेल्या निविदाधारकांच्या मुळ निविदा उघडुन योग्य निर्णय घेता येईल.

व्दारावती भक्तनिवास विभागास आवश्यक असलेले मेडीमिक्स साबण खरेदीकामी प्राप्त निविदांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | साहित्याचा तपशील/ मागणी | मे.बाफणा जनरल स्टोअर्स, शिर्डी दर प्रती नग व्हॅटसह रु. | मे. बाफणा एंटरप्रायझेस, शिर्डी दर प्रती नग व्हॅटसह रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वडी) ७२,००० नग | २.५० | २.६० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास विभागासाठी आवश्यक असलेले ७२,००० नग मेडीमिक्स साबण खरेदीकामी मे.बाफणा जनरल स्टोअर्स, शिर्डी यांचे रु.२.५० प्रती नग (व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०४ **सेवा-सुविधा माहिती पत्रकाची छपाई करुन घेणेकामी प्रेसधारकाकडून आलेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

साईआश्रम भक्तनिवास या विभागात निवास करणा-या साईभक्तांना रूम बुकींग काऊंटर वरून रूमची चावी देते वेळेस रूममध्ये उपलब्ध असणा-या व परिसरात असलेल्या सुख-सुविधाचे माहीती पत्रक देणे कामी दि.२२/१२/२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदरची पत्रके छपाई कामी प्रायोगीकतत्वावर ४ महिण्याकरीता १०० नगाचे १ पॅड प्रमाणे १९०० पॅड छपाई कामी रू.४९,४००/- चे खर्चास दि.३०/०१/२०१५ च्या मा. त्रिसदस्य व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळालेली असून, प्रेसधारकाकडून दरपत्रके मागणी बाबतच्या प्रस्तावास दि.१६/०३/२०१५ मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरून एकूण १० प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/साईआश्रम भक्तनिवास/६३०७/२०१५ च्या पत्राने दि.०७/०४/२०१५ अखेर दरपत्रकाची मागणी करणेत आलेली होती.

**प्रस्ताव:-** एकूण १० प्रेसधारकांपैकी ०७ प्रेसधारकांनी दि.०७/०४/२०१५ अखेर मुदतीत सिलबंद लिफाफ्यात दरपत्रके सादर केलेली आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | प्रशासन शाखा आवक क्रमांक | आवक दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सावता प्रिन्टर्स, राहाता | ४९० | ०६/०४/२०१५ |
| २ | प्रसाद प्रिन्टर्स, कोपरगांव | ४९३ | ०६/०४/२०१५ |
| ३ | ओम प्रिन्टर्स, कोपरगांव | ५०९ | ०७/०४/२०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मे.अविराज पॅक्वेल, कोपरगांव | ४९१ | ०६/०४/२०१५ |
| ५ | मे.सिध्देश्वर (एस) भागवत प्रिन्टर्स, सर्जेपुरा, अ.नगर | २७१ | ०२/०४/२०१५ |
| ६ | माऊली प्रिन्टींग प्रेस, राहाता | ६०५ | ०७/०४/२०१५ |
| ७ | यशवंत मुद्रणालय, शिर्डी | ६०६ | ०७/०४/२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | दरपत्रकामधील मुळ दर प्रती पॅड रु. |
|---|---|---|
| १ | सावता प्रिन्टर्स, राहाता | २१.५० |
| २ | प्रसाद प्रिन्टर्स, कोपरगांव | २७.८९५ |
| ३ | ओम प्रिन्टर्स, कोपरगांव | २१.०० |
| ४ | मे.अविराज पॅक्वेल, कोपरगांव | २२.५० |
| ५ | मे.सिध्देश्वर (एस) भागवत प्रिन्टर्स, सर्जेपुरा, अ.नगर | १८.९० |
| ६ | माऊली प्रिन्टींग प्रेस, राहाता | २१.५० |
| ७ | यशवंत मुद्रणालय, शिर्डी | ३७.५०<br>३४.३५ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास या विभागात निवास करणा-या साईभक्तांना रूम बुकींग काऊंटर वरून रूममध्ये उपलब्ध असणा-या व परिसरात असलेल्या सोयी-सुविधाचे माहीती पत्रक देणेकामी प्रस्तावित छपाई करुन घेणेसाठी मे.सिध्देश्वर (एस) भागवत प्रिन्टर्स, सर्जेपुरा, अ.नगर यांचे प्रती पॅड रु.१८.९० मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

०५ **शिर्डी बसस्थानकाचे एक्सटर्नल इलेक्ट्रीकल व स्ट्रीट लाईट केबलकरीता आर.सी.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद–**

अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोट कलम (क) अन्वये मंदिराचे व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय–** दि.३१/०१/२०१५ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्रं ०४ (६) अन्वये शिरडी बसस्थानकांचे एक्सटर्नल इलेक्ट्रीक व स्ट्रीट लाईट केबलकरीता आर.सी.सी.पाईप टाकणे व चेंबर बाधंकाम करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करुणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.५,१३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्ताव-** शिर्डी बसस्थानकाचे इलेक्ट्रीक कामातील एक्सटर्नल हायटेशन केबल व स्ट्रीटलाईट केबलकरीता भूमीगत आर.सी.सी. पाईप लाईन टाकण्याचे कामासाठी वर नमुद मा. त्रिसदस्य समिती निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे. इमारतीचे समोरील बस पार्किंगचे मुख्य भागाचे ट्रीमीक्स क्रॉकटचे ६०% काम पूर्ण केले असुन उर्वरीत काम सुरु आहे. त्यामुळे इलेक्ट्रीक केबलकरीता आर.सी.सी. पाईप टाकणेचे काम प्राधान्याने पुर्ण करणे आवश्यक आहे. याकामी इकडिल दि.०२/०३/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या, निविदा सुचनेनुसार कोरे निविदा फॉर्म विक्री दि.२३/०३/२०१५ ते ३१/०३/२०१५ अखेर व सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.०२/०४/२०१५ अखेर होती.

**अ)** विहीत मुदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

| अ. नं. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री. गोसावी हितेंद्र डी,साकुरी ता.राहाता | ३१.०३.२०१५ |
| ०२ | श्री. कुलकणी गणेश श्रीकृष्ण,राहाता | ३१.०३.२०१५ |
| ०३ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ३१.०३.२०१५ |

**ब)** विहीत मुदतीत खालीलप्रमाणे ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. गोसावी हितेंद्र डी,साकुरी ता.राहाता | ०००२७२ | ३१.०३.२०१५ |
| ०२ | श्री. कुलकणी गणेश श्रीकृष्ण, राहाता | ०००२७४ | ३१.०३.२०१५ |
| ०३ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ०००२७३ | ३१.०३.२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

**निविदा रक्कम रु.४,८८,४००/-.**

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | श्री. गोसावी हितेंद्र डी,साकुरी ता.राहाता | निविदा रकमेवर ४०% जास्त |
| ०२ | श्री. कुलकणी गणेश श्रीकृष्ण, राहाता | निविदा रकमेवर ३९ % जास्त |
| ०३ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | **निविदा रकमेवर ३५ % जास्त** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानकाचे एक्सटर्नल इलेक्ट्रीकल व स्ट्रीट लाईट केबलकरीता आर.सी.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधकाम करुन घेणेकामी श्री.एस.जी. गायकवाड, राहाता यांचे निविदा रकमेवर ३५% जास्त मात्र हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही -बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल फर्नीचर खरेदीकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडणेबाबत.**

श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाने त्यांचे विभागात सध्या असलेली फर्निचर वापरुन खराब झालेली आहे तसेच काही वॉर्डमध्ये रुग्णांची संख्या वाढल्यामुळे सध्या त्यांचेकडे असलेली फर्निचर कमी पडत आहे. त्यामुळे त्यांनी नवीन हॉस्पिटल फर्निचरची मागणी केलेली आहे. सदर मागणीबाबतचे सविस्तर तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.७,३३०००-/- इतका खर्च अपेक्षित आहे. दि.०६/०१/२०१५ रोजीचे मा. उप समिती सभेत श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरिता हॉस्पिटल फर्नीचर खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.७,३३०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसादर मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे प्रसिध्दी विभागामार्फत वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच उत्पादक कंपन्या / पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/०२/२०१५ ते दि.२३/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२७/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०३ निविदा तर मुंबई येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Axenis Labs Pvt Ltd., Nashik | 27/02/2015 |
| 2. | M/s. Medimed Industries, Thane | 27/02/2015 |
| 3. | M/s. Methodex Systems Ltd., Pune | 27/02/2015 |
| 4. | M/s. Austin Health Care. Pune | 27/02/2015 |
| 5. | M/s. Janak Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 27/02/2015 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद तांत्रीक निविदा संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड विभागाकरीता हॉस्पिटलकरीता हॉस्पिटल फर्नीचर खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद तांत्रिक निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. उघडणेत आलेल्या निविदांमधील पात्र निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा उघडणेबाबत पुढील उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही -वैद्यकीय संचालक)

---

०७. **वाहन क्र. एमएच-१७, ए.जी. २४१८ चे दुरुस्ती खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील क्र.एमएच-१७/एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहीका) या वाहनाचा वापर श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणारे रुग्ण डिस्चार्ज झालेनंतर घरी सोडविणे कामी तसेच पुढील उपचाराकरीता बाहेरील रुग्णालयात घेवुन जाणे कामी होत आहे. वाहन विभागाकडील दि.०२/०३/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, सदर वाहनाचे गिअर बॉक्स दुरुस्तीचे काम एडीएम मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रु.२४,५००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर वाहन एडीएम मोटर्स प्रा.लि.,अहमदनगर येथे पाठविण्यात आली होती.

एडीएम मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांनी दि.२३/०३/२०१५ रोजीचे पत्राने, संस्थान रुग्णवाहीका क्र.एमएच-१७/ एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहीका) चे गिअर बॉक्स दुरुस्ती कामाकरीता दि.२८/०२/२०१५ रोजीचे कोटेशनमध्ये रु.२३,२८४/- मात्र खर्चाचे कोटेशन दिले होते. तरी गाडीचे काम चालु असतांना 2nd , 3rd , 4th Gear, Top Cover, Gear Box Grg. इ. पार्ट खराब आढळलेने बदली करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर पार्ट बदली करुन दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आले होते. त्यानंतर दि.१३/०४/२०१५ रोजी वाहनाचे डिफ्रेंशिअल शाफ्टमधुन ऑईल लिकेज होत असलेचे आढळलेने तातडीने एडीएम मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांचेकडून वाहनाची तपासणी केलीअसता, अनुशंगिक नवीन स्पेअरपार्ट बदली करुन दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आले. याकामी आलेल्या एकुण खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | बिल नं. / दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | एडीएम मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ५५५ व ५५७/ दि.२३/०३/२०१५ | ३०,०००.०० |
| ०२ | एडीएम मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | --- / दि.१३/०४/२०१५ | ५,२९५.०० |
| | | **एकुण रक्कम (रु.)** | **३५,२९५.००** |

वरील प्रमाणे वाहनाचे गिअर बॉक्स दुरुस्तीचे कामाकरीता रु.३५,२९५/- (अक्षरी रक्कम रु. पस्तीस हजार दोनशे पंच्यान्नव मात्र) खर्च आलेला असुन दुरुस्ती कामानंतर निघालेले जुने स्पेअर पार्ट वाहन विभागात जमा आहे. सदर बिलाची नोंद दुरुस्ती रजिस्टरमध्ये घेण्यात आलेली आहे.

तरी वाहन क्र.एमएच-१७/एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहीका) या वाहनाचे गिअर बॉक्स दुरुस्ती कामाकरीता आलेल्या रु.३५,२९५/- (अक्षरी रक्कम रु. पस्तीस हजार दोनशे पंच्यान्नव मात्र) खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्र.एमएच-१७/एजी-२४१८ (टाटा विंगर रुग्णवाहीका) या वाहनाचे गिअर बॉक्स दुरुस्ती कामाकरीता आलेल्या रु.३५,२९५/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी.**

**तसेच यापुढे अशा प्रकारची कामे करुन घेणेपूर्वी या क्षेत्रातील तज्ञांकडून माहिती घेण्यात येऊन, सदर कामे करुन घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली**

(कार्यवाही -वाहन विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईबाबा हॉस्पिटलचे मेन पॅनेलमधील सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल,श्री साईनाथ रुणालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भाग-०१ व ०२ याठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून उच्च दाबाची वीज घेऊन तिचे कमी दाबात रुपांतर करण्यासाठी सबस्टेशनची उभारणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर प्रत्येक झोन मध्ये जनरेटर बसविलेले आहे. या दोन्ही सप्लायच्या नियंत्रणाकरीता प्रत्येक सबस्टेशनमध्ये ॲटोमॅटीक पॅनेल डिस्ट्रीब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहे. यापैकी श्री साईबाबा हॉस्पीटलचे मेन पॅनेलमध्ये सिमेन्स कंपनीचे काही ब्रेकर बसविण्यात आलेले आहे. या ब्रेकरमार्फत सप्लाय कंट्रोल केला जातो. हे ब्रेकर खराब झाल्यास किंवा त्याचे पार्ट जळाल्यास ते रिपेअर होऊ शकत नाही. त्वरीत त्यामुळे ते तातडीने बदली करणे गरजेचे असते. हे ब्रेकर जर आपल्याकडे उपलब्ध नसतील तर बराच काळ पुढील सप्लाय खंडीत होऊन रुग्णांची गैरसोय होऊ शकते. ऑपरेशमध्ये व्यत्यय येऊ शकतो व रुग्णाचे प्राणावर बेतू शकते.तसे होऊ नये म्हणून सिमेन्स कंपनीचे सध्या फक्त दोन प्रकारचे ब्रेकर आपल्याकडे स्टॅंडबाय असणे गरजेचे आहे.

सदरचे ब्रेकर खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | ठिकाण | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | साईनगर जनरेटर व एमएसईबी इनकमर-२ व ३ | ACB, Make Siemens, Rating 2000 A, 4 Pole, Type : EDO 3 W L 1220-2FG 45-4GN2 Z=F23, F40, K07, 3040 S05 WL-II-2000N | ०१ नग. | रु.५,०७,०२०/- | रु. ५,०७,०२०/- |
| २) | साईनगर ५०० केव्हीए जनरेटर इनकमर-१ व इनकमर-४ | ACB, Make Siemens, Rating 1000 A, 4 Pole, Type : EDO 3 W L 1110 – 3 FG 45-4GN2 Z=F23, F40, K07, T40, S05 WL-I-1000S | ०१ नग. | रु.३,७०,६२०/- | रु. ३,७०,६२०/- |
| | | | | एकुण रक्कम :- | रु. ८,७७,६४०/- |
| | | | | वॅट १२.५% | रु. १,०९,७०५/- |
| | | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ९,८७,३४५/-** |

उपरोक्तप्रमाणे ब्रेकर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ९,८७,३४५/- खर्च अपेक्षित आहे. ब्रेकर खरेदी करणेकामी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन ई-टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे मेन पॅनेलमध्ये सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,८७,३४५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०९ **श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळांची विक्री करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

अधिनियम 2004 मधे 14(2) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

साईभक्त दर्शनासाठी आत दर्शन रांगेत येताना त्यांची संरक्षण विभागामार्फत तपासणी करुन साईभक्ताकडील नारळ फळे प्रवेश द्वार 01, 02, 03, 04 इ. ठिकाणी काढले/ जमा केली जातात आणी त्यानंतरच साईभक्तांना आत दर्शन रांगेत सोडले जाते. मंदिर परिसरातील प्रवेशद्वारावर जमा होणारी नारळ फळांची जुने साईप्रसाद इमारत या ठिकाणी साठवण करुन संस्थानच्या दैनंदीन वापरा व्यतरिक्त शिल्लक राहिलेल्या नारळ फळांची बगीचा विभागामार्फत विक्री करण्यात येते.

श्री इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगांव यांना रु.6/- (प्रती नग) नारळ याप्रमाणे दिनंाक 30/12/2014 ते दिनांक 30/06/2015 या कालावधीसाठी टेंडर देण्यात आलेले आहे. त्यांची टेंडर संपण्याचा कालावधी जुन-2015 आहे. मागील वर्षी 10 लाखापेक्षा जास्त रक्कम असल्यामुळे जुलै-2014 ते जुन-2015 अखेर नारळ फळाची विक्री करणेकामी कोर्टाची मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु सध्या दिनांक 30/12/2014 ते दिनांक 31/03/2015 अखेर एकुण रु.2,69,100/- मात्र रक्कमेची नारळ फळे विक्री करण्यात आली आहे. तरी सदरची रक्कम रु. दहा लाखापेक्षा अधिक नसल्याने व नारळ हे नाशवंत फळ असल्यामुळे कोर्टाची परवानगी घेण्याची आवश्यकता वाटत नाही.

नारळ फळे विक्री करणेकामी मंजूरी घेणे, वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निवीदा मागविणे, सदर निवीदा मा. उप समितीचे सभेत व्यापाऱ्यांसमोर वाटाघाटीत उघडणे, ऑर्डर देणे, इ. कामात वेळ जाणार असल्यामुळे सदर टेंडरची प्रक्रिया लवकर करणे आवश्यक आहे.

समाधी मंदीरात दर्शनासाठी दर्शन रांगेत प्रवेश करतांना साईभक्तां कडून प्रवेश द्वार नं 01, 02,03,04 वर नारळ फळे काढून घेण्यात येतात / जमा करण्यात येतात. जमा केलेले नारळ फळे संस्थान कामासाठी सत्यनारायण पुजा, अभिषेक पुजा, प्रसादालय या ठिकाणी देवून शिल्लक राहिलेले नारळ फळांची विल्हेवाट लावणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून, निवीदा मागवून, उच्चत्तम दराने विक्री करणेसाठी माहे- जुलै-2015 ते जून-2016 या कालावधीसाठी टेंडर देता येईल.

प्रवेशद्वार नं. 01, 02, 03, 04 वर जमा झालेले नारळ फळांची संस्थान वापरा व्यतिरिक्त शिल्लक राहिलेले नारळ फळे यांची जुलै-2015 ते जुन-2016 अखेर टेंडर देणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देवून निवीदा मागवून उच्चत्तम दराने विक्री करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसराच्या 01, 02, 03 व 04 नं. प्रवेशद्वारांवर जमा झालेल्या नारळ फळांमधून संस्थान वापरा व्यतिरिक्त शिल्लक राहिलेल्या नारळ फळांची उच्चतम दराने विक्री करणेसाठी जुलै-2015 ते जुन-2016 अखेर टेंडर देणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदा मागविणेत याव्या, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभाग प्रमुख )

---

१० **ॲडव्होकेट श्री.ए.आर. गाडेकर यांची मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कोर्टातील चेंज रिपोर्टचे दाव्याची वकील फी बिल अदा करणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानने संस्थान मिळकतीचे संदर्भात मा. सहा.धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांचे कोर्टात खालील तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे 18 चेंज रिपोर्ट दाखल केले होते. सदरचे चेंज रिपेर्ट मध्ये मा. सहा.धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांचेकडून दि.04/08/2014 रोजी चौकशीचे कामी नोटीसा पाठविणेत आल्या होत्या. प्रस्तुत दि. 11/08/2014 रोजी कार्यालयीन टिपणी सादर करुन अहमदनगर येथील कोर्टातील प्रकरणे, संस्थानचे पॅनलवरील ॲड श्री ए.आर.गाडेकर हे कामकाज पहातात, त्यामुळे प्रस्तुतचे चेंज रिपोर्टमध्ये ॲड श्री ए.आर.गाडेकर यांना संस्थानचे वतीने कामकाज पहाणेस वकिलपत्र देता येईल अशा आशयाची टिपणी मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती. त्यास मान्यता मिळाल्यानंतर जा.नं. एसएसएस वशी-विधी/2707/2014 दि. 02/09/2014 व जा.नं. एसएसएस वशी-विधी/ 3520/ 2014 दि. 23/10/2014 रोजीचे पत्राने ॲड श्री ए.आर.गाडेकर यांना वकीलपत्र दिले व कामकाज पहाण्यास विनंती केली आहे.

प्रस्तुत चेंज रिपोर्ट मध्ये मा.सहा.धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांनी दि. 30/01/2015 रोजी खालील तक्त्यातील एकुण 18 चेंज रिपोर्टवर ऑर्डर करुन डिस्पोज केलेले आहेत.

| अ.क्र. | चेंज रिपोर्ट नंबर व दाखल तारीख | संस्थान मिळकत नंबर |
|---|---|---|
| 1 | 320/2005 दि. 07/09/2004 | सिटी सर्व्हे नं. 32 शिर्डी. |
| 2 | 532/2006 दि. 02/06/2006 | सर्व्हे नं. 6/61 शिर्डी. |

| | | |
|---|---|---|
| 3 | 256/2005 दि. 25/02/2005 | गट नं. 169 निमगांव – को-हाळे |
| 4 | 153/2007 दि. 25/02/2005 | सर्व्हे नं. 125/7 शिर्डी. |
| 5 | 158/2007 दि. 12/10/2006 | सर्व्हे नं. 125/8 शिर्डी. |
| 6 | 159/2007 दि. 12/10/2006 | सर्व्हे नं. 125/6 शिर्डी. |
| 7 | 403/2007 दि. 09/03/2007 | सर्व्हे नं. 55/15 शिर्डी. |
| 8 | 404/2007 दि. 09/03/2007 | सर्व्हे नं. 55/2 शिर्डी. |
| 9 | 405/2007 दि. 09/03/2007 | सर्व्हे नं. 55/34, 54/46 शिर्डी. बिल्डींग सेवाधाम. |
| 10 | 723/2005 दि. 10/08/2005 | शिर्डी, समाधी मंदिर, सभामंडप, साईनिकेतन ॲट दादर भक्तनिवास, हॉस्पीटल |
| 11 | 2/2004 | सर्व्हे नं. 2/2ब शिर्डी. |
| 12 | 317/2004 | गट नं. 317/4 निमगांव |
| 13 | 1054/2004 | मुव्हेबल प्रॉपर्टी फीक्स डिपॉझीट केप्ट इन नॅशनलाईज बँक. |
| 14 | 514/2004 | सर्व्हे नं. 6/2/1अ पैकी, 6/2/1ब, 6/2/1अ, 6/2/2अ/3, 6/1अ, 6/1ब, 6/2/2अ, 6/2/2ब, 6/2/2अ, 6/1ब/1अ, 6/2/2अ, 6/2अ/अ/11, 6/1अ/ 1ब शिर्डी. |
| 15 | 644/2008 | सर्व्हे नं. 6/2/2ब/3, 6/1ब/1पार्ट, 6/36, 6/1अ पार्ट, 6/36, 6/1अ/1 पार्ट, 6/1 शिर्डी. |
| 16 | 226/2004 | ओपन लॅन्ड सिच्युऐटेड निमगांव को-हाळे. |
| 17 | 645/2008 | सर्व्हे नं. 55/15 शिर्डी. |
| 18 | 1402/2008 | सर्व्हे नं. 6/61 शिर्डी. |

उपरोक्त 18 प्रकरणातील मा. सहा.धर्मादाय आयुक्त यांच्या ऑर्डरच्या सर्टीफाईड नक्कला ॲडव्होकेट श्री ए.आर.गाडेकर यांनी दि. 12/02/2015 रोजीचे पत्राने पाठविल्या आहेत. तसेच दि. 06/09/2014 रोजीच्या पत्रा प्रमाणे प्रति केस रु. 2000/- प्रमाणे वकील फी मिळावी म्हणून विनंती केली आहे. त्याप्रमाणे एकुण 18 चेंज रिपोर्टसाठी रु.2000/- प्रमाणे रु. 36,000/- वकील फी पोटी मिळणेस विनंती केली होती.

दि. 12/02/2015 रोजीचे पत्रावर दि. 19/02/2015 रोजी वकील फी अदा करणेकामी टिपणी सादर करण्यात आली होती प्रस्तुत टिपणीवरील आदेशा प्रमाणे ॲडव्होकेट श्री ए.आर.गाडेकर यांना प्रतिकेस रु.1000/- प्रमाणे रु.18,000/- वकील फी व खर्चासाठी रु. 2000/- असे एकुण रक्कम रु. 20,000/- मात्र त्यांना अदा केले आहे.

ॲडव्होकेट श्री ए.आर.गाडेकर यांनी दि. 01/04/2015 रोजीचे पत्राने उर्वरीत वकील फी ची रक्कम रु.16,000/- मिळणेस विनंती केली आहे. सदरचे पत्रावर दि. 25/04/2015 रोजी टिपणी सादर करुन रक्कम अदा करणेस मान्यता घेतली आहे. परंतू सदरची टिपणी रक्कम अदाई कामी लेखाशाखा विभागाकडे पाठविली असता त्यांनी सदर टिपणीवर "एकत्रीत फी रु. 25,000/- पेक्षा जादा असल्याने मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून प्रस्तावीत करावे" असे नमुद केले आहे.

ॲडव्होकेट श्री ए.आर.गाडेकर यांना मा.धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयातील 18 चेंज रिपोर्टचे दाव्याचे कामी वकील फी पोटी रक्कम रु. 20,000/- + रु.16,000 = रु. 36,000/- (अक्षरी रु.छत्तीस हजार मात्र) अदा करणेस कार्यात्तर मंजूरीसाठी सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, ॲडव्होकेट श्री.ए.आर. गाडेकर यांची मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कोर्टातील चेंज रिपोर्टचे दाव्याची रु.३६,०००/- मात्र वकील फीची रक्कम अदा करणेत आलेली असून या रकमेस कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**११ सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील कामांकरीता नविन एल.सी.डी. प्रोजेक्टर व लॅपटॉप खरेदी करणेस, त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

ध्वनीक्षेपण विभागाकडील फोटोग्राफी, व्हीडीओ शुटींग, लाईव्ह दर्शन (समाधी मंदिर) एलईडी स्क्रीन व टिव्हीबाबतचे कामकाज प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांचे नियंत्रणाखाली अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन मा. त्रिसदस्यीय समिती व मा. उपसमिती सभेचेवेळी प्रोजेक्शन करणेसाठी प्रोजेक्टर लावणे, संस्थानचे विविध विभागांचे कार्यक्रम, सण उत्सव, शैक्षणिक संकुलाकडील गॅदरींग इ. कामांसाठी प्रोजेक्टरची आवश्यकता असते.

तथापी, सद्यस्थितीत सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडे एकच प्रोजेक्टर उपलब्ध आहे. तसेच सदर प्रोजेक्टर हा जुन्या टेक्नॉलॉजीचा असुन, खराब झालेलाअसल्यामुळे चित्र अस्पष्ट दिसतआहे. त्यासाठी सद्यस्थितीतबाजारात नविन टेक्नॉलॉजी असलेले एल.सी.डी. प्रोजेक्टर उपलब्ध आहेत. सदर प्रोजेक्टरमुळे हॉलमधिल प्रकाशात देखिल स्पष्ट चित्र दिसत असल्यामुळे, सदर सोनी कंपनीचा प्रोजेक्टर खरेदी करावयाचा आहे. सदर सोनी कंपनीच्या एल.सी.डी.

प्रोजेक्टरची अंदाजे किंमत रुपये- ८,२५,०००/- मात्र इतकी आहे. तसेच सदर प्रोजेक्टरला जोडण्यासाठी डेल कंपनीचा आय-७ प्रोसेसर,८ जी.बी.रॅम,१ टेराबाईट एचडीडी हार्डडीस्क,डीव्ही. (फायरवायर) पोर्ट असलेला लॅपटॉप खरेदी करावयाचा आहे. सदर लॅपटॉपसाठी अंदाजे रक्कम रुपये- ७०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सोनी कंपनीच्या एल.सी.डी. प्रोजेक्टर अंदाजे किंमत रुपये- ८,२५,०००/- (रुपये- आठ लाख पंचवीस हजार मात्र) व डेल कंपनीचा लॅपटॉप अंदाजे किंमत रुपये- ७०,०००/- (रुपये- सत्तर हजार मात्र ) इतकी आहे. सदरचे येणा-या खर्चास मान्यतेसाठी तसेच सदरचा विषय मा. उप समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेच्या आदेशास्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील कामांकरीता नविन एल.सी.डी. प्रोजेक्टर व लॅपटॉप विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु.८,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

१२ **सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील लाईव्ह दर्शन संबंधी कामाकाजाकरीता यु.पी.एस.खरेदी करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

ध्वनीक्षेपण विभागाकडील फोटोग्राफी, व्हीडीओ शुटींग, लाईव्ह दर्शन (समाधी मंदिर) एलईडी स्क्रीन व टिव्हीबाबतचे कामकाज प्र.सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांचे नियंत्रणाखाली अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन संस्थानचे मंदिर परीसर, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम ) साईनिवास अतिथीगृह, टाटा स्काय लाईव्ह दर्शन, इंटनेट लाईव्ह दर्शन, व्दारावती भक्तनिवास, श्री साई आश्रम-१, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, नविनप्रसादालय, टी.व्ही. ९ या सर्व ठिकाणी श्रींचेसमाधी मंदिरातील लाईव्ह दर्शन दाखविले जाते. तसेच सदर ठिकाणी लाईव्ह दर्शन दाखविणेकामी एन.व्ही.आर, डी.व्ही.आर, डी. मॉडयुलेटर, स्वीचेस, ट्रान्समिटर, मिडीया कन्हरटर,कंट्रोल पॅनेलइ. उपकरणे बसविण्यात आलेली आहेत. परंतु काही वेळा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे, वरीलप्रमाणे उपकरणे बंद होतात. त्यामुळे लाईव्ह दर्शन प्रक्षेपण काही वेळे पुरते बंद होते. त्यासाठी लाईव्ह दर्शनकरीता लावण्यात आलेली उपकरणे अखंडीत चालु राहण्यासाठी एक नग ५ के.व्ही.ए. च्या यु.पी.एस. ची आवश्यकता भासत आहे. सदर ५ के.व्ही.ए. च्या यु.पी.एस. ची अंदाजे किंमत रुपये- २,००,०००/- (अक्षरी- दोन लाख रुपये मात्र) इतकी आहे. सदर यु.पी.एस. लावल्यामुळे लाईव्ह दर्शनचे कामांसंबंधीअडचणींचे निरसन होऊन,सदर कामकाज सुरळीत चालण्यास मदत होईल.

तरी सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील ५ के.व्ही.ए. चा यु.पी.एस. खरेदीकरणेस तसेच त्याकामी येणा-या खर्चास मान्यतेसाठी तसेच सदरचा विषय मा. उप समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेच्या आदेशास्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील लाईव्ह दर्शन संबंधी कामाकाजाकरीता विहीत पध्दतीने निविदा मागवून यु.पी.एस. खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

१३ **मंदिर व परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

मंदिर व परीसरात वरील संदर्भ क्र. १ ते ४ नुसार विविध विभागांचे मागणीप्रमाणे सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे तसेच इन्स्टॉलेशन करणे प्रस्तावित आहे. त्यास अनुसरुन मे. व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स प्रा.लि., नॉईडा यांनी संस्थानचे सीसीटीव्ही कंट्रोल सेलमध्ये सीसीटीव्ही यंत्रणाबसविलेली असल्यामुळे तसेच त्यांना एक वर्षाकरीता सीएएमसी कॉन्ट्रक्ट दिलेले असल्यामुळे त्यांचेकडुन सदर इन्स्टॉलेशन करणेकामीकमर्शियल प्रपोजलमागविणेत आलेले आहे. सदर प्रपोजल नुसार खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत.

1) श्रींचे समाधी मंदिराचे मागील बाजुस संस्थानमार्फत दक्षिणा व मोठया आकराच्या वस्तु स्वीकारणेकामी एक मोठया आकाराची हुंडी बसविण्यात आलेली आहे. साईभक्तांमार्फत सदर हुंडीमध्ये ब-याच वेळी कपडेअथवा इतर मोठया आकाराच्या वस्तु जमा झाल्यामुळे त्या वस्तुंमुळे सदर हुंडी भरते व त्यानंतर जमा होणारी रोख रक्कम अथवा सोने चांदीच्या वस्तु वर येतात. त्यामुळे सदर हुंडीमधुन कोणीही सहज हात घालुन सदर वस्तु / रक्कम काढु शकतात. याकरीता सदर ठिकाणी असलेल्या कॅमे-याचे लोकेशन बदलणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याकरीता सदर कॅमे-यांचे लोकेशन बदलणे प्रस्तावीत आहे.

2) बॉम्ब शोधक व नाशक पथक, शिर्डी यांनी मंदिर परीसरातील चार प्रवेशव्दारांवर नेमलेले पोलीस कर्मचारी चारही गेटने आंत प्रवेश करणा-या भावीकांची तपासणी करत नसल्यामुळे त्यासाठी पोलीस निरीक्षक, मंदिर सुरक्षा यांचे कार्यालयात गेट नं. १ते ४ या कॅमे-यांचे प्रक्षेपण सेट करणेबाबत मागणी केलेली असल्याने, सदर ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा इन्स्टॉल करावयाची आहे.

३) सामान्य प्रशासन विभाग यांनी प्रशासन शाखा शांतीनिवास इमारतीत काम करणारे संस्थानचे स्थायी व अस्थायी कर्मचारी तसेच सदर इमारतीत येणारे साईभक्त यांचे येणे- जाणेवर नियंत्रण ठेवणे व शांतीनिवास इमारतीत प्रशासकीय कार्यालयासह लेखाशाखेचे कार्यालय असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टिने इमारतीतचे तळ मजल्यावर व पहील्या

मजल्यावरील जिन्यामध्ये असे ०२ कॅमेरे बसविणेबाबत मागणी केलेली असल्याने सदर ठिकाणी २ सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे प्रस्तावीत आहे.

४) मंदिर परीसरातील सीसीटीव्ही कंट्रोल रुममधिल सुरक्षा यंत्रणेचा मुख्य उद्देश सुरक्षेच्या सदर्भात नियंत्रण ठेवणे असा आहे. कोणताही अनुचित प्रकार (आग लागणे, भक्तांची गर्दी, पाकीटमारी, आतंकवादी/दहशदवादी कार्यवाही वगैरे इ.) घडल्यास त्याबाबत तात्काळ सुचना संस्थान निरीक्षकास व उपस्थित दोन पोलीस कर्मचारी यांना कंट्रोल रुममार्फत कळविणे अपेक्षित आहे. परंतु असे निर्दशनास आले आहे की, काही साईभक्त पाकीटमारी , वादविवाद अथवा हरविलेले व्यक्तींचे शोधार्थ सीसीटीव्ही कॅमे-याचे व्हीडीओ फुटेज पहाणे अथवा फुटेज मिळणेची मागणी करतात. परंतु साईभक्तांना फुटेज दाखविल्यामुळे सदर कंट्रोल रुम व सीसीटीव्ही कॅमे-यांबाबत माहीती होते. त्याबाबत ते इतरत्र चर्चा करतात परीणामी कंट्रोल रुमची इतर भक्तांना माहीती होत आहे. सीसीटीव्ही कंट्रोल सेल हा संवेदनशील अत्यंत महत्वाचा भाग असल्याने सदर यंत्रणेची माहीती बाहेरील व्यक्तीस होणे उचित वाटत नाही. करीता मंदिर परीसरात काही प्रसंग (पाकीटमारी, वाद-विवाद, हरविलेल्या व्यक्ती) झाल्यास त्यांचे फुटेज संरक्षण विभागाचे सुरक्षा निरीक्षकास दाखविता येईल. त्याकरीता सदर सीसीटीव्ही कंट्रोल सेलचे ठिकाण सुरक्षा यंत्रणे व्यतिरीक्त कुणालाही माहीती होऊ नये यासाठी सध्याचे नियमावलीनुसार पोलीस यंत्रणा तसेच साईभक्त यांना सीसीटीव्ही फुटेज दाखविणेव देणेकामी एक क्लाईट सगणक जुने संरक्षण कार्यालयात स्थलांतरीत करणे गरजेचे असल्याने, त्यासाठी जुने संरक्षणकार्यालयात सीसीटीव्ही विभागाकडील एक संगणक संच फुटेज दाखविणेकामी स्थलांतरीत करणे प्रस्तावीत आहे.

तरी वरीलप्रमाणे अ.नं. १ते ४ प्रमाणे सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकामी ०२ नग कॅमेरे, ०१ नग संगणक संच, २० नग एग्झॉस्ट फॅन, युटीपी केबल्स, वायरींग वपीव्हीसी फिटींग तसेच सर्व्हीस चार्जस इ. साहीत्य खरेदी व तत्संबंधी कामांसाठी एकुण खर्च रुपये- २,७५,०००/- (अक्षरी- दोन लाख पंच्याहत्तर हजार मात्र ) + टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे. सदर येणा-या एकुण रुपये- २,७५,०००/- खर्चाबाबत मे.व्हेंन्टेज कंपनी यांना समक्ष बोलावुन, चर्चा वाटा घाटी करुन, निश्चित झालेल्या दर/खर्चास मान्यता द्यावी किंवा कसे याबाबत पुढील आदेश होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या मंदिर परिसरामध्ये नवीन सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीचे काम चालू आहे व त्यामध्ये प्रस्तावित ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेचा समावेश असल्यामुळे सदरहू प्रस्ताव अमान्य करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

१४ **गुरुस्थान निंबवृक्षाभोवती मार्बलचा कठडा करणेबाबत.**

**साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना-** श्री क्षेत्र शिर्डी येथील श्री गुरूस्थान मंदिरालगत असलेल्या पवित्र निंबवृक्षाच्या बुंधाच्या/खोडसच्या लगत श्री च्या पादुकांकरीता पुरातन वास्तुतज्ञ डॉ. गोरक्षकर मुंबई व आर्किटेक्ट श्री. राहुल चेंबरकर, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री गुरूस्थान मंदिर घडीव दगडामध्ये तयार करणेत आले आहे.

श्री गुरूस्थान मंदिरालगतचे निंबवृक्षास पाणी देणेसाठी निंबवृक्षास साधरणताः ४.५० मीटर अंतरावार पूर्व व दक्षिणबाजूला चर घेण्यात आलेला असून त्यामधुन झाडाला पाणी देण्यात येते. तसेच निंबवृक्षाचे बाजूचे ५.५० x ५.५० मी. या साईजचा भाग मूळ जमीन, मातीचा ठेवण्यात आलेला आहे. अधिक्षक, मंदिर विभाग यांचेकडील दि.२४/०२/२०१५ रोजीची टिपणी अन्वये, निंबवृक्षाची मुळे बाहेर दिसून येत असल्याने निंबवृक्षाचे तळाशी असलेल्या मातीच्या ओटयाला बाहेरील बाजूने ०१ फुट उंचीची मार्बल पट्टी बसवून मिळणेबाबत कळविले आहे. याकमी ०१ फुट उंचीचा मार्बल मध्ये कठाडा तयार करता येईल.

**प्रस्ताव–** गुरूस्थान मंदिरलगतचे निंबवृक्षाला वेळोवेळी पाणी देण्यात येते. निंबवृक्षाच्या खोडाला लावण्यात आलेली माती पाण्यामुळे ओघळुन खाली येवू नये यासाठी निंबवृक्षाच्या ओटयाचे लेव्हल पासुन ०१ फुट ऊंचीचे व ०४" जाडीचे विट बाधंकाम करून साईडने व टॉपेला मार्बल बसवून मार्बलचा कठडा तयार करून आतील भागात स्लोपींगमध्ये माती टाकता येईल, त्यामुळे झाडाच्या मुळया झाकल्या जातील व मुळयांचे संरक्षण व संवर्धन होईल.

उपरोकत मागणी केलेनुसार निंबवृक्षाचे बाजुने ओटयाचे लेव्हल पासून ०१ फुट ऊंचीचा मार्बलमध्ये कठडा तयार करणेकामी खालीलप्रमाणे खर्च येईल.

**अ) मटेरीयल खर्च –**

| अ.नं | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | सिमेंट | ०६ | गोणी | ३००/- | १८००.०० |
| २. | ग्रीन मार्बल २५ एम.एम जाडी | २०१ | चौ.फुट | ५०/- | १००५०.०० |
| ३. | वाळू | ०.२५ | ब्रास | १८००- | ४५०.०० |
| ४. | विटा | ३३० | नग | ४.०० | १३२०.०० |
| | | | | **एकुण रूपये -** | **१३,६२०.००** |

ब) मजुरी खर्च –

| अ.नं | कामाच तपशिल | परिमाण | एकक | दर | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ इंच जाडीचे मार्बल बसविणे (दोन साईड व टॉपला) | २१३ | र. फुट | ३५/- | ७,४५५.०० |
| ०२ | टॉप मार्बला मोल्डिंग करणे. | १४२ | र.फुट | ५०/- | ७,१००.०० |
| ०३ | विट बांधकाम प्लास्टर व ड्रेसिंग काम विभागामार्फत करणे-<br>गंवडी-०१<br>मदतनीस-०२ | ०३<br>०६ | दिवस<br>दिवस | २९७/-<br>४८३.२०/- | ८९१.००<br>२८९९.२० |
| | | | | एकुण रूपये- | १८,३४५.२० |
| | | | | एकुण खर्च (अ+ब) | १३,६२०.०० |
| | | | | पूर्णांकित रक्कम रु. | ३१,९६५.०० |

उपरोक्तप्रमाणे निबंवृक्षाचे बाजूने मार्बलच्या कठडयांचे बांधकाम करणेकामी रक्कम **३१,९६५/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त कामाकरीता आवश्यक ग्रीन मार्बल इकडील विभागाकडे उपलब्ध असलेल्या मटेरीअल वापरता येईल.

तरी वरीलप्रमाणे गुरूस्थान येथील निंबवृक्षाचे बाजूने मार्बलच्या कठडयाचे बांधकाम करणेकामी येणारे रक्कम रू ३१,९६५/- मात्रचे खर्चास तसेच मार्बल बसविण्याचे व मोल्डींगचे कामासाठी मजूरी ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरूस्थान येथील निंबवृक्षाचे बाजूने मार्बलच्या कठडयाचे बांधकाम करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३१,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१५ **श्री साईप्रसादालय इमारतीचे दक्षिणेकडील बाजूस असलेल्या कर्दळी व गुलाबाच्या झाडांची बाग काढून त्याठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोट कलम (1) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** सन २००७ पासून श्रीसाईप्रसादालय हि इमारत साईभक्तांना प्रसादभोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर इमारतीचे दक्षिणेकडील बाजूस सुशोभिकरणासाठी त्यावेळी कर्दळची व गुलाबाची बाग बसविलेली होती. सध्या कर्दळीच्या झाडांची मोठया प्रमाणावर वाढ झालेली असल्याने या ठिकाणी साफसफाई करणे अडचणीचे झालेले असल्याने या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता प्रसादालय विभागाने उपरोक्त परिपत्रकान्वये कळविलेले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईप्रसादालय विभागाचे मागणीनुसार त्यांनी नमूद केलेल्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी इकडील विभागामार्फत सन २०१३-२०१४ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.१,४३,१४६/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम तातडीने पूर्ण करावयाचे असल्याने, खालील दोन पर्यायांपैकी एका पर्यायानुसार काम करुन घेता येईल.

1. सध्या श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे पश्चिम बाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणारे ठेकेदार मे.ए.एस. कन्सक्ट्रशन, औरंगाबाद यांचेकडून जा. क्र. एसएसएसटी /बांधकाम/५०७१/ २०१४, दि.१५/०१/२०१५ रोजीचे कार्यादेशातील मंजूर दराने करुन घेता येईल. याकामी अंदाजे रक्कम रुपये १,०१,६३४/- मात्र खर्च येईल.
2. सदरहू काम करणेसाठी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागवून काम करुन घेता येईल.

तरी श्रीसाईप्रसादालय इमारतीचे दक्षिण बाजूस असलेली कर्दळी व गुलाबाची बाग काढून त्या जागेवर पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम वरील पर्याय क्र. ०१ किंवा ०२ नुसार करणेबाबत निर्णय होणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीचे दक्षिणेकडील बाजूस असलेल्या कर्दळी व गुलाबाच्या झाडांची बाग काढून त्याठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र.०१ नुसार कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,०१,६३४/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१६ **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७, ८८ मध्ये साईप्रसादालयातील कर्मचा-यांची दुचाकी वाहनांकरिता पार्किंग शेड तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे,अशी तदतुद आहे.

**प्रस्तावना-** श्री साईप्रसादालय मागील बाजूस (उत्तर बाजूस) असलेली कर्मचारी पार्कींग शेडच्या जागी नविन बायोगॅस प्लांट उभारणेत येत आहे. त्यामुळे प्रसादालयाचे पश्चिम बाजूस नव्याने मॅकेनिकल व बांधकाम विभागामार्फत पार्कींगची सोय करणेबाबत दि.०३/०३/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो ा. यांचे कक्षामध्ये समक्ष चर्चा झाली असल्याचे संरक्षण विभागाने जा.नं.१७२९/२०१५ दि.०५/०३/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये इकडील विभागास पुढील कार्यवाहीस्तव कळविले आहे.

**प्रस्ताव–** त्यास अनुसरुन श्रीसाईप्रसादालयाचे पश्चिम बाजूस मौजे निमगांव- को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.८७, ८८ मध्ये कर्मचा-यांकरिता अंदाजे २०० टु व्हिलर पार्कींग करता येतील इतक्या क्षमतेचे १३५'x२०' मापाचे दोन पार्कींग शेड उभारता येईल. याकरीता सन २०१३ – १४ च्या जिल्हा दरसुची नुसार सोबतच्या अंदाजपत्रकाप्रमाणे रु.९,८१,६३३/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारा रक्कम रु.९,८१,६३३/- मात्रचे खर्चास व सदरहू कामी विहीत पध्दतीने ई -निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७, ८८ मध्ये साईप्रसादालयातील कर्मचा-यांची दुचाकी वाहने लावणेकरीता पार्किंग शेड तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,८१,६३३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१७ **साई आश्रम भक्तनिवास येथे मेन्टेनन्स कामासाठी मटेरीअल खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (त्र) अन्वये "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे'' अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन सदर प्रकल्प दि.११/०४/२०१३ पासून साई भक्तांकरीता खुला करण्यात आलेला आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत प्रकल्पातील इमारतीचे बांधकाम देणगीदाखल करणेत आले आहे. सदर इमारतीचे बांधकामाकरीता त्यांचेमार्फत ठेकेदार पार्श्वनाथ डेव्हलपर्स, दिल्ली यांची नियुक्ती करणेत आली होती. ठेकेदार यांचा या कामाचा दोषदायीत्व कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेला आहे. सदरचा दोषदायीत्व कालावधी संपुष्टात आलेपासून सदर प्रकल्पाचे व इमारतींचे मेन्टेनन्स संस्थानमार्फत करण्यात येत आहे. साई आश्रम भक्तनिवास येथे एकूण १५३६ रूम्स आहे. त्यामध्ये सततच्या वापराने रंगकाम, दरवाजे इ. मेन्टेनन्स कामे निघत असतात. भकतांना तातडीने सेवा-सुविधा पुरविणेकामी सदरची कामे तातडीने करणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव:** उपरोक्तप्रमाणे मेन्टेनन्सकामी आवश्यक मटेरिअल व त्यासाठीचे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**A) Paint Material:**

| Sr. No. | Details of Material | Qty. | Unit | Approx. Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Luster Paint (Asian) - Oil base (White) (20 Lit. X 13 Buckets). | 260.00 | Lit. | 215/-. | 55,900/- |
| 02) | Wall Care Putty (Asian-Fine) (40 Kg. X 25 Bags). | 25.00 | Bags | 900/-. | 22,500/- |
| 03) | Tractor Acrylic Oil Bound Distemper (Asian- White) (20kg X 20 Buckets). | 400.00 | Kg. | 50/-. | 20,000/- |
| 04) | Oil Paint - Asian (Apcolite) (White) (20 Lit. X 5 Buckets). | 100.00 | Lit. | 230/-. | 23,000/- |
| 05) | Oil Paint – Asian (Apcolite) (Golden Brown) (20 Lit. X 2 Buckets). | 40.00 | Lit. | 230/-. | 9,200/- |
| 06) | Turpentine. | 100.00 | Lit. | 90/-. | 9000/- |
| | **Total Amount (A):** | | | | **1,39,600/-** |

**B) Flush Door & Hardware Fittings:**

| Sr. No. | Details of Material | Qty. | Unit | Approx. Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Water Proof Flush Door – (Anchor Solid Wood, Century Solid Wood, Regency Solid Pine Wood) 80" X 30" (5 Nos. X 16.67 Sq.ft) | 83.35 | Sq.ft | 160/-. | 13,336/-. |
| | 80" X 26" (40 Nos. X 14.45 Sq.ft) | 578.00 | Sq.ft | 160/-. | 92,480/-. |
| 02) | BTC Patti (Ghana Teak)-1-1/2" X 1/2". | 1000.00 | Rft. | 9/-. | 9,000/-. |
| 03) | SS Hinges (Heavy Duty) - 4" X 12. | 200.00 | Nos. | 40/-. | 8,000/-. |
| 04) | Fevicol (SH) (50 Kg.) | 50.00 | Kg. | 170/-. | 8,500/-. |
| 05) | SS Screw - 35X8 (01 Pkt.–100 Pcs.) | 10.00 | Pkt. | 250/-. | 2,500/-. |
| 06) | SS Screw - 20X8 (01 Pkt.–100 Pcs.) | 10.00 | Pkt. | 240/-. | 2,400/-. |
| 07) | Self Tapping Screw - 35 mm. | 5000 | Nos. | 2.20/-. | 11,000/-. |
| | **Total Amount (B):** | | | | **1,47,216/-.** |
| | **Total Amount (A + B):** | | | | **2,86,816/-.** |

तरी साई आश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्स करणेकामी आवश्यक उपरोक्त मटेरिअल खरेदी करणेकामी अ व ब मिळून एकूण रु.२,८६,८१६/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे मटेरिअल विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्ससाठी प्रस्तावात नमुद केलेले आवश्यक साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या एकूण रु.२,८६,८१६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, तसेच यापुढे आवश्यक साहित्यासाठी वार्षिक दर मागविणेत यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१८ **सी-आर्म मशीनचे दुरुस्तीबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयाचे ऑर्थो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 8711/2009 दि.14/07/2009 अन्वये एकुण रू. 11,00,000/- इतक्या रकमेत मे. एस.ए. मेडीकल सिस्टिम्स, औरंगाबाद यांचेकडून मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे एक सी. आर्म मशीन (MM 5E) खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन दि.25/02/2010 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 24/02/2011 रोजी संपला आहे. सदर सी आर्म मशिनचे दुरूस्ती व देखभाल करणेसाठी कंपनीकडे दि. 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीकरीता एकुण रू. 41,047/- इतक्या रकमेत वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर AMC कालावधीमध्ये दुरूस्ती व देखभालीकरीता असणारे स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या दि. 11/02/2015 रोजी कंपनी इंजिनीअर सी-आर्म मशिनचे देखभालचे नियमीत भेटी करीता आले असता त्यांनी सी-आर्म मशिनची तपासणी (PMS) करून सर्व्हीस रिपोर्ट क्र. 9458041167, दि. 11/02/2015 अन्वये मशिनचे काही स्पेअर पार्ट खराब झाल्यामूळे बदलण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. सदरकामी कंपनीने त्यांचे पत्र क्र. HCP-EST- 022015-036, दि. 18/02/2015 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 49,000/- (अक्षरी- एकोणपन्नास हजार मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या चर्चेअंती वरील स्पेअर पार्ट बदललेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर स्पेअर पार्ट करीता कंपनीने सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे. सदर सी-आर्म मशिनचे स्पेअर पार्ट करीता मे. सिमेन्स ली. मुंबई हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर सी-आर्म मशिनचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

तरी मे.सिमेन्स ली. मुंबई यांचेकडुन सी-आर्म मशिनचे स्पेअर पार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 49,000/- च्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे मे.सिमेन्स ली. मुंबई यांचेकडुन सी-आर्म मशिनचे स्पेअर पार्ट खरेदी करणेस व याकामी येणा-या एकूण रु.४९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

१९ **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुणालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी –

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते | | | | | | | |
| 1 | महांकाळे विठ्ठल काशिनाथ | पत्नी | Ca | डॉ . रेड्डी | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | 269092.00 | 264352.00 | |
| 2 | भाऊसाहेब आप्पा सुरळे | मुलगा | Dengue / fever | डॉ. दिपक साळुंके | निरामय हॉस्पिटल, पुणे | 25063.00 | 20503.00 | रुग्ण बाहेरगावी असतांनी आजारी पडले होते. |
| 3 | सदाफळ राजेंद्र सोपान | स्वत: | Blood Ca | डॉ. मेहरोत्रा | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | 343874.00 | 332114.00 | |
| 4 | बाबासाहेब काशिनाथ थेटे | स्वत: | Thigh Liposurgery | डॉ . देशमुख | रुबी हॉल, पुणे | 121262.00 | 116862.00 | |
| 5 | सतिष रामभाऊ खरात | मुलगी | Thrmbo Cytopenia | डॉ. साबळे | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | 2908.00 | 2908.00 | |
| 6 | जगन्नाथ देवराम डांगे | स्वत: | Tumour / Ca | डॉ. कुलकर्णी | टाटा मेमोरीयल हॉस्पि. , मुंबई | 174125.00 | 154665.00 | |
| 7 | शकिला सलीम शेख | पती | Ca | डॉ. रामनाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी | 104081.00 | 100061.00 | |
| 8 | पठाण नसरुल्ला नुरखाँ | पत्नी | Inflammatory Powel Disease | डॉ. शर्मा | रुबी हॉल, पुणे | 4946.00 | 4946.00 | |
| 9 | छाया पोपट शेलार | स्वत: | Ca-Breast | डॉ. रामनाईक | रुबी हॉल, पुणे | 15180.00 | 15180.00 | |
| 10 | मोहन बबन शिरसाठ | स्वत: | Nephritis / Renal Failure | डॉ. मेहरोत्रा | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक (लाईफ लाईन हॉस्पिटल नावात बदल) | 209373.00 | 203231.00 | |
| 11 | किशोर नाथा चव्हाण | मुलगी | Acute Gall Stone Pancreatis | डॉ राम नाईक | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | 38447.00 | 37607.00 | |
| 12 | विनायक माधव उदावंत | वडील | Panisinasitus With Orbetal Complications with uncontrolled Diabeties | डॉ. महाजन | निरामय हॉस्पिटल, पुणे | 246062.00 | 237932.00 | |
| 13 | शेषराव रावसाहेब चव्हाण | स्वत: | Ca -Tongue | डॉ. कुलकर्णी | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 251117.00 | 163805.00 | |
| 14 | अंजाबापू कोंडाजी कोते | वडील | Paralysis | डॉ. इंगळे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 116752.00 | 110592.00 | |
| 15 | जयश्री अंबादास गायकवाड | स्वत: | Chronic active hepatitis | डॉ. पोरवाल | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 96800.00 | 72600.00 | |
| 16 | रमेश सी. पुजारी | आई | Ca-breast | डॉ. हेमंतकुमार देवरे | प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी | 25292.00 | 21810.00 | |
| 17 | सांबारे दिलीप बाबासाहेब | पत्नी | Eye operation | डॉ. सोनटक्के | सुजाता बिरला हॉस्पिटल नाशिक | 50305.00 | 49785.00 | |
| 18 | मधुकर परसराम गव्हाणे | वडील | Ca – Pancreas | डॉ. गोरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | 214450.00 | 212690.00 | |
| | | | | | एकूण | **2309129.00** | **2121643.00** | |
| | ब. संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतु रेफर केलेले हॉस्पिटल | | | | | | | |
| 19 | अशोक नामदेव झुरंगे | स्वत: | Eye Operation | डॉ. सोनटक्के | दृष्टी आय इंस्टीटयुट, औरंगाबाद | 6796.00 | 5576.00 | सदर उपचार श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये होत नाहीत. |
| 20 | जगन्नाथ देवराम डांगे | स्वत: | Right Nasal Tumour / CA | डॉ. कुलकर्णी | परेल हॉस्पिटल, मुंबई | 188247.00 | 140070.00 | |
| | | | | | एकूण | **195043.00** | **145646.00** | |
| | क. संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले हॉस्पिटल | | | | | | | |
| 21 | विठ्ठल मानिकराव बर्गे | मुलगा | Dengue / Fever | डॉ. चव्हाण | चव्हाण हॉस्पिटल, पुणे | 19031.00 | 12408.00 | रुग्ण बाहेरगावी असतांनी आजारी पडले होते. |
| 22 | रामचंद्र बाबू दर्गे | पत्नी / मुलगी | Diabeites | डॉ. आनंद अबासणे | तिरुपती मेडिकल सेंटर मुंबई | 12623.00 | 10092.00 | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23 | सुनील सखाराम तांबे | वडील व आई | Paralysis | डॉ. आदित्य महामनकर | आदित्य नर्सिंग होम | 13512.00 | 9594.00 | रुग्णाचे वास्तव्य महाड येथे आहे |
| 24 | गुंजाळ भिमराज बबन | स्वतः व मुलगा | ACCIDENT | डॉ. संजय धुरजाद | सुदर्शन हॉस्पिटल, नाशिक | 32171.00 | 25129.00 | |
| 25 | बाबर सुजय आनंदराव | स्वतः | Hiatus Hernia | डॉ. भालेराव | Center for Laparoscopy surgery,Pune | 133728.00 | 99366.00 | |
| 26 | सुरेखा राजु गायकवाड | पती | Ca-Tongue | डॉ. राम नाईक | Hi Tech Hospital, Dahisar | 58310.00 | 35224.00 | |
| 27 | किशोर केशव क्षिरसागर - मुंबई कार्यालय | वडील | Asthama | डॉ. संजय पृथ्वी | Lifeline Hospital, Dombiwali | 36647.00 | 939.00 | |
| 29 | चोळके दिलीप बाळू | स्वतः | Accident | डॉ. किरण दोषी | कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ अर्थोपेडीक ड्रामा | 25858.00 | 20373.00 | |
| | | | | | एकूण | **331880.00** | **203125.00** | |
| | | | | | अ + ब + क एकूण | **2836052.00** | **2470414.00** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु. 24,70,414/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा.उप समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जादा वैद्यकीय बिलाचा परतावा संबंधीत संस्थान कर्मचा-यांना अदा करणेबाबतचा प्रस्ताव रु.२४,७०,४१४/- मात्र खर्चाचा असून उपसमितीला फक्त रु.१०,००,०००/- मात्र पर्यंतच्या खर्चाच्या प्रस्तावांवर चर्चा करुन निर्णय घेण्याचे अधिकार असल्यामुळे, सदरहू प्रस्ताव मा.त्रीसदस्य समिति सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२० **RV-RA Conduid चे तातडीने खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ निर्णय क्र.५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलुन, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकीय संचालक यांनी संबंधीत डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकीय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितासअदा करण्यात यावे, असे ठरले

**प्रस्ताविक:-** डॉ. विदयुतकुमार सिन्हा यांचे अंडर कुमारी मोरे वैशाली सुनिल वय – ११ महिने ओपीडी/ आयपीडी नं.- ५५२४९१/ १११७५६ हे रुग्ण ॲडमिट असून सदर रुग्णास TOF (Tetralogy of Fallot with Pulmonary atresia) चा आजार असून यात TOF रिपीयर करुन त्यात Right Ventrical ते Pulmonary artery पर्यंत RV-RA Valve Conduid वापरणारआहे. सदर पेशंटला जन्मतःचा Pulmonary Valve नसल्यामुळे Right Ventrical मधील ब्लड हे Pulmonary artery मध्ये जात नाही. त्यामुळे सदर रुग्णाकरिता तातडीने RV-RA Conduid खरेदीकरणे आवश्यक आहे.

सदर RV-RA Conduid बसविणेसाठी रु.१,०००००/- इतका खर्च येणार आहे.

**मागणी:-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी. एस ओ.टी १ यांची दि.०१/०४/२०१५ रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीरततसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ - २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-** तरी उपरोक्त प्रमाणे RV-RA Conduid खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.१,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी १ विभागामध्ये RV-RA Conduid चे तातडीने केलेल्या खरेदीस व त्याकामी आलेल्या रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२१ **श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागाकरिता instrument खरेदीबाबत.**

**प्रस्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागाने दि. १८/०९/२०१४ रोजीच्या मागणी पत्रकान्वये काही Instrument ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतानी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे त्यांनी खालील Instrument ची मागणी केलेली आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Name of Item | Qty. |
|---|---|---|
| 1 | Bulldog Forceps | 4 |
| 2 | Seth's Ovarian Clamp | 2 |
| 3 | Operative Histerscopy Sheath | 1 |
| 4 | Maryland type biclamp forceps for Laproscopy | 2 |

सदर Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडून ई– मेलव्दारे दर पत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांनी त्यांचे दि. ०१/०१/२०१५ रोजीचे ई - मेलपत्रान्वये दर कळविले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Bulldog Forceps | 4 | 1950.00 | 7800.00 |
| 2. | Seth's Ovarian Clamp | 2 | 1450.00 | 2900.00 |
| 3. | Operative Histerscopy Sheath | 1 | 8000.00 | 8000.00 |
| 4. | Maryland type biclamp forceps for Laproscopy | 2 | 4500.00 | 9000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **27700.00** |

उपरोक्त Instrument चे साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २७७००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी-** श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागाचे दि.१८/०९/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि.१२/११/२०१४) चे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –** सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतानी अडचणी निर्माण होतात. त्यामुळे त्यांनी खालील Instrument ची मागणी केलेली आहे. सदर Instrument ची विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी उपरोक्त Instrument खरेदी विहीत पद्धतीने कोटेशन मागवून करणेस व याकामी येणा-या रु. २७७००/- इतक्या खर्चास मान्यता असावी

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागाकरिता प्रस्तावात नमुद केलेले instrument विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.२७,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२२ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता Spirit खरेदीबाबत.**

दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता सन २०१३-२०१४ या वर्षाकरिता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (Part – A) खरेदीकामी एकुण ६६ पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यास तसेच याकामी येणा-या रु.३०,५२,८८,३५८/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार Trilok Agency, Shrirampur यांना पुरवठा आदेश क्र.७९२८ दि.१९/०३/२०१४ अन्वये पुरवठा आदेश दिला होता. सदर पुरवठा आदेशातील अटी व शर्तीमध्ये Spirit हे शिर्डी येथे पोहच करावे आणि पॅकींग हे ७५० ml चे असावे असा उल्लेख केलेला होता. परंतु Trilok Agency, Shrirampur यांनी सदर Spirit चे पॅकींग हे ६५०ml वर प्रति दर रु.७४.२५ देत असून सदर मटेरियलहे शिर्डी येथे पोहचकरत नव्हते. ही गोष्ट काही दिवसापुर्वी उघडकीस आलेली आहे. त्यामुळे सदर पार्टीचे Spirit हे सिलबंद करण्यात आलेले आहे.

सदर Spirit ची आवश्यकता असल्यामुळे सन २०१५-१६ चे पुरवठा आदेश देणेकामी कमीत कमी दोन ते तीन महिने लागु शकतील त्यासाठी एकुण ०३ पुरवठाधारकांनकडून दरपत्रक मागविण्यात आलेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Description | M/s. Om Medical & General Store, Shrirampur | | M/s. Shri Ram Medical, Kopergaon | | M/s. Snehal Pharma & Surgicals Pvt. Ltd., Nagpur | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Paking | Rate Per in Rs. | Paking | Rate Per in Rs. | Paking | Rate Per in Rs. |
| 1 | Spirit | 650 ml | 50.00 | 650 ml | 70.00 | 650 ml | 69.22 |

M/s, Om Medical & General Store, Shrirampur हे आपणास प्रति दर ५०.०० रुपयाने शिर्डी पोहच Spirit देण्यास तयार असल्याने दि.२१/०४/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. M/s. Om Medical & General Store, Shrirampur यांचेकडून Spirit खरेदी केल्यास संस्थानच्या प्रति बाटलीमागे २४.२५ रुपयांचा फायदा होईल. तसेच वरील तुलनात्मक तक्त्यानुसार M/s. Om Medical & General Store, Shrirampur यांचेच दर निम्नतम येतात. तसेच मागील दोन महिन्यांपासून Spirit चा साठा नसल्यामुळे दोन्ही हॉस्पिटलमध्ये गैरसोय होत आहे. तेव्हा तातडीची गरज पाहता सदरकामी M/s. Om Medical & General Store, Shrirampur यांना निम्नतम दर पाहता पुरवठा आदेश देता येईल.

तरी पुरवठाआदेशाप्रमाणे पुरवठा न केल्यामुळे Trilok Agency, Shrirampur यांना काळया यादीत टाकण्यास व M/s, Om Medical & General Store, Shrirampur यांचेकडून तातडीने Spirit खरेदी करुन नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२३ **कार्डीयाक ओ.टी.०२ मधील ओ.टी. लाईट व हार्ट लंग मशिनचे दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कार्डीयाक ओ.टी. 02 विभागाकरीता संदर्भ क्र .01 अन्वये एक H-LED OT Light व Heart lung with Heater Cooler मशिन मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. लि. मुंबई यांचेकडुन खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. सदर Heart lung with Heater Cooler मशिनचे नियमीत दुरूस्ती व देखभाली करणेसाठी कंपनीकडे दि. 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीकरीता कॅम्प्रेहेन्सीव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेत येत आहे. CMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्ट व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानाला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या दि. 10/04/2015 रोजी कार्डीयाक ओ.टी. विभागात अचानक शॉर्टसर्किट मुळे आग लागली होती. त्यामध्ये ओ.टी. लाईट व हार्ट लंग मशिनचे काही स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज जळुन खराब झालेल्या आहे. त्यानंतर सदर मशिनचे तपासणी करणे करीता कंपनी इंजिनीअर आले असता त्यांनी सदर ओ.टी. लाईट व हार्ट लंग मशिनची तपासणी करून त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट दि.12/04/2015 अन्वये काही स्पेअर पार्ट खराब झाल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने MCA-SR/NB/BLR/032/2015 Dt. 13/04/2015 & MCC-WR-069/15 Dt. 14/04/2015 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 7,86,889/- (अक्षरी- सात लाख शहाऐंशी हजार आठशे एकोणनव्वद मात्र ) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या चर्चेअंती वरील स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज बदललेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज हया विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. सदर ओ.टी लाईट व हार्ट लंग मशिन नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच आगीत जळालेल्या सर्व मशिन्स व इक्वीपमेंटस यांचा विमा कंपनीने पंचनामा केलेला असुन सदर विमा कंपनीकडुन जळालेल्या मशिन्स व इक्वीपमेंटसची रक्कम मिळणेस अंदाजे सहा ते बारा महिन्यांचा कालावधी लागु शकतो. तसेच उपरोक्त स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज करीता कंपनी प्रतिनिधी सोबत चर्चा करून दर कमी करता येईल असे मत आहे.

तरी मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. लि. मुंबई यांचेकडुन ओ.टी. लाईट व हिटर कुलर मशिनचे स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज खरेदी करणेस व त्यासाठी प्रत्यक्ष चर्चा करून येणाऱ्या अंदाजे एकुण रू. 7,86,889/- च्या खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा. लि. मुंबई यांचेकडुन ओ.टी. लाईट व हिटर कुलर मशिनचे स्पेअर पार्ट आणि ॲक्सेसरिज खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.७,८६,८८९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२४ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता दैनंदिन औषधे तातडीने खरेदीबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षीक औषधे सन २०१३-१४ करिता मा.त्रीसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्र. ५६४ अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि.२५/१०/२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. मा.उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा.त्रीसदस्य समिती सभा दि.१५/०३/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.२५४ अन्वये

दि.१९/०३/२०१४ रोजी एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण ३०,५२,८८,३५८/- रक्कमेचा वार्षीक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

दि.०९/१२/२०१४ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेत श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरिता सन २०१४-१५ या वर्षाकरिता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (PART- A) करिता पहिल्या निविदेस अनुसरुन ६०५ औषधांस निविदा प्राप्त झाल्या नव्हत्या त्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यापैकी ३०१ औषधांकरिता पुरवठा आदेश देण्यास व याकामी येणा-या रक्कम रु.२५२९२९०४/- चे खर्चास तसेच २९१ औषधांकरिता तिस-यांदा ई-निविदा मागविण्यास मान्यता मिळालेली आहे त्यानुसार ३०१ औषधांसाठी पुरवठा आदेश देण्यात येत आहे तर २९१ औषधांचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे प्रसिध्दी विभागामार्फत वर्तमान पत्रात तसेच सदरच्या जाहिरातीबाबत नामांकित कंपन्यांना ईमेलद्वारे पत्र पाठवुन देखील कळविण्यात आले आहे. उपरोक्तप्रमाणे जाहिरात वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस तसेच शासनाचे mahatenders.gov.in या संकेत स्थळावर टाकणेस तसेच नामांकित कंपन्यांना जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ईमेलद्वारे कळविण्यातआलेले आहे. त्यासअनुसरुन फक्त १ च निविदा प्राप्त झालेली असून सदर पुरवठाधारकांनीकाही सर्जीकल साहित्यकरिताच दर दिलेले आहेत. त्यामुळे उर्वरित साहित्य तातडीने खरेदी करावे लागणार आहे.

श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वीत झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत दयावी लागतात. सदर उपचाराअंतर्गत ॲडमिट होणा-या पेशंटला संपुर्ण औषधे व सर्जिकल साहित्य ही मोफत वापरावी लागतात. विविध वॉर्ड विभागातून वार्षीक औषधे खरेदी व्यतिरिक्त वेगवेगळया प्रकारची औषधांची मागणी केली जाते. परंतु ती वार्षीक खरेदीमध्ये मागणी नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| Sr. No. | Medicine Name | Reason | Qty. | App. Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PEPTONE (CODE NO.M028) 1 X 500 GM | | 1 | 1692 | 1692 |
| 2 | BLOOD CULTURE BOTTLES (BHI BOTTLE) PAEDIATRIC (LQ 003) – 10X20ML | | 30 | 932 | 27960 |
| 3 | BLOOD CULTURE BOTTLES (BHI BOTTLE) ADULT (LQ003A) – 10 X 70 ML | | 50 | 1158 | 57900 |
| 4 | ANTIBIOTIC MULTI DISC (PASTURE) GRAM POSITIVE A & B & C 1 X 10 | | 20 | 450 | 9000 |
| 5 | ANTIBIOTIC MULTI DISC (PASTURE) GRAM NEGATIVE 1 X 10 | | 20 | 450 | 9000 |
| 6 | ANTIBIOTIC MULTI DISC (PASTURE) URINARY TRACT INFECTION 1 X 10 | | 20 | 450 | 9000 |
| 7 | CULTURE SWAB STICKS WITH TUBE 1 X 100 | | 15 | 380 | 5700 |
| 8 | ANEROBIC CULTURE BOTTLE 20ML (SCRUCAP) | | 5 | 253.12 | 1265.6 |
| 9 | T RECOVERY KIT | | 50 | 80 | 4000 |
| 10 | PEDIATRIC O2 MASK PLAIN | | 20 | 200 | 4000 |
| 11 | NET CELL | | 5 | 100 | 500 |
| 12 | BONE CEMENT 20MG / 40 MG | | 2 | 400 | 800 |
| 13 | CM662G CENISTEEL 2, 45MM, 3/8 BLUNT POINT ROUND BODY LS 4 X 50 CM | | 2 | 10272.51 | 20545.02 |
| 14 | NW22 MERSILENCE TAPE, WITH NEEDLE, 48MM, ½ CIRCLE ROUND BODY BLUNT (HEAVY), DOUBLE NEEDLE, 30CM | | 5 | 1047.42 | 5237.1 |
| 15 | W21 MERSILENCE TAPE, POLYSTER FIBRE TAPE WITHOUT NEEDLE, 30CM | | 5 | 1047.42 | 5237.1 |
| 16 | MACCONKE AGAR (CODE NO/ M008) 1 X 500 | | 3 | 177 | 531 |
| 17 | MULLER HINTON AGAR (CODE NO. MO184) 1 X 500 GM | | 3 | 2100 | 6300 |
| 18 | RCM ANEROBIC MEDIUM (CODE NO. M149) 1 X 500 GM | | 3 | 2508 | 7524 |
| 19 | INJECTOR SYRINGE FOR USE IN CATHLAB CODE NO. 150 – FT-Q | | 10 | 250 | 2500 |
| 20 | GLASS MARKING PENCIL (DIAMOND TIP) | | 10 | 22.5 | 225 |
| 21 | GLASS MARKING PENCILS RD COLOUR (1X10) | | 10 | 22.5 | 225 |
| 22 | GLASS BEAKER 500ML | | 2 | 75 | 150 |
| 23 | GLASS BEAKER 100ML | | 2 | 75 | 150 |
| 24 | GLASS BEAKER 50 ML | | 2 | 75 | 150 |
| 25 | AMMONIUM OR POTASSIUM ALUM 500GM | | 2 | 2.5 | 5 |
| 26 | CLONICAL FLASK 1 LIT. GLASS | | 2 | 294.75 | 589.5 |
| 27 | SODIUM ELECTRODE CONDITIONER 125 ML | | 4 | 1000 | 4000 |
| 28 | DEPROTEINIZER 125 ML | | 4 | 1500 | 6000 |
| 29 | SODIUM POTASIUM ANALYSER FLUID PACK | | 4 | 6500 | 26000 |
| 30 | CYTO TEK FILTER PAPER (1ML) NO.4333 1 PKT=200 SHEETS | | 5 | 6750 | 33750 |
| 31 | CONICAL FLASK 250 ML | | 3 | 132.75 | 398.25 |
| 32 | CONICAL FLASK 500 ML | | 3 | 173.25 | 519.75 |
| 33 | CONICAL FLASK 100 ML | | 3 | 82.13 | 246.39 |
| 34 | TAB. ALLUPENT | | 200 | 3 | 600 |
| 35 | TAB. CALAPTIN | | 50 | 1.2 | 60 |
| 36 | H.D.CATHETER TRIPLE LUMEN | | 10 | 1500 | 15000 |
| 37 | SYRINGE 2 ML LL WITH 2611/2 NEEDLE | | 1000 | 1.5 | 1500 |
| 38 | INJ. ANTISNAKE VENON | | 100 | 350 | 35000 |
| 39 | TAB CUDO | | 50 | 150 | 7500 |
| 40 | TAB. NOOTROPIL | | 200 | 40 | 8000 |
| 41 | INJ. HEPATITIS B VACCINE | | 10 | 300 | 3000 |
| 42 | I/V SET (SUPREME) | | 1000 | 70 | 70000 |
| 43 | 4 QUIN DX DROP | | 300 | 18 | 5400 |
| 44 | NEPATOP DROP | | 50 | 80 | 4000 |
| 45 | TAB. CEPFODOXIME 200MG | | 1000 | 10 | 10000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 46 | TAB. RABEPRAZOLE WITH DOMPERIDONE | | 1000 | 3 | 3000 |
| 47 | SPREADERS (DENTAL MATERIAL ) | | 5 | 200 | 1000 |
| 48 | FLEXITIP LARIANGOSCOPE BLADE | | 6 | 850 | 5100 |
| 49 | REBREATHING MASK | | 5 | 200 | 1000 |
| 50 | ETO SIGNOLOCK PAPER | | 10 | 50 | 500 |
| 51 | DPX MOUTANT | | 3 | 150 | 450 |
| 52 | TAB MISOPROST 25MG | | 50 | 15 | 750 |
| 53 | TAB MISOPROST 100 MG | | 50 | 25 | 1250 |
| 54 | INJ NOOTRIL | | 200 | 20 | 4000 |
| 55 | ACCUCHECK STRIPS (AETIVE) | | 50 | 450 | 22500 |
| 56 | PAD. OXYGEN MASKE WITH NEBULIZER | | 100 | 150 | 15000 |
| 57 | T. GMM1 PLUS – GLIMIPRIDE 1MG + METFORMIN 500 + PIOGITAZOLE – 7.5 MG | | 500 | 8 | 4000 |
| 58 | T. GMM2 PLUS – GLIMIPRIDE 1MG + METFORMIN 500 + PIOGITAZOLE – 7.5 MG | | 500 | 10 | 5000 |
| 59 | T. GLIMPRIDE 1 MG | | 500 | 7 | 3500 |
| 60 | T. GMMV | | 500 | 9 | 4500 |
| 61 | T. SEPTRAN D.S | | 500 | 2 | 1000 |
| 62 | T. VOCARB O.2 M– VOGLIBOSE – 0.2+METFORMINE 500MG | | 500 | 8 | 4000 |
| 63 | T. VOCARB O.3 M – VOGLIBOSE – 0.3+METFORMINE 500MG | | 500 | 8.5 | 4250 |
| 64 | BACTIGAUZE | | 10 | 15 | 150 |
| 65 | TAB. TELMA – H | | 2000 | 12 | 24000 |
| 66 | TAB. SUPERMET – H (METAPROLOL + HYDRO CHLORTHAIZIDE12.5) | | 500 | 4 | 2000 |
| 67 | CALCIROL SACHET | | 100 | 9 | 900 |
| 68 | TAB. ATORAC ASP (ATROVASTATIN 10MG – ECOSPRIN – 75MG) | | 500 | 5 | 2500 |
| 69 | TAB. SURBEX XT (METYL COBALAMINE + MULTIVITAMIN) | | 1000 | 5.5 | 5500 |
| 70 | APPAVISE PFS SOLUTION GLASS SYRINGE | | 500 | 100 | 50000 |
| 71 | TAB. DERIPHYLLINE | | 3000 | 1 | 3000 |
| 72 | BLACK BULLDOG CLAMP | | 10 | 500 | 5000 |
| 73 | AUTOCLAVE TAPE | | 10 | 150 | 1500 |
| 74 | IN. CYCLO CAPRON | | 50 | 100 | 5000 |
| 75 | CENTILEN 7-0 8630 | | 2 | 7000 | 14000 |
| 76 | VIVA D SACHET | | 100 | 25 | 2500 |
| 77 | AMBU BAG | | 5 | 300 | 1500 |
| 78 | SENSORCAINE AMP | | 300 | 20 | 6000 |
| 79 | L.A. WIRE | | 10 | 4000 | 40000 |
| 80 | 4 QUIN APPLICAB | | 1500 | 20 | 30000 |
| 81 | DROP I -DEW | | 1000 | 80 | 80000 |
| 82 | TAB. RAMISTAR -H (RAMIPRIL + HYDROCHLORTHAIZIDE 12.5MG) | | 2000 | 5 | 10000 |
| 83 | TAB.STARPRES – H (METOPROLOL 25MG + HYDROCHLORTHAIZIDE 12.5MG) | | 2000 | 6 | 12000 |
| 84 | TAB. UNISTAR (ASPIRIN 75MG + ROUVASTATIN 10MG) | | 1000 | 8 | 8000 |
| 85 | AUTOCLAVE LABEL | | 100 | 60 | 6000 |
| | Total Amt. in Rs. | | | | **801510.71** |

सदर औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.८०१५११/- (अक्षरी रक्कम आठ लाख एक हजार पाचशे आकरा मात्र) इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशील तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियिमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवला आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयाकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजनेअंतर्गत एक वर्षासाठी मोफत उपचार घेणारे रुग्णांकरिता दयावयाची औषधे खरेदी करणे आवश्यक आहे.

सदरची औषधे तातडीने खरेदीस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.८०१५११/- (अक्षरी रक्कम आठ लाख एक हजार पाचशे आकरा मात्र) चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दैनंदिन औषधे तातडीने खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.८,०१,५११/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२५ **टायर टयुब (प्लॅपसह) खरेदी कामी आलेल्या फेर निविदा तिस-यांदा उघडून न्युनत्तम पात्र निविदाधारकांबाबत निर्णय होणे कामी मा.उपसमिती सभेसमोर विषयाची टिपणी निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम-२०१४ मधील तरतुद :-** १७ (२) (ढ).

**प्रास्ताविक-** संदर्भ क्रमांक ०१ अन्वये वाहन विभागाकडील वापरात असलेल्या कार्यालयीन-०३, रुग्णवाहीका-०३, स्कुलबसेस-०५, पॅसेजर बसेस-०३, व मालवाहतुक-०१, अशा एकुण-१५ वाहनांकरीता नवीन ५१

टायर्स टयुब, (फ्लॅपसह) खरेदी करणेसाठी ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.४,६०,०००/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी दि.०८/१२/२०१४ रोजीचे उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली होती.

त्यानुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत शासकीय दराने दैनिक पुढारी (अहमदनगर आवृत्ती) मध्ये नवीन टायर्स+टयुब (फ्लॅपसह) खरेदीसाठी निविदा मागणीची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती.

**खालील तपशिलानुसार निविदा जाहिरात तिनवेळा प्रसीध्द करण्यात आलेली आहे.**

| अ.न | निविदा प्रसिध्दी मा. व्य./ उप समितीचे निर्णय | जपसंपर्क विभागामार्फत प्रसिध्दी तपशिल | निविदा विक्री कालावधी | विहित मुदतीत आलेल्या निविदा | निविदा तपशिल | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टेक्नीकल बीड | कमर्शियल बीड |
| १ | दि.०९.१२.२०१४ मा.व्य. स. सभेतील विषय क्र.२, निर्णय क्र.१०२१ | दै. पुढारी, सार्वमत दि.०४/०१/२०१५ | दि.०५/०१.२०१४ ते दि.१०.०१.२०१५ | १.सतिश ऑटो सेंटर, श्रीरामपूर. २. ओम टायर साकुरी ३.एस.जी.एस.व्हील, अस्तगाव | निविदा जाहिरात प्रसिध्द करणेत आली | निविदा जाहिरात प्रसिध्द करणेत आली |
| २ | दि.०९.०२.२०१५ मा.उपसमिती सभा विषय क्र.०२, निर्णय क्र.३०/०४ | दै.सार्वमत दि.२६/०२/२०१५. | दि.२६/०२.२०१४ ते दि.०७.०३.२०१५ | १. ओम साई गणेश टेडर्स साकुरी | अपात्र | |
| | | | | २. सतिश ऑटो सेंटर, श्रीरामपूर यांनी दि.०७.०३.२०१५/ ०२३२०७ रोजीचे पत्राने पुर्वीची निविदेतील दर अटी व शर्ती ग्राहय धरुन आमची निविदा कायम करण्यात यावी. | पात्र | निर्णय होणे बाकी |
| | | | | २. ओम टायर साकुरी | अपात्र | निर्णय होणे बाकी |
| | | | | ३. एस.जी.एस.व्हील अस्तगाव | अपात्र | निर्णय होणे बाकी |
| ३ | दि.१८.०३.२०१५ रोजीचे मा.उपसमिती सभेतील विषय क्र.१२ निर्णय क्र.४९ | दै. सार्वमत दि.१५/०४/२०१५ | दि.१५/०४.२०१४ ते दि. १८. ०४. २०१५ | १. सतिश ऑटो सेंटर, श्रीरामपूर यांनी दि. १८.०४.२०१५/ ००१४६३ रोजीचे पत्राने आम्हास काही बदल करायचे नाही पुर्वीची निविदा ग्राहय धरावी. याबाबत कळविले. | उघडणेत आले आहे. | उघडणेत आले आहे. |
| ४ | | | | २. ओम साई गणेश टेडर्स साकुरी, यांनी दि. १८.०४.२०१५/ ००१४६४ रोजीचे पत्राने आम्हास काही बदल करायचे नाही पुर्वीची निविदा ग्राहय धरावी. याबाबत कळविले. | उघडणेत आले आहे. | उघडणे बाकी आहे. |

आता वाहन विभागातील दि.२२/०४/२०१५ रोजीचे मंजूर टिपणी नुसार सदर प्रस्तवास मान्यता मिळाली. त्यानुसार प्राप्त झालेले फेरनिविदांचे फेर प्रस्ताव मा.प्रशासकीय अधिकारी (वाहन विभाग) यांचे समक्ष दि.२८/०४/२०१५ रोजी उघडणेत आलेले आहे.

अधिकृत डिलर यांचेकडून दि. १८/०४/२०१५ रोजी सतिश ऑटो सेंटर, श्रीरामपूर तसेच दि. १८/०४/२०१५ रोजी ओम साई गणेश ट्रेडर्स साकुरी यांचे प्रस्ताव मधील तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | आवक नंबर / दिनांक | दि.१८/०४/२०१५ रोजीचे पत्रातील तपशिल |
|---|---|---|---|
| ०१. | सतिश ऑटो सेंटर बेलापुर रोड, श्रीरामपुर | ००१४६३- १८/०४/२०१५ | यापुर्वीच दिलेल्या निविदेत आम्हास काही बदल करावयाचे नाही. यापुर्वीची निविदा ग्राहय धरावी याबाबत पत्राने कळविले आहेत. |
| ०२. | ओम साई गणेश टेडर्स साकुरी. | ००१४६४- १८/०४/२०१५. | दि. १०/०३/२०१५ रोजी दिलेली निविदा ग्राहय धरावी. तसेच सोबत सेल्स टॅक्स रजिस्ट्रेशन झेरॉक्स प्रत अपोलो कंपनीचे अधिकृत विक्रेते असलेचे प्रमाणपत्र झेरॉक्स. १८/०४/२०१५ रोजीचे पत्राने कळविले आहेत. |

वर नमूद केलेप्रमाणे अ.न.०१ चे तांत्रीक/प्राईज बीड दि.०९.०२.२०१५ रोजीचे उपसमिती सभेसमोर उघडणेत आलेले आहे. तसेच अ. न ०२ चे तांत्रीक बीड दि.१८.०३.२०१५ रोजीचे उपसमितीचे सभेसमोर उघडणेत आलेले होते. तथापी त्या वेळेस कागदपत्रांच्या अपूर्णतेमुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले होते. (सेलटॅक्स रजिस्ट्रेशन व अधिकृत डिलरचे प्रमाणपत्र नव्हते) आता त्यांनी कागदपत्राची पुर्तता केलेली असून त्याबाबत लेखी पत्र दिलेले आहे. त्यामुळे अ.न. ०२ चे प्राईज बीड उघडणे कामी तसेच तिस-यांदा आलेल्या निविदांचे फेर प्रस्तावा मधून न्युनत्तम निविदाधारकांस पुरवठा आदेश देणेकामी मा. उपसमिती सभेसमोर सादर.

उपरोक्तप्रमाणे वाहन विभागातील वाहनांकरिता टायर टयुब (प्लॅपसह) खरेदी करणेकामी तिस-या वेळेस निविदा मागवूनही एकच निविदा प्राप्त झालेली आहे, याकरिता पुर्वीची एक व तिस-यांदा प्राप्त झालेली एक अशा एकूण ०२ निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | टायर साईज | टायरची कंपनी | सतिश ॲटो सेंटर, श्रीरामपूर प्रती नग दर रु. | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी प्रती नग दर रु. |
|---|---|---|---|---|
| 01 | 205:65R:15 | ब्रिजस्टोन | **5244/-** | 5449/- |
| 02 | 205:65R:15 | (टयुबलेस-B390) | **5244/-** | 5449/- |
| 03 | 215:75R:15 | ब्रिजस्टोन (टयुबलेस-डॉलर-693II) | **6025/-** | 6349/- |
| 04 | 7:00:16 | अपोलो (अमर डिलक्स ) | **6806/-** | **6949/-** |
| 05 | 185R:14 | अपोलो (क्रॉम्पटो) | 4075/- | **3949/-** |
| 06 | 7:50:16 | अपोलो | **7668/-** | 7849/- |
| 07 | 7:50:16 | (अमर गोल्ड) | **7668/-** | 7849/- |
| 08 | 7:50:16 | | **7668/-** | 7849/- |
| 09 | 9:00:20 | अपोलो | 13734/- | **13649/-** |
| 10 | 9:00:20 | (अमर गोल्ड) | 13734/- | **13649/-** |
| 11 | 9:00:20 | | 13734/- | **13649/-** |
| 12 | 9:00:20 | | 13734/- | **13649/-** |
| 13 | 9:00:20 | | 13734/- | **13649/-** |
| 14 | 10:00:20 | | **16089/-** | 16449/- |
| 15 | 8:25:16 | अपोलो (ST-7 गोल्ड) | **9580/-** | 9749/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागातील प्रस्तावित १५ वाहनांकरिता टायर टयुब (प्लॅपसह) खरेदी कामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

२६ **श्री साईनाथ हॉस्पीटलकडील लिफ्ट क्र. 1 व 2 चे वार्षिक सर्व्हीस कॉन्टॅक्ट् (AMC) देणेबाबत.**

श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांचे सोयीकरीता तळमाळ्यावरील मजल्यावर ये-जा करणेकरीता मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांचेकडून दोन हायड्रोलीक लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. त्या नेहमी सुस्थितीत चालू राहणेसाठी त्यांचे नियमित सर्व्हीसिंग करावे लागते.

सदरील लिफ्ट सतत कार्यान्वित असल्यामुळे, त्यातील यंत्रणेमध्ये प्रसंगी बिघाड निर्माण होऊ शकतो. अशा वेळेस सर्व्हीसींग करुन खराब झालेले स्पेअर्स बदलून लिफ्ट लगेच चालू करुन द्यावी लागते. लिफ्ट दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर्स संस्थानकडे उपलब्ध् नसतात, शिवाय लिफ्ट दुरुस्तीसाठी तंत्रज्ञ कर्मचारी संस्थानकडे नसल्यामुळे लिफ्ट दुरुस्तीचे कामासाठी अडचण होऊ नये म्हणून मागील वर्षी लिफ्ट क्र. 1 चे दिनांक 01/04/2014 ते दिनांक 31/03/2015 कालावधीकरीता रुपये 89,888/- व लिफ्ट क्र. 2 चे दिनांक 01/05/2014 ते दिनांक 30/04/2015 या कालावधीसाठी रुपये 89,888/- अशी एकुण रुपये 1,79,776/- रकमेस लिफ्ट कंपनीचे उत्पादक मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट् (AMC) देण्यात आलेले होते.

मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांची लिफ्ट क्र. 1 & 2 करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट् (AMC) मुदत संपत येत असल्याने, त्यांनी खालील तपशीलाप्रमाणे यापुढे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट् (AMC) साठी लागणाऱ्या खर्चाचे कोटेशन दिनांक 26/04/2015 रोजी पाठविले आहे:

| अ. नं. | ठिकाण | लिफ्ट संख्या | कालावधी | दर प्रत्येकी रुपये | एकूण रक्कम रुपये | मागील वर्षापेक्षा दरात झालेली वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री साईनाथ हॉस्पीटल लिफ्ट क्र. 1 | 1 | दि.01/05/2015 ते दि.30/04/2016 | 80,000/- | 80,000/- | |
| | | | | सर्व्हीस टॅक्स् 12.36%: | 9,888/- | |
| | | | | **एकूण रुपये:** | **89,888/-** | **0%** |
| २. | श्री साईनाथ हॉस्पीटल लिफ्ट क्र. 2 | 1 | दि.01/05/2015 ते दि.30/04/2016 | 80,000/- | 80,000/- | |
| | | | | सर्व्हीस टॅक्स् 12.36 %: | 9,888/- | |
| | | | | **एकूण रुपये:** | **89,888/-** | **0%** |
| एकूण (लिफ्ट क्र. 1 + लिफ्ट क्र.2) रक्कम रुपये: | | | | | **1,79,776/-** | **0%** |

AMC कॉन्ट्रॅक्टमध्ये खालील बाबींचा समावेश आहेः –

**Scope of the contract-**

1) Trained person employed by the company under expert guidance of its technical staff will carried out maintenance work includes regular inspection & per month service of the lift.
2) Examining, checked and cleaning of machine, break assembly, motor, pedestal.
3) Examining and lubricating the of all moving parts & making minor adjustments so as to keep the lifts & its installation in a safe & good working condition.
4) Machine overhauling & alignment.
5) Guide rail alignment & oiling, greecing, speed governor alignment.
6) Checking & reconnection of machine room & shaft wiring.
7) Alignment of door locks, car gate locks & limit switch.
8) Checking of controllers, tightening of loose connections.
9) Main rope tensioning, safety blocks alignment.
10) Returning cam overhauling & adjustment.

दिनांक 20/05/2007 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 386 अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागाकडील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, ए.सी. वायुवीजन यंत्रणा वगैरे वार्षिक मेन्टेनन्स् अथवा रिक्स् प्रोटेक्शन् टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् हे त्या-त्या कंपनीला अथवा संबंधीत मशीनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला देण्यात यावे, असे ठरले.

तरी उपरोक्त् ठराव विचारात घेऊन, लिफ्टची उत्पादक कंपनी मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे दिनांक 01/05/2015 ते 30/04/2016 या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेस तसेच दोन्ही लिफ्टकरीता एकूण रक्कम रुपये 1,79,776/- (अक्षरी रुपये एक लाख, एकोणऐंशी हजार, सातशे शहात्तर) मात्र ॲडव्हान्स् रक्कम् मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना अदा करणेसाठीचा प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ हॉस्पीटलकडील दोन्ही लिफ्टचे दिनांक 01/05/2015 ते 30/04/2016 या कालावधीकरीता मे.पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेस व याकामी येणा-या रु.१,७९,७७६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळयाचे कालावधीमध्ये शिर्डी येथे होणा-या गर्दीच्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजाचा आढावा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) सन २०१५-१६ मध्ये नाशिक व त्र्यंबकेश्वर या तीर्थक्षेत्री सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होत आहे. याकालावधीपैकी माहे ऑगष्ट, २०१५ ते माहे सप्टेंबर, २०१५ या कालावधीत महत्वाच्या शाही स्नान पर्वणी खालीलप्रमाणे आहेत -

मुख्य ध्वजारोहण समारंभ - १४ जुलै, २०१५
आखाडयांचे ध्वजारोहण - १९ ऑगष्ट, २०१५
प्रथम शाही स्नान पर्वणी - २९ ऑगष्ट, २०१५
व्दितीय शाही स्नान पर्वणी - १३ सप्टेंबर, २०१५
तृतीय शाही स्नान पर्वणी - १९ सप्टेंबर, २०१५
त्र्यंबकेश्वर शाही स्नान पर्वणी - २५ सप्टेंबर, २०१५

उपरोक्त पवित्र व महत्वाच्या पर्वणी कालावधीत शिर्डी येथे श्री साईंचे समाधी दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविक येण्याची शक्यता आहे. यापुर्वी सन २००३ मध्ये झालेल्या कुंभमेळयातील पर्वणीच्या कालावधीत विशेषतः

दुस-या महापर्व पर्वणीच्या कालावधीत झालेली गर्दी पाहतां, याही वेळेस शिर्डी मध्ये गर्दी होण्याची शक्यता आहे. संस्थानमार्फत सध्या उपलब्ध असलेल्या मुलभूत सोयी-सुविधांचा विचार करतां, मोठया प्रमाणावर गर्दी झाल्यास नियोजन कोलमडून भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून संस्थान स्तरावरुन, संस्थान अंतर्गत असलेल्या विविध विभागांमार्फत विविध सोयी-सुविधा भक्तांना उपलब्ध करुन देणेसाठी नियोजन करणेत येत आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील सोयी-सुविधा / उपाययोजनांचा समावेश आहे –

- शिर्डी परिसराकडे येणा-या महत्वांच्या रस्त्यांलगत तात्पुरती वाहनतळे उभारणे.
- तात्पुरत्या वाहनतळांवर निवाराशेड, प्रसाधनगृहे यांची उपलब्धता करुन देणे.
- तात्पुरत्या वाहनतळांवरुन समाधी मंदिर परिसरपर्यन्त येणे-जाणेसाठी प्रवाशी वाहनांची व्यवस्था करणे.
- वाहनतळांवर क्लोकरुम, अल्पोपहार आदि सुविधा उपलब्ध करुन देणे.
- जूने प्रसादालय परिसरात वाढीव दर्शन रांगेची सुविधा करणे.
- संस्थान मालकीच्या भक्तनिवासस्थाने परिसरात तात्पुरती जादा निवास व्यवस्था उपलब्ध करुन देणे.
- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे.
- श्री साई प्रसादालय येथे आवश्यकतेनुसार जादा प्रसाद भोजन व्यवस्था करणे.
- साईभक्तांचे माहितीसाठी सूचना फलक व एलईडी स्क्रीनची व्यवस्था करणे.
- आवश्यकतेनुसार वाढीव लाडुप्रसाद उपलब्ध करणे.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी करावयाचे नियोजन व उपाययोजना करणेकामी करावयाचे कार्यवाही करीता मा. व्यवस्थापन समितीचे (मा.त्रिसदस्य समितीचे) दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेल्या अंदाजित रक्कम रुपये ५७.५४ कोटी मात्रचे खर्चाच्या प्रस्तावास निर्णय क्रमांक ०६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीने दिलेल्या मान्यतेनुसार, सदरचा प्रस्ताव मोठया खर्चाचा असल्याने, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयात दिवाणी अर्ज क्रमांक ३५००/२०१५ अन्वये मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०६ मे, २०१५ रोजीचे आदेशानुसार, उपरोक्त अंदाजित रक्कम रुपये ५७.५४ कोटी मात्रच्या खर्चास काही अटी-शर्तीस अधिन राहून मान्यता दिलेली आहे.
या प्रस्तावातील खर्चात प्रामुख्याने, शिर्डी परिसरातील ०७ वाहनतळे विकसित करणे, या वाहनतळांवर निवाराशेडसह प्रसाधनगृहांची उपलब्धता करुन देणे, क्लोकरुम, अल्पोपहार, विद्युत व पाणीपुरवठा व्यवस्था करणे आदि बाबींचा समावेश आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेनुसार, मा. व्यवस्थापन समितीने आणि मा. न्यायालयाने दिलेल्या मान्यतेनुसार, कुंभमेळा कालावधीत संभाव्य गर्दीचे नियोजनासाठी संस्थान अंतर्गत असलेल्या विभागांमार्फत करावयाचे नियोजनासाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक १० मे, २०१५, दिनांक १३ मे, २०१५ व दिनांक २३ मे, २०१५ रोजी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकी घेणेत आलेल्या आहेत. या आढावा बैठकांमध्ये ज्या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे अशा विषयांबाबत प्रामुख्याने चर्चा करणेत येऊन निविदा प्रक्रिया सुरु करणेत आलेल्या आहेत. त्यांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे-

| अ. नं. | विभागाचे नांव | कामाचा तपशील | कामाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | Earth work, WBM and allied works for proposed temporary parkings at 7 Locations in and around Shirdi for Kumbhamela 2015. | दि.२७/०५/२०१५ रोजी वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि.२८/०५/२०१५ पासून ई-निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| ०२ | बांधकाम विभाग | Providing, Installing & Maintenance of Portable Toilets and Bathrooms on Rental Basis for Kumbhamela 2015 at Shirdi. | दि.२८/०५/२०१५ रोजी वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि.२९/०५/२०१५ पासून ई-निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| ०३ | बांधकाम विभाग | सन २०१५ कुंभमेळा कालावधीकरीता साईभक्तांचे सोयी-सुविधेकरीता पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक सुविधा करणे. | दि.२७/०५/२०१५ रोजी वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि.२८/०५/२०१५ पासून ई-निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| ०४ | पाणीपुरवठा विभाग | पाणी व्यवस्थेसाठी प्लंबिग साहित्य खरेदीबाबत. | खरेदी विभागाकडून ई-निविदा सूचना प्रसिध्दीसाठी देणेत आलेली असून दिनांक ०१/०६/२०१५ पासून ई-निविदा विक्री सुरु होणार आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | पाणीपुरवठा विभाग | पाणीपुरवठयासाठी भाडोत्री टॅंकर उपलब्ध करुन घेणेबाबत. | श्री रामनवमी उत्सव व इतर उत्सव कालावधीत संस्थानला विनामुल्य टॅंकर सुविधा पुरविणारे कोपरगांव येथील टॅंकरधारक श्री. कातकडे हे कुंभमेळा कालावधीत संस्थानला टॅंकर उपलब्ध करुन देणार आहेत. पाणीपुरवठा विभागामार्फत या टॅंकर्सना पाणी उपलब्ध करुन देणेत येणार असून, या टॅंकर्ससाठी डिझेल खर्च संस्थानमार्फत करणेत येणार आहे. |
| ०६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | डिजिटल एलईडी स्क्रीन बसविणे. | डिजिटल एलईडी स्क्रीन भाडेतत्वावर घेणेऐवजी प्रायोजकामार्फत बसविणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे सादर करणेत आलेला आहे |
| ०७ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | सुरक्षा साहित्य खरेदी करणे. | सुरक्षा साहित्य खरेदी करणेसाठी शासकिय मालकिच्या ०४ ते ०५ कंपन्याना निमंत्रीत करुन निविदा मागविणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीपूढे सादर करणेत आलेला आहे. |
| ०८ | साईप्रसाद निवासस्थान | वाहनतळांवर क्लोकरुम | श्री साई संस्थान नोकरांची पतपेढी यांच्यामार्फत क्लोकरुम सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. |
| ०९ | कॅन्टीन विभाग | स्टील टी-जार खरेदीबाबत व किराणा माल | टी जार खरेदीकामी दि. ३०/०५/२०१५ अखेर दरपत्रके मागविणेत आलेली आहेत. तसेच आवश्यक किराणा माल खरेदी विभागामार्फत खरेदी केला जाणार असून, त्याचा समावेश वार्षिक खरेदीमध्ये करणेत आलेला आहे. |
| १० | लाडू प्रसाद निर्मिती विभाग | किराणा माल | आवश्यक किराणा माल खरेदी विभागामार्फत खरेदी केला जाणार आहे. त्याचा समावेश सन २०१५-१६ चे वार्षिक खरेदीमध्ये करणेत आला असून याबाबतचे कार्यादेश खरेदी विभागामार्फत देणेत येणार आहे. |
| ११ | श्री साई प्रसादालय विभाग | कुंभमेळा २०१५ करीता होणा-या गर्दीचे नियोजनासाठी पुरी + चटणी + बुंदीची अन्न पाकिटे बनविणेबाबत. | वाहनतळांचे ठिकाणी अन्नपाकिटे पुरविणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केलेला आहे. तसेच वाढीव प्रसाद भोजन सुविधेसाठी आवश्यक असणारा किराणा मालाचा समावेश सन २०१५-१६ चे वार्षिक खरेदीमध्ये करणेत आला असून याबाबतचे कार्यादेश खरेदी विभागामार्फत देणेत येणार आहे. |
| १२ | आरोग्य विभाग | कुंभमेळा करीता स्वच्छता साहित्य खरेदी. | खरेदी विभागाकडून ई-निविदा सूचना प्रसिध्दीसाठी देणेत आलेली असून दिनांक ०१/०६/२०१५ पासून ई-निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| १३ | विद्युत विभाग | सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधां पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरियल आणि केबल खरेदी करणे. | दि. २६/०५/२०१५ अखेर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि. २७/०५/२०१५ पासून निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| १४ | विद्युत विभाग | सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट फिटींग, केबल आणि स्विचेस खरेदी करणे. | दि. २६/०५/२०१५ अखेर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि. २७/०५/२०१५ पासून निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| १५ | विद्युत विभाग | सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ निमित्ताने शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी लाईट व्यवस्थेकरीता भाडोत्री तत्वावर जनसेट पुरविणे. | दि. २६/०५/२०१५ अखेर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि. २७/०५/२०१५ पासून निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| १६ | वाहन विभाग | इंधन खर्च | सध्याचे विहित पध्दतीने प्रचलित दरानुसार इंधन खरेदीसाठी खर्च केला जाणार आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | जनसंपर्क विभाग | संस्थान माहितीपुस्तिका खर्च/ माहितीचे बोर्ड | मराठी, हिंदी, इंग्रजी व तेलगू भाषेतील मार्गदर्शक सूचना बोर्ड तयार करण्यात येत असून, हे बोर्डस् वार्षिक दर मंजुरीप्रमाणे तयार करुन घेणेत येणार आहेत. |
| १८ | संरक्षण विभाग | कुंभमेळा २०१५ निमित्ताने संस्थानकरीता व पोलिस विभागाकरीता सुरक्षा साहित्य खरेदी करणेबाबत. | साहित्य खरेदी सीसीटिव्ही विभागाकडून केली जाणार असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| १९ | ध्वनीक्षेपण विभाग | कुंभमेळा निमित्त वाहनतळ व वाढीव दर्शन रांग येथे उद्घोषणा कक्ष उभारणे. | उद्घोषणा केंद्रांसाठी Public Address System चा समावेश बांधकाम विभागाकाडील मंडपाचे निविदेत करणेत आलेला असून, मनुष्यबळाबाबत कामगार विभागाकडे टिपणी सादर केलेली आहे. |
| २० | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | आपत्कालीन व्यवस्था | आपत्कालीन नियोजनासाठी आवश्यक असणा-या साहित्यांपैकी काही साहित्य देणगी स्वरुपात मिळणार आहे. त्याव्यतिरिक्त आवश्यक साहित्य खरेदीसाठी दरपत्रके मागविणेची कार्यवाही संबंधीत विभागामार्फत करणेत येत आहे. |
| २१ | मेकॅनिकल विभाग | श्री साई समाधी मंदिर परिसरात (१६ गुंठे) वॉकर टाईप मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलिंग तया करुन बसविणे. | दि. ३०/०५/२०१५ अखेर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि. ०२/०६/२०१५ पासून निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| २२ | मेकॅनिकल विभाग | संरक्षण विभागाकरीता लोखंडी बॅरिकेडस् तयार करुन देणेबाबत. | दि. ३०/०५/२०१५ अखेर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द होणार असून, दि. ०२/०६/२०१५ पासून निविदा विक्री सुरु होणार आहे. |
| २३ | कामगार विभाग | प्रासंगिक कुशल– अकुशल रोजंदारी कर्मचारी उपलब्ध करुन देणे. | सध्याचेच रोजंदारी कर्मचारी ठेकेदार यांना तात्पुरत्या स्वरुपात जादा कर्मचारी मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत पत्र देणेत आलेले आहे. |

(ड) उपरोक्त **परिच्छेद क** मध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीव्यतिरिक्त, खालील नमूद केलेल्या बाबींबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे–

०१. जुने प्रसादालय परिसरातील साईप्रसाद इमारत नं. ०१ चे तळमजल्यावर असलेल्या पुर्वीच्या प्रसादभोजन हॉलमध्ये जादा वाढीव दर्शन रांग उपलब्ध करुन देणेबाबत नियोजन करणेत आलेले आहे. याठिकाणी करावयाचे एम.एस. रेलिंगसाठी अपेक्षित रुपये १,१०,७०,०००/- मात्रचा खर्च मंजूर प्रस्तावातील बचत होणा-या संभाव्य रक्कमेतून करणेस मा. त्रिसदस्य समितीने मान्यता दिलेली असून, त्यानुसार बांधकाम विभाग व मेकॅनिकल विभागामार्फत निविदा प्रक्रिया सुरु करणेत येत आहे.

०२. उपरोक्त प्रस्तावातील ०७ वाहनतळांखेरीज पोलिस व महसुल विभागाने प्रत्यक्ष पहाणी करुन सुचविलेप्रमाणे जादा ०४ वाहनतळांचे तात्पुरत्या व्यवस्थेसाठी व एकूण ११ वाहनतळांचे जागांकरीता भाडेपट्टा आदा करणेसाठी येणा-या एकूण अंदाजित रुपये २,३९,२५,७२६/- खर्चास मा. त्रिसदस्य समितीने मान्यता दिलेली आहे.

०३. शिर्डी पोलिस स्टेशन यांचे प्रस्तावानुसार, संस्थानच्या साईउद्यान व साईनाथ मंगलकार्यालय या इमारती व साईआश्रम भक्तनिवासमधील २० खोल्या दिनांक २७ ऑगष्ट, २०१५ ते दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ या ३१ दिवसांचे कालावधीकरीता पोलिस अधिकारी व कर्मचा-यांचे निवासाकरीता विनामुल्य उपलब्ध करुन देणेस मा. त्रिसदस्यीय समितीने मान्यता दिलेली आहे.

०४. उपसमितीचे मान्यतेने प्रथम टप्प्यात संस्थान आस्थापनेवरील निवडक ३० कर्मचा-यांना आपत्कालीन परिस्थितीत करावयाचे उपाययोजनेसाठी प्रशिक्षण देणेकामी यशदा, पुणे यांना कार्यादेश देणेत आलेला असून, दिनांक २३ जून, २०१५ ते दिनांक २५ जून, २०१५ या कालावधीत सदर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणेत आलेले आहे.

०५. कुंभमेळा कालावधीत तात्पुरत्या वाहनतळांवरुन मंदिर परिसरापर्यन्त येणे-जाणेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस उपलब्ध करुन घेणेसाठी वाहन विभागामार्फत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

०६. मा. त्रिसदस्यीय समितीने मान्यता दिलेनुसार, शिर्डी शहरात विविध ०३ ठिकाणी प्रसाधनगृहे (मुतारी-शौचालय) उभारणेसाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणेत येत आहे.

(इ) उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेल्या संस्थान स्तरावरील कार्यवाहीव्यतिरिक्त मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक २९ जानेवारी, २०१५ चे आदेशान्वये स्थापन केलेल्या तालुकास्तरीय कुंभमेळा समितीचे बैठकांमध्ये ठरलेप्रमाणे,

०१. शिर्डी परिसरात विकसित करावयाच्या वाहनतळांसाठी तात्पुरत्या स्वरुपात जागा / जमिनींचे अधिग्रहण करणेसाठी उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी व तहसिलदार, राहाता यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

०२. तात्पुरत्या स्वरुपात जागा/ जमिनींचे अधिग्रहण करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी स्थापन केलेल्या मुल्यांकन समितीस आवश्यक असणारी सहकागदपत्रे वेळोवेळी संस्थानमार्फत सादर करणेत आलेली आहेत.

०३. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दिनांक १८ मार्च, २०१५ रोजीचे आदेशाने कुंभमेळा कालावधीसाठी शासकीय-निमशासकीय तसेच संस्थान अधिका-यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यानुसार संस्थानचे संबंधित अधिका-यांना सूचना देणेत आलेल्या आहेत.

०४. तालुकास्तरीय कुंभमेळा समितीचे बैठकीत ठरलेप्रमाणे शासकीय-निमशासकीय विभागांनी सादर केलेल्या विविध प्रस्तावांचे एकत्रीकरण करुन एकुण रक्कम रुपये १५४.८१ कोटी मात्रचा निधी संबंधित विभागांना प्राप्त व्हावा म्हणून मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत मा. ना. श्री. राम शिंदे, राज्यमंत्री तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

०५. तात्पुरत्या वाहनतळांवर आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणेबाबत तालुका आरोग्य अधिकारी, राहाता यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

०६. कुंभमेळा कालावधीत वाहतुकीचे नियोजनासह भक्तांचे सुरक्षिततेसाठी पोलिस विभागाशी समन्वय साधून या विभागास सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेबाबत संस्थानमार्फत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

०७. शिर्डी नगरपंचायत हद्दीत संस्थानचे आर्थिक निधीतून विकसित करणेत येणा-या रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात असून, याकामी शिर्डी नगरपंचायतीशी समन्वय साधून रस्त्याची कामे विहित वेळेत पुर्ण करणेसाठी कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

०८. नगर-मनमाड रस्त्याजवळ, पालखी रस्त्यालगत असलेल्या सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर नव्यानेच तयार करणेत आलेल्या महिला व पुरुषांसाठीचे टॉयलेटस् साईभक्त व नागरीकांसाठी खुली करणेत आलेली आहेत.

०९. संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, साईबाबा भक्तनिवास व साईनगर परिसरात पत्राशेड मंडप उभारुन तात्पुरती अतिरिक्त निवासव्यवस्था करणेत येणार आहे.

१०. सुलभ शौचालय ही इमारत मे. सुलभ इंटरनॅशनल, मुंबई यांना दैनंदिन देखभाल व व्यवस्थापनासाठी सन १९९७ पासून ३० वर्षाचे कराराने देण्यात आलेली आहे. त्यांचेमार्फत सुलभ शौचालय इमारतीतील तीनही मजल्यांचा वापर गर्दीचे प्रमाणानुसार आवश्यकतेप्रमाणे करण्यात येतो. कमी गर्दीचे कालावधीत फक्त तळमजल्याचा वापर करणेत येतो. उच्चतम गर्दीचे वेळी तीनही मजले वापरणेत येतात.

**निर्णय क्र.१५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिहस्थ कुंभमेळयाचे कालावधीमध्ये शिर्डी येथे होणा-या गर्दीच्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजाच्या सद्य:स्थितीची नोंद घेण्यात येऊन, त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. तसेच त्याबाबत खालीलप्रमाणे सुचना करण्यात आल्या.**

**(१) वाहनतळासाठी असलेल्या ११ जागा ताब्यात घेण्यात येऊन, त्याचा विकास करणेत यावा.**

**(२) संस्थानमार्फत चालू असलेले बसस्थानकाचे काम सिहस्थ कुंभमेळा सुरु होणेपूर्वी पुर्ण होणेसाठी प्रयत्न करणेत यावा.**

**(३) शिर्डी शहरामध्ये प्रवेश/ बाहेर जाणेसाठी असणा-या सर्व रस्त्यांची डागडुजी प्राधान्याने करणेबाबत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पत्र देण्यात यावे.**

**(४) आजचे सभेपुढे सी.सी.टी.व्ही. सल्लागार श्री.ढगे उपस्थित होते. समितीने त्यांचेशी सुरक्षा साहित्य खरेदीबाबत सविस्तर चर्चा केली. कुंभमेळयाचा कालावधी व करावयाची कार्यवाही विचारात घेता, एकूण सुरक्षा साहित्यांच्या मागणीपैकी जे साहित्य कुंभमेळयाच्या मुदतीपर्यंत मिळू शकेल, असे साहित्य खरेदी करणेचा विचार करणेत यावा. यासाठी Rate Contract व Non Rate Contract अशी सुरक्षा साहित्यांची यादी बनविणेत येऊन, Rate Contract मधील साहित्य खरेदीकामी आदेश देण्यात यावेत व Non Rate Contract मधील साहित्य खरेदी करणेकामी समांतर ओपन व लिमिटेड टेंडर प्रक्रिया तात्काळ राबविणेत यावी. सदर लिमिटेड टेंडरकरीता २२ नामांकित कंपन्या आहेत, त्यांचे प्रतिनिधी व पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना पुढील सुरक्षा साहित्य खरेदी करणेबाबतच्या सभेसाठी बोलविणेत यावे.**

**(५) प्रत्येक निवासस्थानांजवळ व संस्थान परिसरामध्ये ठिकठिकाणी तसेच शिर्डी नगरपंचायत कार्यालयामध्ये माहिती केंद्र उभारणेत यावे व ॲप तयार करावेत. त्याद्वारे साईभक्तांना मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलगू इ. भाषेमध्ये माहिती व माहितीची पत्रके उपलब्ध करुन देण्यात यावीत. त्यामध्ये संस्थानने कोणीही एजंट नेमलेले नाहीत, अशा कोणाही एजंटकडून आपली फसगत करुन घेवू नये, अशी माहितीही प्रसीध्द करणेत यावी.**

**(६) कुंभमेळा कालावधीत रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही, याकरिता माल (साहित्य) वाहतुकीसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना संस्थानमार्फत भाडोत्री वाहन आवश्यक मनुष्यबळासह उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**(७) फिरते शौचालयासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी देणारी जागा पाहून त्याचे नियोजन करण्यात यावे.**

**(८) शिर्डी शहरामध्ये ठिकठिकाणी स्टॅण्डसह पाण्याच्या टाक्या बसविणेसाठी जागांची निश्चिती करावी.**

**(९) प्लॅस्टीक कचरा गोळा करणेत यावा व तो मोल्ड करणा-या मशिनरी खरेदी करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ वाहन विभागप्रमुख/ सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख/ जनसंपर्क कार्यालय)

---

**विषय नं.०४** **संस्थानसाठी वार्षिक गावरान तुप खरेदी करणेसाठी केलेल्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानने मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांना सन २०१५-१६ या वर्षासाठी गावरान तुप खरेदीचा पुरवठा आदेश देणकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०४.२०१५ चे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासाठी मा.उच्च न्यायालयाची मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.

वरील निर्णयाप्रमाणे मा.उच्च न्यायालयात सिव्हिल ॲप्लिकेशन नं. ४७४८ दाखल करण्यात आलेले होते.

सदर अर्जावर मा.उच्च न्यायालयाचे खालीलप्रमाणे निर्देश दिनांक ०७.०५.२०१५ रोजी झालेले आहेत.

6. The applicant may purchase cow ghee from M/s. Indapur Dairy and Milk Products Ltd., as it is purchasing today for stock till 31st May 2015. It shall reissue tender notice as was issued on 12.03.2015 inviting the tenders from the competent bidders of the said reputed brands which were mentioned in the tender notice. The civil application accordingly is disposed of.

१. वरील निर्देशास अनुसरुन प्रथम पंधरा दिवसांकरीता ४५० क्विंटल गावरान तुप खरेदीकामी मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

२. गावरान तुप खरेदीकामी सहा ब्रॅण्डचे तुपासाठी (अमुल, हटसन, वारणा, महानंदा, विकास, गोकुळ) अल्पमुदतीची निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. निविदा भरण्याची अंतिम मुदत दिनांक २५.०५.२०१५ ठेवण्यात आलेली होती. तसेच दिनांक २७.०५.२०१५ रोजी तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडण्यात येणार आहे.

३. गावरान तुप खरेदी करणेकामी फेर निविदा प्रक्रियेस प्रतिसाद मिळणे किंवा कसे ? तसेच निविदा भरणेकामी मागील वेळी दिलेली मुदतवाढ, मा.कोर्टाचे दिनांक ३१.०५.२०१५ पर्यंतच मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांचेकडून खरेदीचे आदेश या सर्व बाबी विचारात घेऊन पुढील दीड महिन्यांसाठी १३५० क्विंटल गावरान तुप खरेदीचे पुरवठा आदेश मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी यांना रु.२९,४००/- मात्र प्रती क्विंटल दराने देण्यात आलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही अहवाल अवलोकनार्थ व माहितीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी वार्षिक गावरान तुप खरेदी करणेसाठी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०५** **सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्ही.टी.एस विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेबाबत मागणी केली आहे. सदर प्रस्ताव दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेमध्ये फेर सादर करणेत आला होता. त्यावर इतर रुग्णालयांकडील इन्सेंटीव्हबाबत अधिक माहिती संकलित करणेत यावी, असे ठरले होते. सदर प्रस्ताव दि.०५.०५.२०१५ च्या सभेमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे याबाबत मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचे अभिप्राय घेऊन प्रस्ताव फेरसादर करणेबाबत सुचित केले होते.

| निर्णय क्रं.५५०/ दि.१९.०८.२००६ | | निर्णय क्रं.७७०/ दि.२२.०९.२००७ | | निर्णय क्रं.१९६/ दि.०८.०३.२००९ | | निर्णय क्रं.८२०/ दि.०८.१०.२०१२ (JD & RGJAY) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६५,००० | १४,००० | ७५,००० | १५,००० | ८३,००० | १५,००० | १,२५,००० | १५,००० |

**इन्सेंटीव्ह बाबत पार्श्वभुमी-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी वैद्यकिय सेवा देणेबाबत व शिर्डी सारख्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासाठी डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांना आकारण्यात येणा-या बिलातील विशिष्ट रक्कम देणेबाबत मा.व्य.स.सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे. गरीब व गरजु रुग्णांना कमीत कमी दरात हृदयशस्त्रक्रिया वैद्यकिय सेवा देण्यास अनुसरुन इतर रुग्णालयांच्या तुलनेत दर कमी ठेवुन त्याप्रमाणे डॉक्टरांनाही इन्सेंटीव्ह ठरविण्यात आला होता. सि.व्ही.टी.एस. विभागात विशेषतः बायपास सर्जरीबाबत मे २००६ पासून ते आजपर्यंत बायपास सर्जरीसाठी दर आकारणी व सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ, इन्टेंसिव्हीस्ट डॉक्टर व परफ्युजनिस्ट यांना देण्यात येणारा इन्सेंटीव्ह थोडक्यात खालील प्रमाणेः-

निर्णय क्र.५५०/ दि.१९.०८.२००६ या सुरुवातीपासुन सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टरांची रक्कम तीच असुन त्यानंतर पुढील ५ वर्षात दर आकारणी रु.६५,०००/- वरुन रु.८३,०००/- व सध्या राजीव गांधी व जीवनदायी योजनेअंतर्गत दर रु.१,२५,०००/- करण्यात येऊन डॉक्टरांना देण्यात येणा-या इन्सेंटीव्ह रकमेत कोणतीही वाढ करण्यात आलेली दिसत नाही. या विभागातील डॉक्टरांनी वाढलेल्या दरास अनुसरुन इन्सेंटीव्ह रकमेत वाढ करणेबाबत मागणी केली होती, तथापी राजीव गांधी जीवनदायी योजना प्रत्यक्ष दर अंमलबजावणीचे वेळी विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले होते, तथापि यामध्ये अदयाप वाढ करण्यात आलेली नाही. कार्डीयाक सर्जन यांनी सदर बाबत प्राधान्याने विचार करण्यात यावा असे दि.१९.०८.२०१३ रोजीचे पत्रान्वये लेखी विनंती केली आहे. सदर प्रस्ताव मा.व्य.स.सभेपुढे दि.०५.०४.२०१५ रोजी सादर करणेत आला होता. निर्णय क्र.३४४ अन्वये तो स्थगित ठेवण्यात आला होता, आपल्या हॉस्पिटलला चांगल्या डॉक्टरांची सेवा सतत पुढे चालु राहण्यासाठी या प्रस्तावावर पुनःश्च विचार होणे आवश्यक असल्याने प्रस्ताव फेर सादर केला होता. यावर निर्णय क्र.९८/दि.१२.०३.२०१५ अन्वये सविस्तर चर्चा होऊन तत्वतः मान्यता देण्यात आली होती व त्यानंतर दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेत फेर सादर करणेत आला होता. त्यामध्ये इतर धर्मदाय रुग्णालयांकडील इन्सेंटीव्हबाबत अधिक संकलित करणेत यावी तसेच याबाबत अधिक माहिती न मिळाल्यास १५ दिवसांचे आत विशेष सभा घेण्यात येऊन निर्णय घेतला जाईल असे ठरले होते. त्यास अनुसरुन सदर बाबत इतर रुग्णालयांकडे विचारणा केली असता अधिकृत माहिती प्राप्त होऊ शकलेली नाही, तथापि महाराष्ट्रामध्ये कार्यरत असलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेप्रमाणेच आंध्रप्रदेशामध्ये कार्यरत असलेल्या आरोग्य योजनेच्या स्कीमचा जी.आर. उपलब्ध झाला आहे.

त्यामध्ये डॉक्टरांना इन्सेंटीव्ह म्हणुन देण्याची रक्कम नमुद केलेली आहे. ही रक्कम देऊ केलेल्या पॅकेज रकमेच्या ३५% इतकी नमुद केलेली आहे त्यासअनुरुन प्रस्तावित व तुलनात्मक असे परीशिष्ट अ सोबत जोडले आहे. महाराष्ट्रामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या स्किममध्ये डॉक्टरांना विशिष्ट रक्कम ठरविलेली नाही. सदर रक्कम रुग्णालय परत्वे ज्या त्या रुग्णालयांवर अवलंबुन राहील अशी माहिती मिळाली आहे. इतर रुणांलयांमध्ये त्याप्रमाणे रक्कम अदा करणेत येत आहे. श्री साईबाबा रुग्णालयामध्येही इन्सेंटीव्ह देण्यात येत आहे, तथापिसदर रकमेतऑगस्ट २००६ पासुनवाढ करणेत आलेली नव्हती.

1. ऑगस्ट २००६ पासुन सि.व्ही.टी.एस. विभागातील होणारी मुख्यतः बायपास सर्जरी चा दर रु.६५,०००/- होता तो सध्या रु.१,२५,०००/- इतका झालेला आहे. साधारणतः अशाचप्रकारे इतरही दर आहेत. अवलोकनार्थ सोबत परीशिष्ट अ जोडलेले आहे.

2. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यरत असल्याने संपुर्ण रक्कम प्राप्त होत आहे, सवलतीचा बोजा सोसावा लागत नाही.

3. साधारणतः ८ ते ९ वर्षात इन्सेंटीव्हमध्ये वाढ झालेली नाही तथापि, तज्ञ डॉक्टरांच्या अनुभवात वाढ झाली असुन अवघड शस्त्रक्रियासुध्दा होत आहे.

सदर बाबींचा विचार करता आंध्रप्रदेशामध्ये कार्यरत असलेल्या शासकीय आरोग्य श्री योजनेच्या स्किमप्रमाणे डॉक्टरांना देण्यात येणा-या इन्सेंटीव्हमध्ये परीशिष्ट अ मध्ये प्रस्तावित केलेनुसार अथवा त्याचे अवलोकन होऊन इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेसाठी, तसेच याबाबत दि.०५.०५.२०१५ रोजीच्या सभेमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचा अभिप्राय यासोबत बंद पाकीटामध्ये ठेवत आहोत. सदर पाकीट उघडण्यास व प्रस्तावास मान्यता मिळणेसाठीचा विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१५४** **मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडून प्राप्त झालेले त्यांच्या अभिप्रायाचे बंद पाकिट आजचे सभेसमक्ष उघडणेत आले.**

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्ह दरात सुधारणा करणेबाबत मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांनी सुचविलेले इन्सेन्टीव्ह दर खालील तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले आहेत. हे इन्सेन्टीव्ह दर दि.०१ जुन २०१५ पासून प्रायोगिक तत्वावर संबंधीतांना लागू करणेत यावे, असे ठरले.**

| | | | | | | Proposed Share by Civil Surgeon | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Services | No. of Days | JD/RGJAY (with Implants) | Total Old Package Charges | Increase /(decrease) (RGJAY-Old ) | Doctor's Share | Anaesth. 33% of Surgeon | Asst. Surgeon | Intensivist | Perfusionist | Total Share Amt. |
| 1 | CABG ( on Pump) | 13 | 125000 | 83,000 | 42,000 | **20,000** | **10,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 35,500 |
| 2 | CABG (on Pump)/ Micas | 13 | 125000 | 83,000 | 42,000 | **20,000** | **10,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 35,500 |
| 3 | CABG (on/off Pump) with IABP | 13 | 150000 | 103,000 | 47,000 | **20,000** | **10,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 35,500 |
| 4 | AVR/MVR (Mono Leaflet ) Single | 13 | 120000 | 105,000 | 15,000 | **14,000** | **7,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 26,500 |
| 5 | AVR/MVR (Bi-Leaflet ) Double | 13 | 120000 | 106,000 | 14,000 | **14,000** | **7,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 26,500 |
| 6 | MV/TV Repair | 13 | 100000 | 81,000 | 19,000 | **14,000** | **7,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 26,500 |
| 7 | ASD/VSD Closer (ICR) | 10 | 75000 | 61,000 | 14,000 | **14,000** | **7,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 26,500 |
| 8 | Peri Cairoctomy | 8 | 30000 | 22,000 | 8,000 | **5,000** | **2,500** | **1,000** | **1,000** | **---** | 9,500 |
| 9 | AV Fistula - Wrist (2100 Incr | | 10000 | 7,900 | 2,100 | **3,500** | **---** | **---** | **---** | **---** | 3,500 |
| 10 | AV Fistula - Elbow (1200) Incr | | 20000 | 7,900 | 12,100 | **5,000** | **---** | **---** | **---** | **---** | 5,000 |
| 11 | Peripheral Emblolectomy (Withut Graft) | 13 | 25000 | 22,000 | 3,000 | **5,000** | **2,500** | **1,000** | **---** | **---** | 8,500 |
| 12 | TAPVC, | 13 | 95000 | 61,000 | 34,000 | **18,000** | **9,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 32,500 |
| 13 | TOF | 13 | 95000 | 72,000 | 23,000 | **18,000** | **9,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 32,500 |
| 14 | Ruptured Sinus of Valsalva Correction | 13 | 95000 | 61,000 | 34,000 | **18,000** | **9,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 32,500 |
| 15 | DVR - (Mono Leaflet) | 13 | 150000 | 162,000 | (12,000) | **20,000** | **10,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 35,500 |
| 16 | DVR - (Bi-Leaflet) | 13 | 150000 | 162,000 | (12,000) | **20,000** | **10,000** | **2,000** | **2,000** | **1,500** | 35,500 |
| 17 | PDA Closer | 2 | 20000 | 28,000 | (8,000) | **5,000** | **2,500** | **---** | **---** | **---** | 7,500 |
| 18 | Ross Procedure with special conduit | 13 | 150000 | 162,000 | (12,000) | **18,000** | **9,000** | **1,500** | **1,500** | **1,000** | 31,000 |
| 19 | AVR /MVR - CABG | 13 | 185000 | | | **25,000** | **12,500** | **2,000** | **2,000** | **1,500** | 43,000 |

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०६ कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट यांनाही ते दर लागू करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेबाबत व फिक्स मानधनावरील कार्डीयालॉजिस्ट यांनाही ते दर लागु करणेबाबत प्रस्ताव दि.१६.०४.२०१५ रोजीचे सभेमध्ये फेरसादर केला होता. त्यावर चर्चा होऊन इतर रुग्णालयांमधील यासंबंधित अधिक माहिती संकलित करावी असे ठरले होते, त्याप्रमाणे सदर प्रस्ताव दि.०५.०५.२०१५ रोजीच्या सभेत सादर करणेत आला होता. या सभेमध्ये यावर चर्चा होऊन याबाबतीत मा.जिल्हा शल्य चिकित्सक अहमदनगर यांचा अभिप्राय घेऊन प्रस्ताव फेर सादर करणेबाबत सुचित केले आहे.

इन्सेटीव्ह बाबत थोडक्यात पार्श्वभुमीः- कार्डीयालॉजी विभागातील डॉक्टरांना मासिक वेतना व्यतिरीक्त कामाचे विशिष्ट प्रमाणात मोबदला देण्याबाबत वेळोवेळी मा.व्य.स.चे सभेत निर्णय संमत झाले आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणेः-

1. निर्णय क्रं.१९६/दि.०८.०३.२००९ अन्वये लागु असलेल्या इन्सेन्टीव्ह दरास अनुसरुन एकूण दोन कार्डीओलॉजिस्ट यांना प्रत्येकी मासिक वेतनाव्यतिरीक्त साधारणतः रु.२० ते २५ लाखापर्यंत इन्सेन्टीव्ह दिला जात होता. सध्या या दोन कार्डीओलॉजिस्ट यांना आर्थिक गैरव्यवहार व कामातील निष्काळजीपणामुळे खातेनिहाय चौकशी करिता सेवा निलंबित करण्यात आले आहे.

2. दरम्यानच्या कालावधीत मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपाठ यांचेकडील सिव्हल ॲप्लीकेशन नं.२७९७/२०१४ दि.१९.०३.२०१४ अन्वये, सहा महिने कालावधीकरीता कार्डीयालॉजिस्ट नेमणुकीस मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन २ पुर्णवेळ फिक्स मानधनावर व ५ व्हिजीटींग कार्डीयालॉजीस्टचा पॅनल विहीत पध्दतीने नियुक्त करण्यात आला होता. पैकी डॉक्टर मनोहर शिंदे या कार्डीलॉजिस्ट यांना मासिक रु.३,००,०००/-मात्र इन्सेंटीव्ह मंजुर करणेत आला होता व नियुक्तीचे वेळी कार्डीयालॉजिस्ट यांनी मागणी केलेनुसार खालीलप्रमाणे Per case इन्सेन्टीव्ह मंजुर करण्यात आला होता.

| पुर्वीचा इन्सेन्टीव्ह दर (रुपये) निर्णय क्र.१९६/दि.०८.०३.२००९ | | नव्याने लागु करण्यात आलेला इन्सेंन्टीव्ह दर (रुपये) निर्णय क्र.३४३/दि.०५.०६.२०१४ | |
|---|---|---|---|
| ॲन्जीओग्राफी | १,०००/- | ॲन्जीओग्राफि | ३००/- |
| ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता इतर सर्व समकक्ष प्रोसिजर्स् | ८,०००/- व १०,०००/- | ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता | ३,०००/- |
| २ डी इको, टीएमटी, | १८०/- | २ डी इको, टीएमटी, | १८०/- |

डॉक्टर मनोहर शिंदे यांना सर्व प्रकारच्या प्रोसिजर्सचा व कामाचा जास्त अनुभव असल्याने त्यांनी दरमहा तीन ऐवजी ४ लाखाची नियुक्ती कालावधीमध्ये मागणी केली होती. तथापी, कामाचा अभिप्राय पाहुन वाढ करणेबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते.

1. **सहा महिने कालावधीकरीता नेमणुका केल्या नंतर कॅथलॅब विभागाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा-** इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने मासिक साधारणतः रु.४० ते ४५ लाखावरुन इन्सेन्टीव्ह रु.१५ ते २० लाखापर्यंत आला, म्हणजे साधारणतः रु.२० ते २५ लाखापर्यंत मासिक आर्थिक बोजा कमी झाला. इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने व्हिजीटींग एकुण ०५ डॉक्टरांच्या पॅनेल पैकी दोन डॉक्टर व्हिजीट देण्याचे बंद झाले. उर्वरीत डॉक्टरांनीही इन्सेन्टीव्ह वाढीची मागणी केली आहे.

   i. तथापी, सहा महिने कालावधी पुर्ण झाल्यानंतर आपल्या मागणीचा विचार केला जाईल असे त्यांना वेळोवेळी सांगण्यात येऊन पुर्वीच्या दोन कार्डीओलॉजीस्ट यांच्या सेवा निलंबनाच्या कालावधीत रुग्णांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत त्यांना सांगण्यात आले होते.

2. मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं.२९०/२०१५ दि.१२.०१.२०१५ अन्वये, या कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांना पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे व त्यास अनुसरुन त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. तथापी, या डॉक्टरांची मागणीप्रमाणे इन्सेन्टीव्ह वाढ झालेली नसल्याने सदर कार्डीओलॉजीस्ट डॉक्टर सोडुन जाण्याची शक्याता निर्माण झाली आहे. पैकी व्हिजीटींग डॉक्टरांनी लेखी मागणी केली आहे तर मासिक फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजीस्ट डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांनीही दि.०४.०२.२०१५ रोजी एक महिना नोटीस कालावधी नमुद करुन राजीनामा पत्रे दिली आहे.

3. व्हिजीटींग डॉक्टर नाशिक, औरंगाबाद येथुन व्हिजीट देण्यासाठी येत असतात, त्यांना किमान व्हिजीटची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी इन्सेन्टीव्हमध्ये मोठया प्रमाणावर वाढ करण्याची मागणी केली आहे.

4. डॉ.मनोहर शिंदे यांनी मासिक फिक्स ३ लाख रुपये मानधनाऐवजी वेतनाचे प्रमाणात साधारणतः मासिक फिक्स मानधन व लागु असलेल्या इन्सेंटीव्ह दराप्रमाणे प्रतिकेस काम केल्याचे प्रमाणात इन्सेन्टीव्हची मागणी केली आहे.

कॅथलॅब विभागाच्या कामाचा आढावा घेतला असता रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे, त्यास अनुसरुन कार्डीयालॉजीस्ट डॉक्टर यांची आवश्यकता आहे तथापी, कार्डीयालॉजीस्ट यांना इतरत्र ठिकाणी मिळत असलेल्या इन्सेन्टीव्हच्या प्रमाणात आपल्या रुग्णालयांमध्ये सध्याच्या इन्सेन्टीव्ह दरामध्ये काही प्रमाणात वाढ करणे व्यवहार्य वाटते. त्यास अनुसरुन पुर्वीचे इन्सेन्टीव्ह दर, डॉक्टरांची मागणी व प्रस्तावीत केलेले दर आपले अवलोकनार्थ खालील प्रमाणे सादर केले आहेत.

| कॅथलॅब प्रोसिजर्स | मा.व्य.स. निर्णय क्रमांक १९६ दि.०८.०३.२००९ पुर्वीचा दर | मा.व्य.स. निर्णय क्रमांक ३४३ दि.०५.०६.२०१४ सध्याचा दर | डॉक्टरांची मागणी | प्रस्तावीत दर (रु.) |
|---|---|---|---|---|
| Angiography | 1,000/- | 300/- | 1,500/- | 1,000/- |
| Angioplasty for 1 & 2 stent | 8,000/- (Single Stent) & 10,000/- (Double Stent) | 3,000/- (Single & Double ) | 8,000/- (Single Stent) & 10,000/- (Double Stent) | 8,000/- (Single Stent) & 10,000/- (Double Stent) |
| 2D Eco, TMT | 180/- | 180/- | 420/- | 250/- |
| TEE TEST | 180/- | 180/- | 700/- | 500/- |
| BMV, BPV/BAV, POBA,COA Dilation, PDA Coil Closure | 7,500/- | 3,000/- | 7,500/- | 7,500/- |
| ASD, VSD, PDA, Device Closure, IVC Filter, | 10,000/- | 3,000/- | 10,000/- | 10,000/- |
| Permanent Pacemaker | 8,000+2,000/- (Surgeon) | 3,000+2,000/- (Surgeon) | 10,000/- (8,000+2,000 Surgeon) | 10,000/- (सर्जन वापरल्यास पैकी 2000/- सर्जनसाठी) |

तसेच पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट डॉ.मनोहर शिंदे रुजू झाल्यापासून त्यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये या विभागातील काही नवीन प्रोसिजर्स सुरु केल्या आहेत त्यापैकी काही प्रोसिजर्सचा समावेश राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत असल्याने त्या कराव्या लागतील, त्याव्यतिरिक्त सुध्दा काही प्रोसिजर्स आहेत, त्यांचे दर ठरवून त्याही आपल्या हॉस्पिटलमध्ये सुरु करता येतील. थोडक्यात अशा प्रोसिजर्स, राजीव गांधी योजनेनुसार त्यांचे दर व इतर नवीन प्रोसिजर्स यांचे सर्वसाधारण दर व त्यावर डॉक्टरांनी मागणी केलेले इन्सेन्टीव्ह दर खालीलप्रमाणे :-

| **1 . राजीव गांधी योजनेत समाविष्ट असलेल्या परंतु नव्याने सुरु करता येणा-या प्रोसिजर्स** | | | | |
|---|---|---|---|---|
| नवीन कॅथलॅब प्रोसिजर्स | मा.व्य.स.निर्णय क्र.196 दि.08.03.2009 पुर्वीचा दर | प्रस्तावित दर (राजीव गांधी योजनेतील मंजूर दरपत्रकानुसार) | डॉक्टरांची इन्सेन्टीव्ह मागणी | प्रस्तावित दर (रु.) |
| Aorta Interventions | 0 | 1,10,000/- | 15000/- | 10,000/- |
| CoA Stenting | 0 | 80,000/- | 10000/- | 10,000/- |
| Peripheral Interventions | 0 | 60,000/- | 10,000/- | 10,000/- |
| Carotid Interventions | | 1,50,000/- | 12,000/- | 10,000/- |
| EPS+RFABasic Arrythmias | 0 | 70,000/- | 10,000/- | 10,000/- |
| EPS+RFA Complex Arrythmias | 0 | 95,000/- | 12,000/- | 12,000/- |
| **II . राजीव गांधी योजनेव्यतिरिक्त नवीन प्रोसिजर्स खालीलप्रमाणे** | | | | |
| Pediatric Echo | 0 | 1,000/- | 500/- | 500/- |
| Dual chamber PPI/ | 0 | 30,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 10,000/- |
| ICD (Defrilator) | 0 | 70,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 15,000/- |
| BiVPacing | 0 | 60,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 16,000/- |
| Combo Device (Pacing) | 0 | 80,000/- + Cost of Pace Maker/Device | 16000/- | 16,000/- |
| EPS | 0 | 5,500/- | 3000/- | 1,000/- |

कार्डीओलॉजिस्ट यांचे इंन्सेन्टीव्ह वाढीचा प्रस्ताव मा.व्य.स. सभेत सादर करण्यात आला होता. दि.12/03/2015 रोजीचे सभेत त्यास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन डॉक्टरांनी काम पुर्ववत काम सुरु ठेवलेले असुन सदर प्रस्ताव दि.16/04/2015 रोजीचे सभेत फेरसादर करण्यात आला होता. त्यामध्ये इतर रुग्णालयांकडील इंन्सेन्टीव्हबाबत माहिती अधिक संकलिक करण्यात यावी व अधिक माहिती न मिळाल्यास 15 दिवसांच्या आत विशेष सभा घेण्यात येऊन निर्णय घेतला जाईल, असे ठरले होते. त्यास अनुसरुन इतर रुग्णालयांकडे विचारणा केली असता अधिकृत माहिती प्राप्त होऊ शकलेली नाही. तथापि, महाराष्ट्रामध्ये कार्यरत असलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेप्रमाणेच आंध्रप्रदेशामधेही कार्यरत असलेल्या आरोग्य श्री योजनेचा जी.आर. उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये पॅकेज रकमेच्या 35% इतकी रक्कम इंन्सेन्टीव्ह म्हणून डॉक्टरांना देण्याचे नमूद केले आहे. आपल्या रुग्णालयामध्ये सध्या देत असलेला इन्सेन्टिव्ह कमी असल्याने डॉक्टरांनी वाढीची मागणी वेळोवेळी केली आहे. त्या प्रमाणात या विभागात होणारी अँजिओप्लास्टी प्रोसिजर रु.60,000/- वजा रु.12,500/- स्टेंट चार्जेस वजा जाता 35% रु.16,625/- पैकी डॉक्टरांची मागणी यापुर्वीइतकी असलेली रक्कम रु.8000/- ते 10000/- इतकी उपरोक्तप्रमाणे आहे.

1. ऑगष्ट 2006 पासून कॅथलॅब विभागातील शस्त्रक्रिया/ प्रोसिजर्स वरील इंन्सेन्टीव्ह दरात वाढ झालेली नाही तर मागिल वेळी त्यामध्ये कपात झाली आहे.

2. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत संपूर्ण रक्कम प्राप्त होत असल्याने साधारणत: सध्या सवलतीचा बोजा पडत नाही.

3. शस्त्रक्रिया /प्रोसिजर्स मध्ये वापरण्यात येणा-या इंम्प्लांटसचे खरेदी दर त्या मानाने कमी झाले असून ड्रग कोटेड स्टेंट वापरामुळे दयावी लागणारी सवलत कमी झाली आहे.

4. डॉक्टरांची संख्या वाढल्याने कॅथलॅब विभागाचे कामकाज चांगल्या प्रकारे चालू असून अनुभवी डॉक्टर्स टिकुन राहण्यास व नव्याने मिळण्यास मदत होईल.

5. राजीव गांधी योजनेअंतर्गत किमान एक कार्डीयॅलॉजिस्ट पुर्ण वेळ असणे आवश्यक आहे. डॉ.मनोहर शिंदे यांना कामाचा चांगला अनुभव असुन कार्डियॅलॉजी विभागासबंधीत इंम्प्लांटस खरेदीमध्ये त्यांच्या अनुभवाचा मोठया प्रमाणावर किंमती कमी मिळण्यास फायदा होत आहे.

तरी या सर्व बाबींचा विचार करता कार्डीओलॉजिस्ट डॉक्टरांनी इंन्सेन्टीव्हमध्ये मागतलेली वाढ होण्यास व डॉ.मनोहर शिंदे कॉर्डीयॅलॉजिस्ट यांना मासिक फिक्स रु.3 लाख मानधनाऐवजी मासिक वेतनाच्या प्रमाणात साधारणत: रुपये 60,000/- मात्र मानधन देवुन पुर्णवेळ ठेवण्यास अधिक इतर कार्डीयॅलॉजिस्ट प्रमाणे त्यांना कामाच्या प्रमाणात प्रतिकेस इन्सेन्टिव्ह लागू करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव फेर सादर करीत आहोत. दि.०५.०५.२०१५ रोजीच्या सभेमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे मा.जिल्हा शल्य चिकित्सक अहमदनगर यांचे अभिप्राय बंद पाकीटामध्ये यासोबत ठेवत आहोत. सदर कार्यवाही मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे या विषयाच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५५** **मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडून प्राप्त झालेले त्यांच्या अभिप्रायाचे बंद पाकिट आजचे सभेसमक्ष उघडणेत आले.**

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करणेबाबत मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांनी सुचविलेले इन्सेन्टीव्ह दर खालील तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले आहेत. हे इन्सेन्टीव्ह दर दि.०१ जुन २०१५ पासून प्रायोगिक तत्वावर संबंधीतांना लागू करणेत यावे, असे ठरले.**

| | | | | | | | Proposed Share by Civil Surgeon | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr No. | SERVICES | No. of Days | RGJAY Package | Package Charges | Cost of Stent, Valve etc | RGJAY Package Exluding Implants | Doctor's Share | Cathlab Operator | Intensivist | Total Share Amt |
| 1 | Coronary Angiography * | 24 hrs | --- | 5,000 | --- | --- | **1,000** | **100** | **50** | 1,150 |
| 2 | Coronary Angioplasty | 3 Days | 60,000 | 39,000 | + Cost of Stent | 47,500 | **8,000** | **200** | **150** | 8,350 |
| 3 | Coronary Angioplasty Double Stent. | 3 Days | 80,000 | 44,000 | + Cost of Stents | 55,000 | **10,000** | **200** | **150** | 10,350 |
| 4 | Renal & Peripheral Angiography * | 24 Hrs | --- | 5,000 | ---- | --- | **1,000** | **100** | **50** | 1,150 |
| 5 | Renal & Peripheral Angioplasty | 3 Days | 60,000 | 39,000 | + Cost of Stent 18 | 42,000 | **8,000** | **200** | **150** | 8,350 |
| 6 | Renal & Peripheral Angioplasty Double Stent. | 3 Days | 80,000 | 44,000 | + Cost of Stents | 44,000 | **10,000** | **200** | **150** | 10,350 |
| 7 | BMV | 3 Days | 20,000 | 28,000 | --- | 20,000 | **7,500** | **200** | **150** | 7,850 |
| 8 | BPV / BAV | 3 Days | 30,000 | 35,000 | --- | 30,000 | **7,500** | **200** | **150** | 7,850 |
| 9 | A S D Closure by Device | 3 Days | 80,000 | 28,000 | + Cost of Device 52 | 28,000 | **10,000** | **200** | **150** | 10,350 |
| 10 | V S D Closure by Device | 3 Days | 80,000 | 28,000 | + Cost of Device 61 | 20,000 | **10,000** | **200** | **150** | 10,350 |
| 11 | P D A Closure by Device | 3 Days | 60,000 | 28,000 | + Cost of Device 46 | 14,000 | **10,000** | **200** | **150** | 10,350 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | Permanent Pace Maker Implants | 4 Days | 75,000 | 22,000 | + Cost of Pace 48 Maker | 27,000 | 8,000 | 200 | 200 | 8,400 |
| 13 | IVC Filter | 4 Days | 100,000 | 28,000 | + Cost of Device 39 | 60,000 | 10,000 | 200 | 200 | 10,400 |
| 14 | Temporary Pacing Lead | - | --- | 5,000 | - | --- | 800 | --- | --- | 800 |
| 15 | Abandoned Procedures | 24 Hrs. | --- | 5,000 | - | --- | 800 | 100 | 50 | 950 |
| 16 | P.O.B.A. | 3 Days | 60,000 | 39,000 | - | 60,000 | 8,000 | 200 | 150 | 8,350 |
| 17 | Coil Embolization | 3 Days | 20,000 | 20,000 | - | 20,000 | 5,000 | --- | --- | 5,000 |
| **Proposed New Procedures with Doctors Share** | | | | | | | | | | |
| 18 | Aorta Intervention | 3 Days | 110,000 | 39,000 | Stent Graft 70000 | 39,000 | 8,000 | 200 | 150 | 8,350 |
| 19 | CoA Stenting | 3 Days | 80,000 | 39,000 | Stent 35000 | 39,000 | 8,000 | 200 | 150 | 8,350 |
| 20 | Peripheral Interventions | 2 Days | 60,000 | 39,000 | Stent 35000 | 39,000 | 8,000 | 200 | 150 | 8,350 |
| 21 | Carotid Interventions | 2 Days | 150,000 | 39,000 | Stent + Filtere 110000 | 39,000 | 8,000 | 200 | 150 | 8,350 |
| 22 | EPS+RFA Simple arrythmia | 2 Days | 70,000 | 40,000 | Reusable 30000 | 40,000 | 8,000 | 200 | 150 | 8,350 |
| 23 | EPS+RFA Complex arrythmia | 2 Days | 95,000 | 45,000 | Reusable 45000 | 45,000 | 10,000 | 200 | 150 | 10,350 |
| **Proposed New Procedures not included in RGJAY Scheme with Doctors Share** | | | | | | | | | | |
| 24 | Dual Chamber Pacemaker | 4 Days | NA | 50,000 | Device 80000 | 50,000 | 10,000 | 200 | 150 | 10,350 |
| 25 | ICD Defibriliator | 4 Days | NA | 70,000 | Device 350000 | 70,000 | 12,000 | 200 | 150 | 12,350 |
| 26 | Biv Pacing | 4 Days | NA | 55,000 | Device 350000 | 55,000 | 10,000 | 200 | 150 | 10,350 |
| 27 | EPS | 1 Day | NA | 5,000 | --- | 5,000 | 7,000 | 100 | 50 | 7,150 |
| 28 | Pediatric 2D Echo | OPD | NA | 1,000 | --- | 1,000 | 500 | --- | --- | 500 |

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०७** **डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी चौकशी अधिकारी नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहीत्याचा वापर करणेकरता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रूग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आलेल्या आहेत. सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. 03.08.2014 रोजीचे सभेत सविस्तर चर्चा झालेली आहे. सदरच्या सभेत निर्णय क्र 606 असा पारित करणेत आला की, डॉ आर व्ही प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांची याप्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी प्रथम डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांना कारणे दाखवा नोटीस बजवावी त्यासाठी विशिष्ट वेळ देवून संबंधितांचे लेखी म्हणणे मागविणेत यावे संबंधितांचे लेखी खुलासे प्राप्त झालेनंतर चौकशी अधिकारी यांनी चौकशीकामी सुरूवात करावी. चौकशी पूर्ण झालेनंतर चौकशी अधिकारी यांनी चौकशीचा अहवाल एक महिन्याचे आत मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर करावा असे ठरले.

मा. व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांना दि. 20.08.2014 रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांनी दि. 22.08.2014 रोजी विनंती अर्ज सादर करून खुलासा सादर करणेकामी दोन महिन्याच्या मुदतीची मागणी केली होती. चौकशी अधिकारी यांनी त्यांना दि. 09.09.2014 रोजी लेखी खुलासा सादर करणेकामी सात दिवसाची मुदत दिली. याबाबत त्यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तरी देखील त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही.

प्राथमिक चौकशीत सकृत दर्शनी असे दिसुन येते की, डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवरील आरोपात तथ्य आहे. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दि. 06.11.2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र 983 अन्वये डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर दि. 06.11.2014 रोजी रीतसर आरोपपत्र बजावलेले आहे. तथापि खाते चौकशीत साक्षीदारांवर दबाव आणू नये तसेच कागदपत्रांमध्ये फेरफार, बदल, नष्ट करू नये यासाठी आरोपीत डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांना दि. 08.11.2014 पासून तात्पुरते संस्थान सेवेतुन सेवा निलंबित करण्यात आले आहे. तसेच या निर्णयात असे म्हटले आहे की, चौकशी अधिकारी यांनी पुढील चौकशी करून लवकरात लवकर चौकशी अहवाल सादर करावा असे ठरले. त्यानंतर डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांनी निलंबन आदेश व आरोपपत्र यांचे विरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र. 10055 व 10060/2014 दाखल केलेले आहे.

आता, डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर आरोपपत्र बजावले असुन खाते निहाय चौकशी सुरू करणे आहे. त्यासाठी स्वतंत्र चौकशी अधिकारी यांची नेमणूक करावी लागेल कारण सदर प्रकरणी डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव यांनी प्राथमिक चौकशीत चौकशी अधिकारी म्हणून काम केलेले आहे. तसेच सदर आरोपीत डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांनी डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव यांचेवर आक्षेप व आरोप केलेले आहेत. संस्थान कर्मचाऱ्यांच्या खाते चौकशी कामी संस्थानने 1992 पासून ॲड बी वाय काळवाघे, कोपगाव यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. परंतु त्यांचे वयोमान व अरोपांचे स्वरुप विचारात घेता सदर खाते चौकशीकामी स्वतंत्र चौकशी अधिकारी पदी सोबतचे परिशिष्ट अ मधील संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर असलेल्या ॲडव्होकेट्स पैकी एका ॲडव्होकेटची नेमणूक करता येईल त्यांचे मदतीसाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ यांची मदत घेता येईल. खाते चौकशीत डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांना सादरकर्ते अधिकारी म्हणुन काम करता येईल.

अशाप्रकारचा प्रस्ताव यापूर्वी दि. 09.12.2014 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय नं. 17 निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. 1036 प्रमाणे सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय झालेला आहे की, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन खाते चौकशी स्थगित होण्यासाठी अर्ज केलेला आहे, त्या अर्जावर निकाल होईपावेतो, सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.

सदर प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपिठ, औरंगाबाद यांनी खाते चौकशी स्थगित ठेवणेबाबत कुठलाही आदेश पारीत केलेला नाही. अशापरिस्थितीत सदरची खाते चौकशी स्थगित ठेवणे कायदेशिररित्या योग्य होणार नाही.

तरी सदर प्रकरणी वर नमुद केल्याप्रमाणे खाते चौकशीकामी स्वतंत्र चौकशी अधिकारी पदी सोबतचे परिशिष्ट 'अ' मधील संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर असलेल्या ॲडव्होकेट्स पैकी एका ॲडव्होकेटची नेमणूक करता येईल त्यांचे मदतीसाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची मदत घेता येईल. खाते चौकशीत डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांना सादरकर्ते अधिकारी म्हणुन काम करता येईल.

दि. 26.04.2015 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेकामी फेरसादर केला होता. त्यावर निर्णय क्र. 140 असा की, उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करणेसाठी शासनाच्या पॅनलवरील चौकशी अधिकाऱ्यांना अथवा निवृत्त जिल्हा न्यायाधिशांना कामाचे स्वरुप दाखवून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करणेस तयार आहेत का, याची विचारणा करणेत यावी. मा. अध्यक्षांनी उचित नाव ते सुचवित असल्याचे सांगितले.

तसेच चौकशी अधिकारी यांचे मदतीसाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची अथवा ते उपलब्ध नसल्यास इतर तज्ञांची मदत घेण्यात यावी, असे ठरले. सदरचा प्रस्ताव पुनश्च: दि.. 05.05.2015 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला होता. त्यात निर्णय क्र. 148 असा झाला की, चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रक्कम रु. 5,000/- मात्र प्रवास भत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहू चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस रक्कम रु. 7,500/- मात्र देण्यात यावेत. परंतू पुढे असेही ठरले की, त्यांना मानधनापोटी जास्तीत जास्त 20 तारखांचे प्रत्येकी रु. 7,500/- प्रमाणे एकंदर रु. 1,50,000/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. 20 तारखांपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस त्यांना फक्त प्रवास भत्ता व आहार भत्ता व इतर खर्चापोटी रु. 5,000/- मात्र देण्यात येतील. त्रीसदस्यीय समितीने पुढे असेही ठरवले की, चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त सरकारी अधिकारी किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधिशांची नेमणुक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्तप्रमाणे मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छुक असल्यास संबंधिताकडून तसे लेखी संमती पत्र घेण्यात यावे.

त्याचप्रमाणे सहायक तज्ञ म्हणून डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ, नाशिक यांची नेमणुक करण्यात यावी, असे दि. 26.04.2015 चे सभेमध्ये निर्णय क्र. 140 अन्वये ठरवण्यात आलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी तज्ञ सहायकाची जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हाच त्यांना पाचारण करावे व त्यांनी भाग घेतलेल्या चौकशीच्या प्रत्येक तारखेस तज्ञ सहाय्यकास वरील प्रमाणे प्रत्येक तारखेस रु. 5,000/- मात्र प्रवास खर्च, आहार भत्ता व इतर खर्चापोटी आणि मानधन म्हणून रु. 7,500/- मात्र देण्यात यावे. डॉ. धर्माधिकारी, नाशिक यांना तसे कळवावे व त्यांनी सहमती दर्शविल्यास त्यांचे लेखी संमतीपत्र घ्यावे. जर ते अनुच्छूक असतील तर दुसऱ्या तज्ञ सहायकाची नेमणूक करण्यात यावी, असे एकमताने ठरले.

यानंतर खाते चौकशीमध्ये हृदयरोग तज्ञाची मदत आवश्यक असल्याने इकडील दि. 13.05.2015 रोजीच्या पत्रान्वये मा. जिल्हा शल्यचिकीत्सक, अहमदनगर यांना पत्र पाठवून हृदयरोग तज्ञांचे नाव सुचविणेबाबत विनंती केली होती. मा. जिल्हा शल्य चिकीत्सक, त्यांचे दि. 18.05.2015 रोजीच्या पत्रान्वये असे सुचविले आहे की, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथे इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्ट कार्यरत नसल्यामुळे आपण मा. अधिष्ठाता, बी. जे. वैद्यकीय

महाविद्यालय व ससुन सामान्य रुग्णालय, पुणे यांचेकडून इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्ट यांचे विभागीय चौकशीकामी मागणी करावी.

तरी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 05.05.2015 रोजीच्या सभेतील निर्णय क्र.141 प्रमाणे खाते चौकशी करणेस मान्यता मिळणेस विनंती

निर्णय क्र.१५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांचे खाते चौकशीकामी निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री.जे.एल.देशपांडे, पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी पत्र देऊन, त्यांना विचारणा करणेत यावी.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ **गावरान तुप खरेदी फेर निविदा प्रक्रियेबाबत.**

प्रस्ताव- मा. उच्च न्यायालयाचे दि. ०७/०५/२०१५ रोजीचे आदेशाप्रमाणे अमुल, वारणा, हटसन, गोकुळ, महानंदा, विकास या कंपन्यांकडून त्यांच्या अधिकृत वितरकांकडून गावरान तुप खरेदीकामी अल्प मुदतीच्या निविदा सुचना दि. १५/०५/२०१५ रोजी १. पुढारी, पूणे २. नवाकाळ, मुंबई ३. दिव्य मराठी जळगाव ४. पुण्य नगरी कोल्हापुर ५. इंडियन एक्सप्रेस, चेन्नई या वर्तमान पत्रांत प्रसिध्दीसाठी देण्यात आलेल्या होत्या.

दि. १८/०५/२०१५ ते दि. २५/०५/२०१५ या कालावधीत निविदा भरण्याची मुदत ठेवण्यात आलेली होती. सदर निविदेच्या जाहिरातीमध्ये दि. २७/०५/२०१५ रोजी तांत्रिक निविदा उघडण्याचे कळविण्यात आलेले होते.

त्याप्रमाणे दि. २०/०५/२०१५ रोजी वरील सहा ब्रॅन्डेड कंपन्यांना ई-मेलव्दारे संस्थानची गावरान तुप खरेदी फेर निविदा प्रक्रिया चालू असून त्यामध्ये भाग घेण्याची विनंती करण्यात आलेली होती. तसेच दि. २५/०५/२०१५ रोजी वरील सहा कंपन्यांचे प्रतिनिधींना दूरध्वनीवरुन संपर्क केला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

१. **अमुल-** श्री प्रभाकर चौरे हे समक्ष आले होते, त्यांनी निविदा भरतो, असे सांगितले होते.
२. **गोकुळ-** गावरान तुप ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी कार्यवाही चालू आहे.
३. **विकास-** श्री आंबेकर साहेब, मार्केटींग प्रमुख यांनी सांगितले की, गावरान तुपाचा पुरवठा करणेसाठी आम्ही आगाऊ रक्कम घेतो. म्हणून टेंडर भरु शकत नाही. तसेच तुमच्या निविदेतील अटी व शर्ती जाचक आहेत. आम्ही नेव्ही, मिलीटरी वगैरेंना गावरान तुप पुरवितो. आमच्या व्यवस्थापनासाठी सेंट्रन गव्हार्नमेंट नियुक्त मेंबर आहेत.
४. **हटसन-** दि. २५/०५/२०१५ रोजी फोन केला असता प्रतिसाद दिला नाही. तथापि तांत्रिक निविदेसाठी दि. २६/०५/२०१५ रोजी फोन केला असता कंपनी टेंडर भरत नाही असे त्यांनी सांगितले.
५. **वारणा-** दि. २५/०५/२०१५ रोजी श्री गुळवे (एमडी) यांना फोन केला असता थोड्या वेळाने पुन्हा फोन करा असे सांगितले. पुन्हा फोन केला असता प्रतिसाद मिळाला नाही. दि. २६/०५/२०१५ रोजी तांत्रिक निविदा सभेसाठी फोन केला असता श्री भंडारी यांनी असे सांगितले की, आम्ही टेंडर भरत नाही. आम्ही दराबाबतचे पत्र दिलेले आहे.
६. **महानंदा-** आमची पॅकींग १५ किलोची नाही. त्यासाठी तयारी करत आहोत.

दि. २७/०५/२०१५ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या. त्यामध्ये खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे. कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित. कोल्हापूर | - | गोकुळ |
| २) | मे. पचमहाल डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटीव्ह मिल्क प्रॉडक्ट युनियन लि. गोधरा (गुजरात) | - | अमुल |
| ३) | मे. अजंता राज प्रोटीन्स लि. आग्रा | - | मोहक |

यामध्ये क्रमांक ३ मे. अजंता राज प्रोटीन्स लि. आग्रा यांनी तांत्रिक निविदा दिलेली होती. परंतु, मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे ब्रॅन्डेड गावरान तुपाची निविदा नसल्याने सदरची निविदा उघडण्यात आलेली नाही.

अ.नं. १ यांनी तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. अ.नं. २ यांनी आम्हाला अमुल ब्रॅन्डने तुप उत्पादन करुन विकण्यास अधिकृत मान्यता दिली असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यावर त्यांनी दोन दिवसांत सदरचे पत्र सादर करणेबाबत समक्ष सांगितलेले आहे.

निविदा नियमानुसार कमीत कमी तीन निविदा असाव्यात, तथापि वरील ब्रॅन्डेड दोनच कंपन्यांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सदर निविदाधारकांचे Financial Bid उघडावे अगर कसे? किंवा याबाबत पुढील योग्य तो निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असलेले गावरान तुप खरेदी करणेकामी फेर-निविदा प्रक्रिया करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांस आवश्यक किराणा माल खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१५-१६ (माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक किराणामाल (भाजीपाल्यासह) खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७७,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मा.व्य.समितीचे दि.३०.०१.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.१८ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असता, मा.उच्च न्यायालयाने दि.१३.०३.२०१५ रोजी गावरान तुप खरेदी करिता स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेस व या व्यतिरिक्त किराणा माल खरेदी करणेकामी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेस मान्यता दिलेली आहे.

यातील गावरान तुप खरेदीची प्रक्रिया मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे व मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे स्वतंत्रपणे सुरु आहे.

त्यानंतर याकामी किराणामालासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये पारदर्शक बरण्यांमध्ये नमुने स्वतंत्रपणे स्विकारण्यात आले. निविदाधारकांनी त्यांची माहिती व दर ई-निविदेद्वारे सादर केले.

दिनांक ३०.०४.२०१५ रोजी वरील निर्णयाप्रमाणे ठरविलेल्या समितीपुढे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) उघडण्यात आले. त्यामध्ये मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी, मे.साई ॲग्रो इंडस्ट्रि, टाकळी, मे.व्हिजन एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांच्या ई-निविदा अपात्र ठरविण्यात आल्या. तसेच पेपर पिशवी, पेपर रोल खरेदीकामी तीनपेक्षा कमी निविदाधारकांनी निविदा सादर केल्याने मे.स्टार पॅकेजिंग, वसई, मे.विशाल प्लॅस्टिक्स, कोल्हापुर यांच्या ई-निविदा Online उघडलेल्या नाहीत. सदर निविदाधारकांनी पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर, पेपर पिशवी, पेपर रोल साठी निविदा सादर केलेल्या होत्या. तसेच सुतळी पुरविणेकामी कुठलीही निविदा प्राप्त झालेली नाही, त्यामुळे सदर मालासाठी फेरनिविदा (Retender) प्रक्रिया राबवावी लागेल.

दिनांक ०५.०५.२०१५ रोजी ई-निविदेतील व्यापारी लिफाफे (Commercial Bid) उघडण्यात आले. दिनांक ०९.०५.२०१५ रोजी वरील प्रक्रियेद्वारे आलेले सर्व सिलबंद नमुने फक्त Itemwise Sort करुन एका खोलीमध्ये सिल करण्यात आले.

दिनांक १२.०५.२०१५ रोजी दरवर्षीचे प्रथेप्रमाणे महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी येथिल तज्ञ डॉ.कड व श्री.कोटेचा यांना उत्तम दर्जाचे नमुने निवडणेकामी बोलाविण्यात आले. त्यांनी दिलेल्या सर्व नमुन्यांमधील L1, L2, L3 या तीन नमुन्यांची प्रथम तपासणी करुन योग्य नमुन्यांची निवड करुन दिलेली आहे. तसेच काही मालाचे बाबतीत (गहु आटा व धने) यांचे नमुनेही (L4 व L6) मधुन निवडलेले आहेत, तर काही मालाचे बाबतीत मात्र एक किंवा दोन नमुने आलेले आहेत. सदर दोन्हीही तज्ञांचे अहवालांच्या प्रती सोबत सादर केलेल्या आहेत.

सदर दोन्ही तज्ञांनी याकामी आवश्यकतेप्रमाणे संस्थानच्या आचा-यांचेही अभिप्राय घेतलेले आहेत. गहु आटा प्रत्यक्ष तीन प्रकारच्या आटयाच्या पोळया तयार करुन चाचणी घेऊन सम्राट ब्रॅण्ड आटयाची निवड केलेली आहे. सदर दोन्हीही तज्ञांनी साधारणत: उपलब्ध असलेल्या नमुन्यांपैकी काही मालाचे तीन नमुने निवडलेले होते.

तांदुळाचे सोना मसुरी, एच.एम.टी., कोलम, चिन्नोर ब्रॅण्ड निविदेत नमुद केलेले होते. त्यापैकी L1 असलेले कोलम व चिन्नोर ब्रॅण्डचा तांदुळ प्रत्यक्ष शिजवून नमुन्यातील शिजवलेल्या तांदुळात स्टिम कोलम हा तांदुळ चवदार असून शिजविलेनंतर चिकट होत नसल्याने सदर तांदुळ निवडणेस हरकत नाही, असे प्रसादालय अधिक्षक, तसेच आचारी श्री.दिलीप सांबारे व श्री.कर्डीले यांनी दि. १६.०५.२०१५ रोजी लेखी अभिप्राय दिलेले आहेत व स्टिम कोलम ब्रॅंडचा तांदुळ Select केला आहे.

वरील तज्ञांच्या अहवालावरुन किराणामालाच्या बाबतीत तयार केलेला अहवालही यासोबत परिशिष्ठात सादर केलेला आहे. यामध्ये अ.नं. २२, २५, ४२, ५३, ५४, ५८, ७८, ८० ते ८४ यासाठी दोन निविदाधारक (Bidders) व अ.नं. २६, ४०, ५०, ६२, ६३, ६४, ६८ व ६९ यासाठी एकच निविदाधारक (Bidders) आलेले आहेत. तथापि त्यांचा नमुना योग्य वाटल्याने तज्ञांनी निवडलेला आहे. अशा सर्व निविदाधारकांना यापुर्वीचे निविदा प्रक्रियेत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होऊन त्यांना पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

टोन्ड गाय दुध पुरविणेकामी L1 न्युनतम दर रु.२९.८५ प्रति लिटर ई-टेंडर प्रक्रियेव्दारे प्राप्त झालेले आहेत. मात्र मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांनी दिनांक ०७.०५.२०१५ रोजीचे पत्राने टोन्ड गाय दुधासाठी रु.२९.७५ प्रतीलिटर या दराने दुध पुरविणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे. तथापि ई-टेंडरवर दर Open झालेनंतर सदर पत्र प्राप्त झाल्यामुळे स्विकारलेल्या निविदा दरापेक्षा दर कमी असुनही या पत्राचा विचार करता येणार नाही.

संस्थानकडून उघडण्यात आलेल्या तांत्रिक लिफाफा, व्यापारी लिफाफा, नमुने आयटेमवाईज वेगळे करणे, नमुने निवडणे, सील करणे, खोली सील करणे वगैरे सर्व प्रक्रियांचे Video Shooting करण्यात आलेले आहे.

तांत्रीक लिफाफे व व्यापारी लिफाफे तसेच नमुने निवडणे या सर्व वेळी संबंधीत निविदाधारक उपस्थित होते व त्यांच्यापैकी कुणीही वरील कुठल्याही प्रक्रियेस आक्षेप नोंदविलेला नाही.

मागील ऑक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५ अखेर किराणामाल खरेदीची मुदत मार्च-२०१५ अखेर संपलेली असुन त्यातील बहुतांश मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. तसेच २५ % काही प्रकारचा किराणामाल देखील मागणी करुन पुरवठा संपत आलेला असल्याने साईभक्तांना देण्यात येणा-या सेवेमध्ये अडचण येऊ नये याकरिता किराणामालाची निकड लक्षात घेता पुढील किराणामाल खरेदीचा निर्णय तातडीने होणे गरजेचे आहे.

किराणामाल प्रक्रियेबाबत वर नमुद केलेप्रमाणे वस्तुस्थिती सादर केलेली आहे. त्याचा विचार करता

- वर नमुद केलेल्या तक्तयामधील अ.नं.१ ते ६०, ६२ ते ६४, ६८ ते ७०, ७८ ते ८५ यांना पुरवठा आदेश देणेस

- व अ.नं. ८८ टोन्ड गाय दुध पुरविणेकामी ई-निविदेद्वारे मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव व मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.दुध उत्पादक संघ लि., कोपरगाव या दोन निविदाधारकांचे दर L1 रु.२९.८५ प्रति लिटर आलेले असल्याने तुयांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देणेस
- अ.नं.६१, ६५ ते ६७, ७१ ते ७७ व ८६, ८७ वर नमुद मालासाठी फेर ई – निविदा प्रक्रिया करणेस
- सदर परिशिष्ठातील किराणामाल खरेदीकामी रु.३९,०४,३७,७५०/- (एकोणचाळीस कोटी चार लाख सदोतीस हजार सातशे पन्नास मात्र) वार्षिक खर्च येईल.

वरील अ, ब, क वर नमुद कार्यवाहीस मान्यता मिळणेस व ड नमुद केलेल्या बाबीची नोंद घेण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१५८** **सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांस किराणा मालाची तातडीची गरज असल्याने उपरोक्त प्रस्ताव त्रीसदस्य समितीपुढे चक्रिय पध्दतीने सादर केला असता त्यावर समितीने निर्देशीत केल्याप्रमाणे तक्ते सादर करणेत आलेले आहेत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांस किराणा माल खरेदीकामी सादर केलेल्या तक्तयांवर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**(१) खालील तक्त्यातील (अ.नं.०१ ते ४२) किराणा मालासाठी तीन किंवा तीनपेक्षा जास्त निविदा प्राप्त झालेल्या असून त्या मालाचे नमुने तज्ञांनी निवडलेले आहेत व या मालाचे दरही निम्नतम आहेत. या निम्नतम दरधारकांस किराणा मालाचा पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या मालासाठी समान निम्नतम दर असतील त्यांना समप्रमाणात विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा.**

| Sr. No. | Description | Quantity | Unit | Name of Tenderer | Rate Per Quintal/No/ Thousand | Total | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sakhar - Special- M-30 (Sugar) | 19,200 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | 2,721.00 | 52,243,200.00 | L1 |
| 2 | Rice - (Sona Masuri/HMT/Kollam/ Chinnoor) Old, Stoneless | 7,250 | Quintal | मे. रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशीक | 2,975.00 | 21,568,750.00 | L1 |
| 3 | Harbaradal (Split gram) Polished, Dry, Stoneless | 9,600 | Quintal | मे. आर मुथा राईस हाऊस, औरंगाबाद | 5,517.00 | 52,963,200.00 | L1 |
| 4 | Tur dal (Pigeon Pea) (Split Red gram) Polished, Dry, Stoneless, | 2,600 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | 9,238.00 | 24,018,800.00 | L1 |
| 5 | Moong dal - (Split green gram) Polished, Dry, Stoneless | 225 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | 9,401.00 | 2,115,225.00 | L1 |
| 6 | Masur - (Lentil whole) Akkha, Stoneless | 700 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | 6,529.00 | 4,570,300.00 | L1 |
| 7 | Mathdal (Split math beans) Stoneless | 75 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | 9,301.00 | 697,575.00 | L1 |
| 8 | Udiddal, (White) Best Quality | 50 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | 9,501.00 | 475,050.00 | L1 |
| 9 | Rajma, Best Quality | 25 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | 5,001.00 | 125,025.00 | L1 |
| 10 | Chavali, Best Quality | 100 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | 5,346.00 | 534,600.00 | L1 |
| 11 | Maida (Refined Wheat flour) | 700 | Quintal | मे. गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे | 1,881.00 | 1,316,700.00 | L1 |
| 12 | Gul -(Jaggery) Kolhapuri Tambada | 350 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | 2,751.00 | 962,850.00 | L1 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | Sabudana (Sago) Double Hatti, Camel | 330 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | **5,701.00** | 1,881,330.00 | L1 |
| 14 | Khobarevati (Dry Coconut wati) Rajapuri, Kalipath, Dry | 175 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | **14,900.00** | 2,607,500.00 | L1 |
| 15 | Kaju Pakali (Cashew Nut) 2 Pakali, Dry | 150 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | **54,400.00** | 8,160,000.00 | L1 |
| 16 | Kismis (Raisins/Currant) Green Yellow | 100 | Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | **19,400.00** | 1,940,000.00 | L1 |
| 17 | Hirvi Vilayachi - Bold (Green Cardamom) | 67 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | **84,000.00** | 5,628,000.00 | L1 |
| 18 | Halad (Tumeric) (Akhand, Dry) | 129 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | **9,600.00** | 1,238,400.00 | L1 |
| 19 | Mirchi (Chillies) (Guntur, Akhand Lal, Dethasah) (Whole Dry Red) | 215 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | **8,325.00** | 1,789,875.00 | L1 |
| 20 | Jire - Diamond Cut (Cumin Seed) Stoneless | 77 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **18,800.00** | 1,447,600.00 | L1 |
| 21 | Sunth - Dry (Dry Ginger) | 4 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **27,900.00** | 111,600.00 | L1 |
| 22 | Shahajire (Caraway Seeds) | 2.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **54,900.00** | 137,250.00 | L1 |
| 23 | Masala Vilayachii (Black ardomom) | 2.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **189,900.00** | 474,750.00 | L1 |
| 24 | Lavang (Clove) | 1.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **74,900.00** | 112,350.00 | L1 |
| 25 | Dalchini (Cinnamom) | 2.70 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | **19,500.00** | 52,650.00 | L1 |
| 26 | Khaskhas (Poppy Seed) | 1.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **41,900.00** | 62,850.00 | L1 |
| 27 | Kalemire (Black Pepper/ Pepper Corns) | 1.20 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **63,900.00** | 76,680.00 | L1 |
| 28 | Tejpan (Bay leaf/cassia) | 2.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **8,500.00** | 21,250.00 | L1 |
| 29 | Chakriful (Star Anaise) | 2.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **23,000.00** | 57,500.00 | L1 |
| 30 | Jaiphal (Nutmeg) | 0.25 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **94,900.00** | 23,725.00 | L1 |
| 31 | Jaipatri (Mace) | 2.50 | Quintal | मे.शांती स्पायसेस, जळगाव | **130,000.00** | 325,000.00 | L1 |
| 32 | Safed Til (White Sesame) | 0.50 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | **11,900.00** | 5,950.00 | L1 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 33 | Methi (fenugreek) | 2 | Quintal | मे.महावीर प्राव्हीजन स्टोअर्स, नाशीक | <u>7,000.00</u> | 14,000.00 | L1 |
| 34 | Hing Powder (Asa foetida Powder) Nagchhap, Agmark | 30 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | <u>27,900.00</u> | 837,000.00 | L1 |
| 35 | Badishop (Aniseed) (Small Green) | 6 | Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | <u>14,900.00</u> | 89,400.00 | L1 |
| 36 | Udid, Papad (Lijjat/Ganesh Brand) | 100 | Quintal | मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशीक | <u>22,000.00</u> | 2,200,000.00 | L1 |
| 37 | Chinch - (Tamarind) Clean & Fodleli | 9 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | <u>5,100.00</u> | 45,900.00 | L1 |
| 38 | Mith Free Flow - Iodised (Salt Free Flow) | 1,100 | Quintal | मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशीक | <u>550.00</u> | 605,000.00 | L1 |
| 39 | Jilebi Colour (Synthetic Food Colour/Lemon Yellow Powder) ISI Mark | 3.50 | Quintal | मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशीक | <u>14,999.00</u> | 52,496.50 | L1 |
| 40 | Khadya Tel (Edible Oil) (Rifiend, Agmark/FSSAI, 15Kg.Teen) Soya/Sunflower | 4,000 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | <u>6,815.00</u> | 27,260,000.00 | L1 |
| 41 | Vanaspati Tup (15 Kg.Teen) Agmark, Branded | 550 | Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशीक | <u>6,868.00</u> | 3,777,400.00 | L1 |
| Packed Drinking Water & Tond Cow Milk | | | | | | | |
| 42 | Toned Cow Milk (Pasteurised & Homogenised) 3.5 Fat, 8.5 SNF, 500ml.Packing) Two Time Supply in a Day | 1,803,000 | Litre | १.मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव<br>२. मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. ता.सह.दुध उत्पादक संघ मर्या. कोपरगाव | <u>29.85</u> | 53,819,550.00 | L1 |

**(२) खालील तक्त्यातील किराणा मालासाठी तीन किंवा तीनपेक्षा जास्त निविदा प्राप्त झालेल्या आहेत व त्या मालाचे नमुने तज्ञांनी निवड केलेले आहेत. मात्र अशा मालाचे दर हे उच्चतम (L2, L3, L4, L6) आहेत. समितीच्या निर्देशावरुन या किराणा मालाच्या दरांची तुलना निम्नतम दरांशी करुन, यामध्ये किती रकमेचा फरक पडतो याचाही उल्लेख केलेला आहे.**

**तज्ञांनी केलेल्या मालाचे नमुन्यांची निवड विचारात घेता, खालील तक्त्यातील L2, L3, L4, L6 हे दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. सदर तक्त्यातील अ.नं.०१- गहु आटा फक्त ०१ महिन्यासाठीचाच खरेदी करण्यात येऊन, तो प्रसादालयाकडे प्रायोगिक तत्वावर वापरण्यात यावा. याबाबत प्रसादालय विभागाचा अहवाल प्राप्त झालेनंतर प्रसादालयासाठी गहू खरेदी करावयाचा कि गहू आटा खरेदी करावयाचा याचा निर्णय घेण्यात येईल.**

| Sr. No. | Description | Name of Tenderer | L2/ L3/ L4/ L6 | Selected Samples Rate Per Quintal/No/ Thousand Rs | L1 Rate Per Quital/ No/ Thousand Rs | Difference Rs |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Gehu- 496, (Wheat) 11,700 Quintal | मे.गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे | L2 | 2,121.00 | 2,045.00 | 889,200.00 |
| | Gehu Atta - Branded Company 11,700 Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | L4 | 2,051.00 | 1,899.00 | 17,78,400.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Harbara - Gavaran (Whole) Stoneless 700 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L2 | 4,688.00 | 4,441.00 | 172,900.00 |
| 3 | Vatana (Peas) Green Imported, Stoneless 500 Quintal | मे.गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे | L2 | 3,600.00 | 3,501.00 | 49,500.00 |
| 4 | Moong - Gavaran, (Green gram whole) Polished, Stoneless 1,100 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L2 | 8,596.00 | 8,301.00 | 324,500.00 |
| 5 | Kabuli Chana, Best Quality 200 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L2 | 5,575.00 | 4,900.00 | 135,000.00 |
| 6 | Math - Gavaran, Polished (Moth beans) 1,500 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L2 | 7,711.00 | 7,600.00 | 166,500.00 |
| 7 | Rawa - (Semolina) Madhyam 550 Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | L3 | 2,151.00 | 2,106.00 | 24,750.00 |
| 8 | Shengdana (Ground Nut) Dry, Bold, Stoneless 540 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L2 | 8,611.00 | 8,500.00 | 59,940.00 |
| 9 | Dhane - Akhand (Coriander Seeds) Stoneless 180 Quintal | श्री गणेश ड्राय फ्रुट, पुणे | L6 | 12,000.00 | 10,000.00 | 360,000.00 |
| 10 | Mohari (Mustard) 66 Quintal | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव | L2 | 4,900.00 | 4,800.00 | 6,600.00 |
| 11 | Dalya (Roasted bengal gram) 10 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L3 | 7,800.00 | 6,999.00 | 8,010.00 |
| 12 | Amsul (Mango Steen/Mango Powder) Olsar, 5 Kg.Packing 30 Quintal | मे.जयहींद किराणा स्टोअर्स, नाशिक | L2 | 9,600.00 | 9,000.00 | 18,000.00 |
| 13 | Paper Cup 25,100,000 Nos. | मे.सुयोग नेचर केअर, जयपुर | L2 | 0.3799 | 0.36 | 499,490.00 |

**(३) खाली नमुद केलेल्या तक्त्यातील अ.नं.०२ ते १३ किराणा मालाच्या खरेदीसाठी निविदाधारक तात्रिक लिफाफ्यामध्ये अपात्र ठरलेले आहेत. तसेच अ.नं.०१ चे मालासाठी एकही निविदा प्राप्त झालेली नाही व अ.नं.१४ ते ३३ या मालासाठी तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झालेल्या आहेत म्हणून अ.नं.०१ ते ३३ या किराणा मालाच्या खरेदीसाठी फेर निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. सदर फेर-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो मालाच्या पुरवठयामध्ये अडचण येऊ नये, याकरीता मागील निविदा कालावधीतील (आक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५) संबंधीत पुरवठाधारकांकडून मंजुर दराने माल आवश्यकतेनुसार खरेदी करणेत यावा.**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Remarks |
|---|---|---|---|---|
| **1. Sutali** | | | | |
| 1 | Sutali- (Jut twine) (Barik Three Ply) | 4 | Quintal | Ineligible |
| **2. Glasin/Poster Laminated Paper Bag** | | | | |
| 2 | Size 4.5"x 6.5" Glasin Paper, 70 GSM,2 Side Seal | 150 | Quintal | Ineligible |
| 3 | Size 5"x 6.5" (Free Bundi Bag) 3 Colour Printing, Poster Laminated Paper, 70 GSM, Size-250mm, 2 Side Seal | 660 | Quintal | Ineligible |
| 4 | Size 6"x 7" (Ladu Bag) 3 Colour Printing, Poster Laminated Paper, 70 GSM,Size-250mm, 2 Side Seal | 440 | Quintal | Ineligible |
| 5 | Size 8"x 10", 1 Colour Printing, Glasin Paper, 70 GSM,2 Side Seal | 406 | Quintal | Ineligible |
| 6 | Plastic Bag Size 8"x 10" | 3 | Quintal | Ineligible |
| 7 | Paper Role With Printing (for Ladu & Bundi Packing Machine) Poster Paper-60GSM, L.D.Coating-25GSM - Total-85GSM, Paper Roll Size-240mm, 01 Role=20kg. Free Bundi - 6125 Role, Ladu - 2625 Role | 8,750 | Nos. | Ineligible |
| 8 | Plastic Tray (for Ladu & Bundi Packing Machine) P.V.C. (Food Grade) 100-120 Micron, Size - 150mm X 25mm X 50Mm | 20,000,000 | Nos. | Ineligible |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **3. Packed Drinking Water & Tond Cow Milk** | | | | |
| 9 | 1 Litter Bottle (I.S.I.) | 2,001,000 | Nos. | Ineligible |
| 10 | 500 Ml. Bottle (I.S.I.) | 500,000 | Nos. | Ineligible |
| **4. Soap and Other** | | | | |
| 11 | Soap - (Small Size, 12 Gram) Branded Company | 3,600 | Nos. | Ineligible |
| 12 | Dish Washing Powder (Standard) | 1 | Quintal | Ineligible |
| 13 | Dish Washing Liquid Soap (Standard) | 16,000 | Liter | Ineligible |
| 14 | Bhagar (Kodri) | 6 | Quintal | 2 Bidder |
| 15 | Magaj Bee (Melon Seeds/Magaz Seeds) | 1.20 | Quintal | 2 Bidder |
| 16 | Badam Bee (Almond-Big Size) Mothi Size | 0.40 | Quintal | 1 Bidder |
| 17 | Nakeshwar (Masala Phool) | 2.50 | Quintal | 1 Bidder |
| 18 | Dagadful (Black stone flower) | 2.00 | Quintal | 2 Bidder |
| 19 | Hing Khada (Asafoetida) Nagchhap, Agmark | 1 | Quintal | 1 Bidder |
| 20 | Kacche Pohe (Rice pressed) | 9 | Quintal | 2 Bidder |
| 21 | Bhajke Pohe (Brown rice poha) | 21 | Quintal | 2 Bidder |
| 22 | Khade Mith (Natural Salt) | 50 | Quintal | 2 Bidder |
| 23 | Patraval Plain (Plain disposable leaf plates) Cutting, Kacchi Badam | 12,000 | Nos. | 1 Bidder |
| 24 | Patraval Four Kappyachi (Leaf/Paper plates with silver coated) | 2,600,000 | Nos. | 1 Bidder |
| 25 | Droan (Leaf/Paper bowl) Silver Coated | 7,000 | Nos. | 1 Bidder |
| 26 | Kunku | 1.50 | Quintal | 1 Bidder |
| 27 | Chaha Powder -(Tea Powder) Dust (Tata/Brook Bond/Society/Lipton) | 200 | Quintal | 2 Bidder |
| 28 | Coffee Filter (Brook Bond, Cafe Gold, Society) (Coffee Filter) | 15.00 | Quintal | 1 Bidder |
| 29 | Biscuit - Glucose Small Packet (Parle/Britania/ Sunfeast) | 1,200,000 | Nos. | 2 Bidder |
| 30 | Biscuit - Glucose Big Packet (Parle/Britania/ Sunfeast) | 350,000 | Nos. | 2 Bidder |
| 31 | Biscuit -Namkeen Small Packet (Monaco/Timepass/ Snaky) (Parle/Britania/Sunfeast) | 500,000 | Nos. | 2 Bidder |
| 32 | Biscuit -Snacks Small Packet (Kracjack/50-50/ Sweet & Salt) (Parle/Britania/Sunfeast) | 400,000 | Nos. | 2 Bidder |
| 33 | Biscuit - Marie, Small Packet (Parle/Britania/ Sunfeast) | 200,000 | Nos. | 2 Bidder |

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थान रुग्णालयांतील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र. सासवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. रिक्त पदांची संख्या जास्त असल्यामुळे रुग्णांच्या सेवेत अडचणी व अडथळे निर्माण होतात अपेक्षेप्रमाणे रुग्णांना चांगली सेवा देणे काही वेळेस शक्य होत नाही.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी पीआयएल नं १८/२०११ मध्ये दि १६/१०/२०१२ रोजी असा आदेश दिलेला आहे की, संस्थानच्या व्यवस्थापन मंडळाने संस्थानमध्ये नोकर भरती करण्यापुर्वी मा न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे. रिक्त पदांसाठी सिव्हील अ‍ॅप्लीकेशन नं ९४१९/२०१३ मध्ये न्यायालयाने

दि. १३/०८/२०१३ रोजी असा आदेश दिलेला आहे की रिक्त पदांवर भरती करणेसाठी विहित पध्दतीचा अवलंब करावा. उमेदवारांच्या मुलाखती घेणेसाठी मा न्यायालयाने मा संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य, मा संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य आणि व्यवस्थापनाचा त्या क्षेत्रातील तज्ञ प्रतिनिधी अशा तिन सदस्यांची समिती गठीत करुन त्यांचेसमोर उमेदवारांच्या मुलाखती घेणेत याव्यात.

दि. १४/०१/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये रुग्णालयातील रिक्त पदाबाबत जाहिरात प्रसिध्द करणे व दरम्यानचे काळात Ad hoc basis वर कंत्राटदारामार्फत नेमणूका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेकामी मान्यता मिळणेसाठी मा त्रिसदस्यीय समिती सभेसमोर विषय सादर करणेत आला होता. मा त्रिसदस्य समिती दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेमध्ये सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र ६७ पुढीलप्रमाणे झालेला आहे. रुग्णालयातील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिध्द करणे व दरम्यानचे काळात Ad hoc basis वर कंत्राटदारामार्फत नेमणूका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस मान्यता देण्यात आली.

त्यानुसार मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर सिव्हील ॲप्लीकेशन नं ३९३९/२०१५ दाखल करणेत आले होते. सदर सिव्हील ॲप्लीकेशनवर मा न्यायालयाने दि. १७/०४/२०१५ रोजीखालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे. सिव्हील ॲप्लीकेशन मधील परिच्छेद नं 6 मधील अ नं ०१ ते १९ ची पदे भरणेकामी डीन, गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेजमधील संबंधीत विषयातील तज्ञ व सिव्हील सर्जन अहमदनगर या तिन सदस्यांची समिती गठीत करुन त्यांचे समोर मुलाखती घेणेत याव्यात.

सिव्हील ॲप्लीकेशन नं ९४१९/२०१३ दि. १३/०८/२०१३ मा न्यायालयाचे आदेशान्वये दि.०१/०३/२०१५ रोजी परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेल्या पदांसाठी मुलाखती घेणेत आल्या परंतु उचित उमेदवार न मिळालेमुळे परिशिष्ट ब मधीलही पदे रिक्त ठेवणेत आली होती. सदर रिक्त पदांचा समावेश नविन जाहिरातीत करावा लागेल असे मत आहे.

तरी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३९/२०१५ मधील पॅरा नं 6 मधील अ नं 1 ते अ19 ची (परिशिष्ट अ) पदे तसेच सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४१९/२०१३ दि १३/०८/२०१३ चे आदेशान्वये दिलेल्या जाहिरातीतील रिक्त पदे (परिशिष्ट ब) भरणेकामी देशातील प्रमुख शहरांमधील टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स व सकाळ या वर्तमानपत्रामध्ये सोबतचे मसुद्यानुसार व विस्तृत स्वरुपात अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस व जाहिरातीसाठी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांतील रिक्त पदे भरणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.१५० ते १५९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी